
श्री साईबाबा कला महाविद्यालय, वडनेर
ज्ञानियाने उजळु या ग्राम ग्राम
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट
श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय
वडनेर, त. हिंगणघाट, जि. वर्धा
लेक सावित्रीची
वार्षिकांक २०१४-१५

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव १० फेब्रुवारी २०१५
## व लेक सावित्रीची वार्षिकांक प्रकाशन सोहळा

शुभ हस्ते



**मा. डॉ. विनायक देशपांडे**
कुलगुरू (प्रभारी)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

कार्यक्रमाचे अध्यक्ष



**मा. डॉ. राजेश भोयर**
अध्यक्ष प्राचार्य फोरम, महाराष्ट्र राज्य

प्रमुख अतिथी



**मा. प्राचार्य डॉ. बबनराव तायवाडे**
सिनेट सदस्य, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ



**मा. श्री. समीरभाऊ कुणावार**
आमदार, हिंगणघाट



**मा. प्रा. राजुभाऊ तिमांडे**
माजी आमदार, हिंगणघाट

प्रमुख उपस्थिती



**मा. प्रा. दिवाकर गमे**
संस्थापक सचिव, श्री साईबाबा लोक
प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

सत्कारमुर्ती



**मा. श्री. प्रमोद काळपांडे**
सहयोगी संपादक,
दैनिक सकाळ

प्रमुख उपस्थिती



**प्राचार्य नरेश भोयर**
श्री साईबाबा कला महा. वडनेर



अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन प्रसंगी
उपस्थित श्री. हिम्मतराव चतुर, सभापती कृ.उ.बा.स. समुद्रपूर
प्रा. दिवाकरजी गमे, डॉ. सरोदे, प्रा. बोढे
आणि प्रास्ताविक करतांना प्रा. विठ्ठल घिनमिने



इतिहास अभ्यास मंडळाचे पदाधिकारी व मंचावर
डॉ. सुरेंद्र घोगले, आष्टी (शहीद) सदस्य इतिहास अभ्यास मंडळ,
रा.तु.म. नागपूर विद्यापीठ, डॉ. प्रशांत कडवे,
प्राचार्य नरेश भोयर, प्रा. पंकज मुन इतिहास विभाग प्रमुख



मौजा ढिवरी-पिपरी येथे स्वच्छ भारत व
श्रमसंस्कार रा.से.यो. शिबीरामधील सहभागी स्वयंसेवक
व रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कारंजकर



''१२ जाने. युवा दिन'' निमित्याने रक्तदान शिबीरामध्ये
रक्तदान करतांना अमोल मेघरे, बी.ए. भाग-३
रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कारंजकर,
डॉ. दुधे, ग्रामीण रूग्णालय, वडनेर



रा.से.यो. अंतर्गत आयोजित स्वच्छ भारत व श्रम संस्कार शिबीरात
निरोगी व सुदृढ आरोग्य या विषयी मार्गदर्शन करतांना
डॉ. वडमलवार मंचावर डॉ. लोंढे,
डॉ. प्रवीण कारंजकर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी



ग्रामीण रूग्णालय वडेनर येथील परिसरात
स्वच्छ भारत अभियानामध्ये
सहभागी रा.से.यो. स्वयंसेवक व महाविद्यालयीन विद्यार्थीनी

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव १० फेब्रुवारी २०१५
## व लेक सावित्रीची वार्षिकांक प्रकाशन सोहळा



**मा. सौ. हेमलता दिवाकर गमे**
**अध्यक्ष,**
**वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट**



विनोद राऊत
उपाध्यक्ष
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था



अविनाश गमे
सदस्य
वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था



प्रदिप महल्ले
सदस्य
स्थानिक व्यवस्थापन समिती

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## युवा स्फुर्ती महोत्सव १० फेब्रुवारी २०१५
## व लेक सावित्रीची वार्षिकांक प्रकाशन सोहळा

### महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद




प्रा. गणेश बहादे, प्रा. विनोद मुडे, प्राचार्य नरेश भोयर, डॉ. प्रवीण कारंजकर,
प्रा. विठ्ठल घिनमिने, प्रा. संजय दिवेकर, प्रा. पंकज मुन, प्रा. आरती देशमुख, प्रा. ज्योस्ना काकडे

### महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद




संजय पर्बत, शंकर कापसे, प्राचार्य नरेश भोयर, नरेश कातडे, प्रिती सायंकार,
सुरेश तेलतुंबडे, अंकुश वैद्य, अरूण तिमांडे, विजयालक्ष्मी जारोंडे

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

## Rashtrasant Tukadoji Maharaj Nagpur University

"(Established by Government of Central Provinces Education Department by Notification No. 513 dated the 1st of August, 1923 & presently a State University governed by Maharashtra Universities Act.1994)"

Dr. Vinayak S. Deshpande
M.A. (Eco.), M. Com., M.B. A., Ph. D.
Vice-Chancellor (Acting)

डॉ. विनायक श्री. देशपांडे
एम ए (अर्थशास्त्र), एम कॉम., एम बी ए, पीएच. डी.
कुलगुरू (प्रभारी)

**Office:** Chhatrapati Shivaji Maharaj Administrative Premises, Ravindranath Tagore Marg, Nagpur - 440 001
**Tel.:** 0712-2523045. Fax : (0712) 2555701 / **E-mail :** vc@nagpuruniversity.nic.in



## शुभेच्छा संदेश

श्री. साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडणेर, 'लेक सावित्रीची' या नावाने २०१४–२०१५ सत्राचा वार्षिकांक प्रकाशित करीत आहे हे ऐकून आनंद वाटला.

वार्षिकांक हे नवोदित लेखकांना विकसित करण्याचे एक उत्तम व्यासपीठ आहे. मला विश्वास आहे की सदर वार्षिकांकात प्रकाशित झालेले लेख, कविता व विविध लिखाण शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींना व तरूणाईच्या बदलत्या अंतरंगाचा ठाव घेणारे ठरतील. सदर उपक्रमासाठी मी प्राचार्य व संपादक मंडळाचे अभिनंदन करतो.

वार्षिकांकास माझ्या हार्दिक शुभेच्छा.

नागपूर/जानेवारी १७, २०१५

(वि.श्री. देशपांडे)



Dr. Panjabrao alias Bhausaheb Deshmukh
Founder President

Shri Shivaji Education Society, Amravati's (Regd. No. F. 89)

# DHANWATE NATIONAL COLLEGE

Congress Nagar, Nagpur.

Estd. 1935

'College with Potential for Excellence' (C.P.E.) By U.G.C. Delhi
NAAC ACCREDITED 'A' GRADE, CGPA 3.25
RECOGNISED CENTER FOR HIGHER LEARNING AND RESEARCH
INSTITUTIONAL MEMBER OF ASIA PACIFIC QUALITY NETWORK, SHANGHAI

Hon. Adv. Arunkumar B. Shelke
President

Dr. B. B. Taywade
M. Com., M.Phil., Ph.D.
Principal

No./DNC /

Date : 21/01/2015



## शुभेच्छा संदेश

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट व्दारा संचालित श्री.साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर, त.हिंगणघाट, जिल्हा वर्धा ही संस्था ***लेक सावित्रीची*** या नावाने सत्र २०१४-२०१५ चा महाविद्यालयाचा वार्षिकांक प्रकाशित करीत असल्याने मला मनस्वी आनंद होत आहे . ग्रामीण विभागातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक जडण घडण करून त्यांच्यामधील असलेल्या सुप्त कलागुणांना चालना देण्याचे कार्य आपल्या शैक्षणिक कार्याच्या माध्यमातून करण्यात येते तसेच शिक्षणाचा प्रसार व प्रचारही या सावित्रीबाईने फुले यांनी सुरू केलेले कार्य आपल्या संस्थेव्दारा निरंतर सुरू आहे ही बाब वार्षिकांक च्या माध्यमाने जनमानसात पोहचविण्याचे आपले कार्य उल्लेखनिय आहे. आपल्या संस्थेचे कार्य असेच सुरु राहील यात तिळमात्र शंका नाही

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट व्दारा संचालित श्री.साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर, त.हिंगणघाट, जिल्हा वर्धा ही संस्था ***लेक सावित्रीची*** या नावाने सत्र २०१४-२०१५ चा महाविद्यालयाचा वार्षिकांकास माझ्या व माझ्या संस्थेच्या वतीने हार्दिक शुभेच्छा. आपल्या संस्थेच्या पुढील यशस्वि वाटचलीकरीता सुयश तसेच प्रकाशित होणाऱ्या सत्र २०१४-२०१५ च्या वार्षिकांकाला शुभेच्छा!

**[डॉ.बबन तायवाडे]**
प्राचार्य
धनवटे नॅशनल कॉलेज, नागपूर

प्रति,
**मा. प्राचार्य,**
श्री.साईबाबा लोक प्रबोधन कला
महाविद्यालय वडनेर, त.हिंगणघाट, जिल्हा वर्धा

Phone: (O) (0712) 2422759, 2454193, Fax: (0712) 2454193
E-mail: dhanwatenationalcollege@yahoo.com ■ Website: http:#dhanwatenationalcollege.com

DNC/SSG/ABB LH(New)/DNC Backup

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

# लेक सावित्रीची

वार्षिकांक २०१४-१५


## संपादक मंडळ

**प्रकाशक**

प्राचार्य नरेश भोयर

**कार्यकारी संपादक**

प्रा. विनोद मुडे

**अहवाल संकलन व संपादन**

प्रा. आरती देशमुख

**सहसंपादक**

प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर

प्रा. गणेश बहादे

प्रा. विठ्ठल घिनमिने

प्रा. पंकज मुन

**विद्यार्थी संपादक**

| | |
|---|---|
| कु. टिनाली खडके | बी.ए. भाग-३ |
| श्री. निखिल मेंढे | बी.ए. भाग-३ |
| कु. प्रिया वांदिले | बी.ए. भाग-२ |
| कु. शितल राऊत | बी.ए. भाग-२ |
| कु. भक्ती घरजोडे | बी.ए. भाग-१ |
| श्री. विशाल जाधव | बी.ए. भाग-१ |

# प्राचार्यांचे मनोगत

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर ग्रामीण भागातील एक छोटसे महाविद्यालय असून जवळच संत भोजाजी महाराज आजनसरा व पोहणा येथील महादेव मंदिराच्या निसर्गरम्य सानिध्यात आहे. हिंगणघाट तालुक्यातील अनेक खेड्यागावातील मुले–मुली शिक्षण घेत असून महाविद्यालयीन जीवनात अनेक महत्वाच्या घटना घडतात त्याचे प्रतिबिंब वार्षिकांकामध्ये उमटविले आहे.

महाविद्यालयामध्ये प्रथमच ''लेक सावित्रीची'' वार्षीकांक प्रकाशित होत असल्यामुळे महाविद्यालयातील सर्व सावित्रीच्या लेकी, विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या सहभागामुळे महाविद्यालयातील अनेक उपक्रमाचे; विद्यार्थीच्या सुप्त गुणाचे व त्याच्या जीवन मुल्याची ओळख या वार्षिकांकातून होत असल्या बाबत निश्चितच ते अभिनंदनास पात्र आहे.

ग्रामीण भागातील तरूण पिढी अनेक स्वप्न घेऊन महाविद्यालयात प्रवेश घेत असतात त्यांच्या जीवन मुल्याची ओळख करून देत, त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास हे महाविद्यालय सातत्याने विविध उपक्रमाचे आयोजन करीत असते. या करीता श्रमसंस्कार शिबिर, रक्तदान व रोगनिदान शिबीर, साक्षरता अभियान, संविधान दिन, स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन, विविध विषयाच्या अभ्यास मंडळाचे कार्यक्रम, युवा स्फुर्ती महोत्सव, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती महोत्सव, स्त्री आत्मसम्मान, पर्यावरण समतोल, स्वच्छ भारत अभियान इ. समाज उपयोगी उपक्रम घेतले जातात त्यातून विद्यार्थीचा चतु:रस्त विकास साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला जातो.

आजच्या माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रगत महिला ही पुरूषाच्या खांद्याला खांदा लावून प्रगतीचे दरवाजे खुले करीत आहे. परिवर्तनवादी विचारसरणीचा आढावा घेऊन जीवनातील सातत्य व प्रगतीशिल जीवनाच्या उपाययोजना याना आत्मसात करून प्रगतीचे एक–एक पाऊल पुढे टाकीत आहे. तरी सुद्धा देशातील महिलांचे प्रश्न व देशातील अनेक ज्वलंत प्रश्नांना या वार्षिकांकाच्या माध्यमातून लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला आहे. स्त्री भ्रृणहत्या, महिला सक्षमीकरण, महिलावरील अत्याचार अशा अनेक लेखातून त्यांनी सर्व स्त्री मनाच्या वेदनाच बोलून दाखविल्या आहेत. सोबतच तुकडोजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच इतर समाजसेवकाच्या जीवनावर प्रकाश टाकून आपण त्यापासून प्रेरणा घ्यावी. कविता, विनोदी कविता, ज्वलंत व दैनंदिन घडामोडी यावरही काव्य रचले आहे. यातून त्याचा समाजाप्रती आपल्या माणसाप्रती बदललेला दृष्टीकोण जाणवतो. यातून महाविद्यालयाचा नावलौकीक वाढेल व हा वार्षिकांक सर्वांसाठी प्रेरणादायी ठरेल असा आशावाद बाळगण्यास हरकत नाही.

या सर्व महाविद्यालयीन उपक्रमाच्या व कार्यक्रमाच्या वाटचाली साठी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य देणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था हिंगणघाट व महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकरजी गमे साहेब, संचालक मंडळाचे सहकार्य आहेच. या सर्वांचा मी आभारी आहो.

✍ प्राचार्य
**नरेश भोयर**

# संपादकीय

प्रिय विद्यार्थी मित्रानों,

आपल्या महाविद्यालयामध्ये सन २०१४–१५ चा प्रथमच 'लेक सावित्रीची' वार्षीकांक प्रकाशित होत असल्यामुळे निश्चीतच मला आनंद होत आहे. गेल्या चौदा वर्षात महाविद्यालयामध्ये अनेक उपक्रमांचे व कार्यक्रमाचे नियोजन आणि यशस्वी आयोजन करून महाविद्यालयाची सेवा व कर्तव्य मला पार पाडता आली. आपले महाविद्यालय ग्रामीण असून त्या वातावरणाशी समरस होऊन जमेल ते कार्य जोमाने करण्यासाठी पुढे सरसावलो. यावर्षी संपादकीय लिहिण्याचा मला योग आला आहे. त्यासाठी सतत मार्गदर्शन व सहकार्य मला महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकरजी गमे साहेब, संचालक मंडळ आणि प्राचार्य नरेश भोयर यांचे लाभत आहे. त्यांचे मनस्वी आभार; मी त्याचा कृतज्ञ होऊ इच्छितो !

भारतमातेच्या कुशीत क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, राष्ट्रमाता जिजाऊ,झाशीची राणी, अहिल्याबाई होळकर, मदर तेरेसा तसेच संत जनाबाई कवयित्री बहीणाबाई अशा अनेक विरांगणानी म्हणजेच भारत मातेच्या सुकन्यांनी जन्म घेऊन आपल्या असामान्य कर्तृत्वाने भारताची शान जगाच्या इतिहासात राखली आहे. त्यांचे प्रतिबिंब या वार्षीकांकामध्ये निश्चीतच दिसेल.

सावित्रीच्या पुण्याईने घेतली स्त्रियांनी भरारी ।<br>
एकक श्रेत्रात त्यांनी गाजवली कर्तबगारी ।।<br>
तिच्यामुळे आज घरोघरी सुखसमृद्धी झुले ।<br>
स्त्री मुक्तीची देवता होती सावित्रीबाई फुले ।।

सावित्रीच्या कर्मामुळे आज प्रत्येक मुलगी शाळेत जाऊ लागली, स्वतंत्र्य विचार करू लागली. या सर्व कार्याची जाणीव सर्व मुलींना आज करून देण गरजेचे आहे. ती आजची गरज बनत चाललेली आहे. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे जीवनकार्य, साहित्य व विचार आम्हासाठी प्रेरणादायी निश्चीतच ठरेल.

आपले महाविद्यालय हे विद्यार्थ्यांच्या सुप्त कला गुणांच्या प्रगटीकरणास व सादरीकरणास वाव देणारे आहे. केवळ चार भिंतीचा आत न बसविता त्यांचा व्यक्तीमत्वाचा विकास कसा होईल यावर भर दिला जातो. महाविद्यालयामध्ये राबविलेले उपक्रम, विद्यार्थ्यांचा सहभाग व त्यांची कामगिरी तसेच लेखनविषयक साहित्य व सुप्त गुणांना वाव मिळवून देण्याचे वार्षीकांक हे एक उत्तम साधन असते. तसेच महाविद्यालयातील इतर घडामोडीचांही त्यात समावेश असतो. त्या दृष्टीने या वार्षिकांकाला परिपूर्ण करण्याचे कार्य ज्यांनी ज्यांनी केले ते अभिनंदनास पात्र आहेत असे मी समजतो.

मित्रानों, ईश्वर सगळ्यांना सद्‌बुद्धी देवो व आपणा सर्वांमध्ये माणुसकीचा संचार होवो हीच प्रार्थना. शहाणपण देगा देवा !

असो .................!

✍ प्रा. विनोद मुडे<br>
कार्यकारी संपादक

# वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था,
# हिंगणघाट

## -: कार्यकारी मंडळ :-

| | | | |
|---|---|---|---|
| १. | सौ. हेमलता दिवाकर गमे | – | अध्यक्ष |
| २. | श्री. विनोद वामनराव राऊत | – | उपाध्यक्ष |
| ३. | प्रा. दिवाकर नानाजी गमे | – | सचिव |
| ४. | सौ. गितादेवी पंजाबराव ठाकरे | – | सहसचिव |
| ५. | श्री. संतोष महादेवराव महल्ले | – | कोषाध्यक्ष |
| ६. | सौ. लता देवरावजी इंगोले | – | सदस्या |
| ७. | श्री. अविनाश दिवाकर गमे | – | सदस्य |

वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था, हिंगणघाट

द्वारा संचालित

# श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर

## स्थानिक व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. हेमलता दिवाकर गमे | - संस्था अध्यक्ष |
| २. | प्रा. दिवाकर नानाजी गमे | - संस्था सचिव-सदस्य |
| ३. | श्री. विनोद वामनराव राऊत | - सदस्य |
| ४. | श्री. संतोष महादेवराव महल्ले | - सदस्य |
| ५. | श्री. अविनाश दिवाकर गमे | - सदस्य |
| ६. | श्री. प्रदिप माधवराव महल्ले | - सदस्य |
| ७. | प्रा. नरेश भोयर | - सचिव, कार्यकारी प्राचार्य |
| ८. | प्रा. विनोद मुडे | - सदस्य, शिक्षक प्रतिनिधी |
| ९. | डॉ. प्रा. प्रवीण कारंजकर | - सदस्य, शिक्षक प्रतिनिधी |
| १०. | प्रा. गणेश बहादे | - सदस्य, शिक्षक प्रतिनिधी |
| ११. | श्री. नरेश कातडे | - सदस्य, शिक्षकेत्तर प्रतिनिधी |

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| लेक सावित्रीची शिकली शाळा ........! | प्रा. दिवाकर गमे | १ |
| क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान | रजत रमेश मून | ३ |
| माझी माय | कु. रेणू बंडूजी हस्ती, | ८ |
| सावित्रीबाईंचं काव्य | कु. शालीनी येळेकर | ९ |
| स्त्रियांविषयी समाजाचा दृष्टीकोण | डॉ. प्रवीण कारंजकर | १० |
| आई | कु. रश्मी विनोद बुटे | १२ |
| बाबासाहेब | कु. ललीता वा. सेलवटकर | १२ |
| महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार | कु. प्राजक्ता चरडे | १३ |
| घर असावे घरासारखे | कु. कोमल वा. ताजने | १४ |
| स्त्रि सक्षमीकरण आणि समाज | प्रा. विनोद मुडे | १५ |
| खरा कवी | कु. दिक्षा ग. भगत | १६ |
| अन्न देणार श्रीहरी | कु. प्रगती गजाननराव पाळेकार | १७ |
| सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य | सचिन दत्तात्रय भगत | १८ |
| भारतीय महिलांचे योगदान | कु. प्रियंका सुरेशराव वैद्य | २० |
| विश्वविजेती महीला बॉक्सर मैरी कॉम | सुरज ग. खोंड | २२ |
| आई | शितल का. राऊत | २३ |
| गांव झालं भुतखाना | अमित सातपुते | २४ |
| स्त्री भृणहत्या | कु. भक्ती घरजोडे | २५ |
| नेता कसा नसावा / असावा | अमोल का. राऊत | २७ |
| शायरी | कु. आकांक्षा कोल्हे | २७ |
| पंचायत राज मधील महिलांचा सहभाग | प्रा. गणेश एन बहादे | २८ |
| ज्ञानलालसा | कु. मधुबाला खैर | ३० |
| विसाव्या शतकातील स्त्री | कु. पिंगला मो. मेश्राम | ३१ |
| राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिक्षण विषयक विचार | प्रा. ज्योत्स्ना काकडे | ३२ |
| लेकीच सावित्रीआईस पत्र | कु. प्रिती सायंकार | ३४ |
| बेकारी | पुनम अनंतराव तळवेकर | ३६ |
| स्त्रियांची उपेक्षा | कु. वैजयंती वैकुंठराव मांडेकर | ३७ |

| | | |
|---|---|---|
| झाड | कु. आशा श. खोंड | ३९ |
| संस्कार | निखिल तु. खाडे | ४० |
| चांदण्या रातीत | गंगाधर खु. ढवस | ४१ |
| स्त्री पुरूष समानता | कु. टीनाली खडके | ४२ |
| जाणाऱ्या वर्षाला सलाम | योगेश सरदार | ४३ |
| महिला सक्षमीकरण | गणेश सुरकार | ४४ |
| नियमित आणि संतुलित आहार जीवनाला आवश्यक | प्रा. आरती देशमुख | ४६ |
| सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य | श्याम राजेंद्र भांबेवार | ४८ |
| ओबीसींचा नेता मा. छगनराव भुजबळ साहेब ! | श्रीकांत सेलकर | ५० |
| महिला बचत गट आणि स्त्रियांची भुमिका | कु. सविता वासुदेवराव मेश्राम | ५१ |
| कविता कशी असावी | विवेक वि. जाधव | ५३ |
| अर्थसंकल्पाची ओळख | प्रा. विठ्ठल घिनमिने | ५४ |
| सेवक मयुरसेन | निखिल दे. मेंढे | ५५ |
| स्त्री विषयक चालु घडामोडी | कु. स्वाती शा. बुधे | ५६ |
| हाक लोकशाहीची | सागर बकाने | ५८ |
| नागपूर जिल्ह्यातील पुरातत्वीय ऐतिहासिक स्थळे : एक अवलोकन | प्रा. पंकज वामन मून | ५९ |
| ENGLISH LANGUAGE AND SCOPE FOR PROFESSIONAL ABILITY | Prof. Sanjay A. Diwekar | ६४ |
| **अहवाल :-** | | |
| मराठी विभाग | डॉ. प्रवीण कारंजकर | ६७ |
| राज्यशास्त्र विभाग | प्रा. विनोद मुडे | ६८ |
| इतिहास विभाग | प्रा. पंकज मुन | ६९ |
| समाजशास्त्र विभाग | प्रा. गणेश बहादे | ६९ |
| अर्थशास्त्र विभाग | प्रा. विठ्ठल घिनमिने | ७० |
| गृहअर्थशास्त्र विभाग | प्रा. आरती देशमुख | ७१ |
| शारिरीक शिक्षण विभाग | प्रा. नरेश भोयर | ७१ |
| सांस्कृतिक विभाग | प्रा. आरती देशमुख | ७२ |
| राष्ट्रीय सेवा योजना | डॉ. प्रवीण कारंजकर | ७४ |
| निरंतर प्रौढ शिक्षण विभाग व महिला अध्ययन केंद्र | प्रा. विठ्ठल घिनमिन | ७६ |

# लेक सावित्रीची शिकली शाळा ........!

प्रा. दिवाकर गमे

१ जानेवारी १८४८ ला पुण्यामधील तात्यासाहेब भिडे यांच्या वाड्यामध्ये मुलींच्या शाळेची पहिली घंटा निनादली. त्या वेळी त्याचा जो आवाज घुमला तो, या देशामधील स्त्री शिक्षणाचा, स्त्री स्वयंपुर्णतेचा, स्त्री स्वावलंबनाचा आणि स्त्री आत्मसन्मानाचा पहिला हुंकार होता. आता तर त्याचे भव्य दिव्य रुपांतर झालेले आहे. विविध क्षेत्रात आज विविध महिला आपल्या कार्यक्षमतेने काळावर आणि इतिहासावरही आपल्या कर्तबगारीने ठसा उमटवित आहे. हे सारे श्रेय महात्मा जोतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी मुलींची पहिली शाळा सुरु करुन समाजासमोर जो नवा विचार मांडला, त्याला आपल्या परिश्रमाने समाजात रुजविले, वाढविले त्या विचाराला व संकल्पनेला जाते.

एकोणिसाव्या शतकाचा महाराष्ट्रातील व पुण्यातील कालखंड तसा या साऱ्यासाठी प्रतिकुलच ! स्त्रिया आणि शुद्र यांची स्थिती पशुपेक्षाही हिन होती. देवाच्या व धर्माच्या नावाखाली बहुसंख्य समाज हा सर्व प्रकारच्या गुलामगिरीत गटांगळ्या खात होता. स्त्रीचा जन्मच मुळात अशुभ मानला जात असे. अर्थात आजही ही परिस्थती खुप बदलली असे मानण्याचे कारण नाही. परंतु ज्या काळात स्त्रीने शिकणे हे महापाप मानले जाई, ती ब्राम्हण या उच्च जातीतली असली तरीही, त्या काळामध्ये सावित्रीबाई सारख्या सुरुवातीला निरक्षर असलेल्या स्त्रीने, महात्मा फुले यांच्या प्रेरणेने शिक्षण घेवुन या देशातल्या पहिल्या महिला आद्य शिक्षिका, मुख्याध्यापिका झाल्या, समाजाला नवा विचार व आचार दिला, हे त्यांचे कार्य अलौकिक आणि ऐतिहासिक आहे.

महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना ही  मुलींची शाळा सुरु करण्यासाठी आणि स्त्री शिक्षणाचे कार्य करण्यासाठी आपल्या जीवनात फार मोठे परिश्रम करावे लागले. पुण्यातील धर्म मार्तंडानी भडकावल्यामुळे या दांपत्याला आपले राहते घरदार सोडुन बाहेर पडावे लागले. त्यावेळी त्यांच्या मुसलमान मित्रांनी आपले घरी नेवुन त्यांना आश्रयस्थान दिले. सावित्रीबाईंना तर मुलींच्या शाळेत फातिमा शेख सारखी सहकारी शिक्षिका मिळाली, आणि त्या उत्साहाने या कार्यात मग्न झाल्या. परंतु समाजांनी मात्र त्यांचा होईल तेवढा छळवाद केला. ज्या वेळी सावित्रीबाई घरुन मुलींच्या शाळेत शिकविण्यासाठी जायची त्यावेळी टवाळखोर लोक त्यांची टिंगल करायचे. त्यांच्यावर शेणामातीचे गोळे फेकायचे. ते सारे सहन करुन त्यांनी आपल्या मुलींच्या शिक्षण कार्यात कुठेही खंड पडु दिला नाही. हे त्यांचे कर्तृत्व फार मोठे आहे. त्याची कशाचीही तुलनाच होऊ शकत नाही. महात्मा जोतीबा फुले हे सामाजिक क्रांतीकारी होते. त्यांनी पुण्या सारख्या प्रतिगाम्यांच्या आणि सनातन्यांच्या गडातच, त्यांच्या प्रचंड कडव्या विरोधाला ठोकरुन सनातन्यांच्या बालेकिल्ल्यात पुणे परिसरात जे शैक्षणिक व सामाजिक सांस्कृतिक सेवेचे क्रांतीकार्य केले, त्यामध्ये सावित्रीबाईंच्या सेवेचा महत्वाचा सहभाग होता.

महात्मा ज्योतीबा फुले यांनी अज्ञानी पणावर प्रखरतेने आसुड ओढले. ते म्हणत....

*विद्येविना मती गेली ।*
*मतीविना निती गेली ।।*
*नितीविना गती गेली ।*
*गतीविना वित्त गेले ।*
*वित्त विना शुद्र खचले ।*
*इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।*

सावित्रीबाई फुले यांचा सुध्दा ज्ञानावरच भर होता. आपल्या एका कवितेमध्ये त्या सांगतात ..

*तयास मानव कां म्हणावे !*
*ज्ञान नाही विद्या नाही, ते घेणेचि गोडी नाही*
*बुध्दी असुनही चालत नाही, तयास मानव कां म्हणावे ?*

आज महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी ज्या आपल्या अथक परिश्रमाने ही ज्ञानपरंपरा मुली, स्त्रिया, आणि सर्व सामान्यांसाठी सुरु केली, त्याची फळे आज आम्ही सर्व अनुभवीत आहोत. त्या परंपरेचे आपण सारे वारसदार आहात. ती परंपरा आपण पुढे नेण्याचे कार्य करणे हे आपले कर्तव्य आहे.

परंतु आजही समाजात मुली व स्त्रीयांना दुय्यमच वागणुक मिळते. काही शतकापुर्वी मुलींचा जन्म होणे हे अशुभतेचे लक्षण मानले जाई. ती मानसिकता या आधुनिक भारतातही दिसुन येते. म्हणुनच आदिवासी, मागासलेल्या ग्रामीण भागापेक्षा पुढारलेल्या आणि गर्भश्रीमंत नागरी समाजामध्ये मुलांपेक्षा मुलीचे जन्माचे प्रमाणच फार मोठ्या प्रमाणात कमी दिसते. फुले शाहु आंबेडकरांच्या महाराष्ट्रात, हजारी ८२२ पर्यंत स्त्रीयांचे प्रमाण कमी होणे यावरुन समाज कुठे जात आहे हे दिसुन येते. दिडशे वर्षापुर्वी मुलींना, स्त्रीयांना शिकण्यास बंदी होती. आता तर अप्रत्यक्षरित्या त्यांच्या जन्मावरही बंदी घातली जात आहे. या बाबत महात्मा जोतीबा फुले यांच्या १२१ व्या पुण्यतिथीला पुणे येथील फुलेवाड्यामध्ये २८ नोव्हेंबर २०११ ला मा. श्री. छगनराव भुजबळ यांनी या बाबत जे आपल्या भाषणात वक्तव्य केले ते त्यांच्याच शब्दात या ठिकाणी नमुद करतो.........................!

**''पुर्वी मुलींवर अत्याचार व्हायचे, महात्मा जोतीराव फुल्यांनी सांगीतल, शुद्राहुनी अति शुद्र, अशी महिलांची त्या वेळची स्थिती होती. कारण त्या वेळेला विधवा झाली, केस कापुन टाक, सती जा अमुक कर, तमुक कर, हे सगळ असायच ! वाटेल तेवढा त्रास! अजिबात शिकायच नाही, ब्राम्हणांच्या मुलींनी सुध्दा शिकायच नाही. कारण तो अलिखीत कायदा आहे हिंदु धर्माचा !मुलींनी शिकायच नाही ....! महात्मा जोतीराव फुल्यांनी, सावित्रीबाई फुल्यांनी जे आहे, या प्रवाहाच्या विरुध्द त्यांनी जे आहे, शिक्षण त्यांनी सुरु केल.**

**आज पाहिल आपण, मुली डॉक्टर, इंजिनिअर, मंत्री....! आज चार चार मुख्यमंत्री या देशात आहे महिला ! चार चार ...! यु.पी.ए. सरकार त्याच्या सरकारच्या प्रमुख आहेत सोनिया गांधी, त्या सुध्दा महिलाच..! आणि या देशाच्या राष्ट्राध्यक्ष, त्या सुध्दा प्रतिभाताई पाटील या महिलाच...!**

**मला वाटत, आजखऱ्या अर्थान महात्मा जोतीराव फुल्यांना व सावित्रीबाई फुल्यांना आनंदाश्रु येत असतील, की नाही....... ज्याच्यासाठी आपण लढलो, ते स्वप्न जे आहे, ते पुर्ण होत आहे.**

**........परंतु आपण अतिशय हुशार ! त्या वेळी आपण महिलांवर अन्याय करीत होतो. आता आपण एवढे शिकलेले, पैसे दोन पैसे आलेले, गाड्या घोड्या ...! चला महिलांना अत्याचार नको ना .......! ठिक आहे ..! मुलगी जन्मालाच येवु द्यायची नाही...! गर्भातच मुलींना मारुन टाकायच...! काय आमची संस्कृती आहे...? आणि म्हणुनच महाराष्ट्रात हजार पुरुषांमागे ८२२ महिला अस प्रमाण आहे. तरी स्त्री भृणहत्या जे आहे, ते आपण सगळ्यांनी जे आहे, त्या विरुध्द सर्वांनी लढल पाहीजे. आणि मुलींना गर्भातच मरु देणार नाही, त्या साठी आपण घरापासुन तर समाजापर्यंत ही लढाई लढली पाहीजे. हीच लढाई महात्मा जोतीबा फुल्यांची व सावित्रीबाई फुल्यांची खरी लढाई आहे.''**

आज या सावित्रीच्या लेकी शिकलेल्या आहेत. त्यांना हे सारे कळत आहे. उघड्या डोळ्यांनी त्या पहात आहे. त्यांच्या वाणीत आणि त्यांच्या लेखनीतही बळ आलेले आहे. राष्ट्रीय सामाजिक विसंवादही त्यांना दिसतो आहे. ''**आज एकीकडे या देशाचे नेतृत्व जाहीरपणे सांगतात, बेटी बचाओ ! बेटी बढाओ !! बेटी पढाओ !!! तर दुसरीकडे या नेत्यांचा उदो उदो करणारे महान योगी पुरुषही बेटा पैदा होनेकी दवाई, सरे आम बेच रहे है !**'' राष्ट्रीय आणि सामाजिक जीवनातील हा ढोंगी दुटप्पीपणा कणखरपणे थांबविलाच पाहीजे.

आज या सावित्रीच्या लेकी शिकल्या आहे. समजुतदार झालेल्या आहे. पण त्यांच्यातही विसंवादाचे सुर मिसळत आहे. तीन जानेवारीला नायगाव येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी झाली. आम्ही तेथे गेलो होतो. त्या लहानशा नायगावात व रस्त्यावर प्रचंड गर्दी होती. त्यात मुली, विद्यार्थींनी आणि महिलांची संख्या ही कितीतरी पटीने जास्त होती. त्या सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या पुर्वसंध्येलाच वाटस अप वर ''**सावित्रीची लेक शिकली शाळा**'' अशी कविता आली. कविचे नाव नव्हते. नायगावच्या सावित्रीबाई जयंतीच्या कार्यक्रमातही प्रमुख वक्त्यांनी त्या अनामिक कवी च्या कवितेचा उल्लेख केला. ती कविताच येथे देत आहोत. सावित्रीच्या लेकींनी याचा विचार करावा.

**''आज बहुतांश महिलांना माहीत नसेल की, उद्या ३ तारखेला सावित्रीमाईंची जयंती असेल. त्यांना वटसावित्री न चुकता माहित असते...... मार्गशिर्ष गुरुवार लक्षात असतात. पण महिलांच्या शिक्षणासाठी जीने शेणाचे गोळे झेलले, वेळ पडली तेंव्हा स्वत:चे घर सोडले, त्या सावित्रीमाईला आज तिची लेक विसरलेली दिसते. स्वत:च्याच विश्वात रममाण झालीय.... कर्मकांड उपास तपास आणि टी व्ही वरील मालीका यांपेक्षा वेगळे जग तिला ठावुक नाही.**

**कामानिमित्त घराबाहेर पडणाऱ्या महिलांची ही अवस्था..... मग गृहीणींची तर त्याहुनीही बिकट अवस्था असणार ...! याच सावित्रींच्या लेकींसाठी........!''**

सावित्रीची लेक शिकली शाळा
जीच्यासाठी झेलला शेणाचा गोळा
सावित्रीची लेक शिकली शाळा........!

लेक तिची आज शिकु लागली
पोथी पुराणे वाचु लागली
उपासातपासांना नाही बसला आळा
सावित्रीची लेक शिकली शाळा ........!

डॉक्टर झाली घरी विटाळ पाळी
शास्त्रज्ञ झाली तरी रुद्राक्ष गळी
नाव सोनुबाई हाथी कथलाचा वाळा
सावित्रीची लेक शिकली शाळा ..........!

वास्तुशास्त्राने बदल घरात
गर्भसंस्कार चालतो जोरात
नविन फॅशन येईल फक्त त्यावर डोळा
सावित्रीची लेक शिकली शाळा ..........!

नागपंचमी आणि संक्रांत वाण
एवढ्यासाठीच का बाईच जीवन ?
शिकलेली महिला आज बनली अहिल्या शिळा
सावित्रीची लेक शिकली शाळा.........!

हे स्वातंत्र्य तुझे, देणे तिचे आहे
उपकार तिचे तुला फेडायचे आहे
साथ हवी, नको कोरडा उन्माळा
सावित्रीची लेक शिकली शाळा....!

जातीभेद अन लिंगभेदाची
कीड मारुया विषमतेची
साथ दे फुलवायला समतेचा मळा
सावित्रीची लेक शिकली शाळा
जिच्यासाठी झेलला शेणाचा गोळा
सावित्रीची लेक शिकली शाळा..................!!

# क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांचे शैक्षणिक योगदान

**रजत रमेश मून**
बी.ए. भाग-२

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक महिलांनी आपल्या कर्तृत्वाने सोनेरी पान जोडलेले आहे. या महिलांनी मुकुटमणी म्हणून आपल्याला सावित्रीबाई फुले यांच्याक डे दिशानिर्देश करावा लागेल. इ.स.१८३८ मध्ये पेशवाई बुडाल्यानंतर संपुर्ण भारतभर इंग्रजांचा एकछत्री अंमल सुरु झाला. आणि भारतात इंग्रजी शिक्षणाला सुरुवात झाली. इंग्रजी शिक्षण घेणे हे प्रतिष्ठीपणाचे लक्षण मानले जाऊ लागले. पण हे शिक्षण काही विशिष्ट लोकापुरते मर्यादित होते. जेथे बहुजन समाजातील पुरुषांनाही शिक्षणाचा अधिकार नव्हता तेथे स्त्रियांच्या शिक्षणाची काय अवस्था असणार स्त्रियांचे शिक्षण तर पाप समजले जात होते. मुलींना शाळेत जाणे व शिकणे हा एक मुलींना कुमार्गास लावण्याचा उदयोग आहे. अशी लोकांची समजुत होती. मुलींचे शिक्षण धर्माच्या विरुध्द मानले जात होते. अशा या कालखंडात सावित्रीबाई जन्माला आली. साताऱ्या जिल्हातील नायगांवच्या नेवसे पाटलांच्या कुटूंबात ०३ जानेवारी १८३९ ला सावित्रीबाईचा जन्म झाला. आईचे नाव लक्ष्मीबाई व वडिलांचे नाव खंडोजी असे होते त्या काळातील रितीप्रमाणे वयाच्या ९ व्या वर्षी सावित्रीबाईचे लग्न गोविंदराव फुल्यांचे चिरंजीव जोतीबा यांच्याशी झाला.

तो काळ स्त्रियांच्या दृष्टीने अंधःकारमय होता. त्यांना शिक्षण घेण्याचा अधिकार नव्हता. लहान वयातच लग्न होवुन त्यांना संसारात पदार्पण करावे लागे. लग्नानंतर त्यांचे जीवन बंदिस्त होत असे अशा परिस्थितीत सावित्रीबाईनी शिक्षण घेणे म्हणजे एक अग्नीदिव्यच होते. जोतिबांच्या प्रयत्नाचे आणि परिश्रमाचे फळ म्हणजे सावित्रीबाईचे शिक्षण अर्थात यात सावित्रीबाईची जिदद् परिश्रम आणि स्वयंप्रज्ञा तेवढीच महत्वाची ठरते. सावित्रीबाई चे शिक्षण म्हणजे साऱ्या स्त्रीजातीला प्रेरणा देणारा महामंत्र, शेतातील मातीवर आंब्याच्या डाहाळीने सावित्रीबाईनी शिक्षणाची सुरुवात केली. आणि अथक परिश्रम घेवून शिक्षण प्राप्त केले. पुढे चालुन जोतिबांनी सावित्रीबाईच्या प्रशिक्षणासाठी प्रयत्न चालविले. त्या प्रयत्नांना यश येवून सावित्रीबाईनी नार्मल स्कुलच्या मिसेस मिचेल कडुन शिक्षिकेचे प्रशिक्षण पुर्ण केले.

सावित्रीबाईचे शैक्षणिक योगदान :-

जोतिबांनी आपले शिक्षण मिशनरी शाळेत पुर्ण केले होते. मिशणऱ्यांच्या शिकवणुकीचे आणि संस्काराचे खोल परिणाम जोतिबांच्या मनावर झाले भारतीय समाजातील स्त्री -शुद्रांचे दुःख दुर करायचे असेल तर त्यांना शिकवुण शहाणे केले पाहीजे. विदयेशिवाय स्त्री-शुद्रांचा उध्दार होणार नाही. हे जोतिबांनी ओळखले होते. आणि म्हणुन

त्यांनी स्त्री-शुद्रांसाठी शाळा उघडण्याच विचार सुरु केला. त्यांच्या प्रयत्नांना यश येऊन पुण्यात बुधवारपेठेत भिडे वाडयात इ.स. १८४८ ला पहिली मुलींची शाळा सुरु झाली. मुलींना शिकविण्याचे काम कोणीही करणार नाही हे ओळखुणंच जोतिबांनी सावित्रीबाईना प्रशिक्षित शिक्षिका बनविले होते. या शाळेत सावित्रीबाईनी ज्ञानदानाचे कार्य सुरु केले, पण मुलींना शिक्षण देणे ही गोष्टचं सनातन्यांना सहन होण्यासारखी नव्हती ''हिन्दु धर्माचे कायदे बनविणाऱ्या मनुनेच स्त्रीच्या पायात बेडया ठोकल्या होत्या. तिचे स्वातंत्र्य माणसन्मान हिरावून घेवून तिला गुलाम बनविले होते. आणि म्हणूनच पुढील काळात स्त्रियांची शिक्षणापासून फारकत झाली''

मुलींच्या शाळेची वार्ता पंचक्रोशीत पोहचली. यामुळे सनातन्यांनी आक्रोश सुरु केला. परंतु जोतिबांनी त्यांना भीक घातली नाही. वरुन या शाळेत मुलींना शिकवण्याचे काम सावित्रीबाईनी स्विकारल्यामुळे ''शेपटीवर पाय पडल्याने नाग जशा फणा उभा राहतो. तशीच अवस्था सनातन्यांची झाली. मनुप्रणित तथाकथित धर्मव्यवस्थेने स्त्रीच्या पायात ठोकलेल्या बेडया सावित्रीबाईनी ताडताड तोडल्या यामुळे धर्माची भाषा बोलणाऱ्या ढोंगी लोकांनी निंदा नालस्ती आणि शिवीगाळ सुरु केली'' भारतीय संस्कृतीचे माहेरघर समजण्यात येत असलेल्या पुण्याच्या सोवळया भुमीत मुलीसाठी शाळा काढुन तेथे एका महिलेले ज्ञानदानाचे कार्य करणे, ही गोष्ट काही साधी नव्हती. प्रवाहाच्या अगदी उलट दिशेने पोहण्यासारखे, किंबहुना त्याहीपेक्षा कठिण असे हे कार्य होते.

शाळा चालवितांना सावित्रीबाईना अतिशय त्रास सहन करावा लागला. त्यांच्यावर अनेक संकटे आलीत. परंतु त्या डगमगल्या नाहीत. सनातन्यांच्या चिथावणीवरुन गावातील गावगुंड त्यांचा रस्ता रोखकण्याचा प्रयत्न करीत '' सटवी, धर्मबुडवी, घरबुडवी, म्हणून शिव्या देत शेण-माती फेकुन मारीत. अंगावर थुंकत.''परंतु मुलीना शिकविण्याचा ध्यास सावित्रीबाईना एवढा होता की त्या झाशीची राणी बनुन गावगुंडांन सामोरे गेल्यात. कोणत्याही विरोधाची आणि संकटाची तमा बाळगली नाही पण सावित्रीबाईचा छळ येथेच थांबला नाही, अशा प्रकारचा छळ नातेवाईकांनी व समाजानेही सुरु केला. या कामात सनातनी स्त्रियाही मागे नव्हत्या. ''सावित्रीबाई रस्त्याने शाळेत जात असता एखादी कर्मठ स्त्री शिव-शिव करीत त्यांच्या अंगावर दुरुन शेणाचा एखादा गोळा फेकुन मारी. त्या शेणाची घाण सावित्रीबाई न रागावता चालता चालताच स्वच्छ करु लागे. थोडेसे पुढे जात नाही तो कुणीतरी भगिनी झाडझुडी कचरा माडीवरुन त्यांच्या अंगावर पडेल अशा पध्दतीने फेकुन देई. सावित्रीबाई तिच्याकडे पाहत मंदस्मित करीत आणि म्हणत, बरं झाल बाई तुम्ही ही फुल टाकलीत, ही फुल उधळुन माझा सत्कारच केला. ही फुलं मला माझ्या विद्यार्थीनींना शिकविण्यास उत्तेजन देतील. असे बोलुन त्या झपाझप पावले टाकीत शाळेच्या दिशेने निघून जात शाळेत गेल्यावर ते घाण झालेले कपडे बदलवित.

हजारो वर्षापासून या देशातील समाजव्यवस्थेने स्त्री जातीला नानाप्रकारच्या बंधनानी बंदिस्त केले होते. त्यांचा शिक्षणाचा हक्क

हिरावून घेतला होता. तो न्यायोचित हक्क त्यांना मिळवून देण्याचा विडा सावित्रीबाईन उचलला होता. आणि या कार्याला कितीही संकटे आलीत तरी आपल्या कर्तव्यापासुन तसुभरही मागे सरायचे नाही अशी प्रतिज्ञा त्यांनी केली होती. म्हणुनच सर्व प्रकारचा त्रास त्यांनी सहन केला दुसरी स्त्री अती तर, समाजाचा रोष बघुन घरी बसली असती. पण सनातन्यांना घाबरणार ती सावित्री कसली ? मुलींच्या या पहिल्या शाळेत पहिल्या दिवशी फक्त सहा मुली उपस्थित होत्या. अन्नपुर्णा जोशी, सुमती मोकाशी, दुर्गा देशमुख, माधवी थत्ते, सोनु पवार, जानु करडिले अशी त्यांची नावे होती ''परंतु केवळ सहाच मुली आहेत म्हणून जोतिबा-सावित्री निराश झाले नाहीत. सावित्रीबाईनी अतिशय मन लावून, मुलीवर प्रेम वर्षाव करुन त्यांना शिक्षणाकडे आकर्षित केले. शाळेत आलेल्या मुलींच्या सर्वागीण प्रगतीकडे त्या जातीने लक्ष देत. घरी घरी जावून पालकांची मने वळवून त्यांच्या मुलांना शाळेत पाठवायला प्रेरीत करीत. आजारी मुलींच्या घरीजावून त्यांची प्रेमाने विचारपुस करीत. त्यांना आर्थिक मदत देत.त्यांच्या या परोपकारी कार्यामुळे लोक सावित्रीबाईचा आदर करु लागलेत. व आपल्या मुलींना शाळेत पाठवायला लागलेत. यामुळे उत्तरोत्तर शाळेत मुलींचा संख्या वाढत गेली ''भिडयांच्या वाडयात सुरु झालेल्या या शाळेत वर्षाच्या शेवटी २५ मुली शिक्षण घेत होत्या यात १० ब्राम्हण, ६ मराठा, २ चांभार, २ महार, १ धनगर, १ कोष्टी, १ साळी, १ माळी, अशी त्यांची जातवार वर्गवारी होती''

सावित्रीबाई या केवळ पाटया टाळणाऱ्या शिक्षिका नव्हत्या. तर त्यांची शिक्षणामुळेच साध्य होईल, हे त्यांनी पुर्णपणे ओळखले होते म्हणूनच शिक्षणावर भाष्य करतांना त्या म्हणतात.

।। शुद्रांना सांगण्याजोगा आहे शिक्षणमार्ग हा ।
शिक्षणाने मनुष्यत्व येते पशुत्व हाहते पहा ।
शिक्षणेसाठी जागे व्हा ।

या आपल्या कवितेत सावित्रीबाई म्हणतात,

'' असे गर्जुनी विद्या शिकण्याजागे
होऊ न झटा ।
परंपरेच्या बेडया तोडुनी शिकण्यासाठी उठा ।

हजारो वर्षापासून शुद्रातीशुद्र आपल्या मानवीय अधिकारांपासून वंचित राहिलेत ते केवळ शिक्षणाच्या अभावामुळेच. ते अज्ञानी असल्यामुळेच त्यांचे अधिकार हिरावून घेण्यात आले होते. आपले मानुसपण हरवून ते एखाद्या पशुसारखे जीवन जगत होते. परंतु आता जर ते शिक्षण घ्यायला लागलेत तर त्यांच्या पशुवत जीवनाचा पुर्णपणे नायनाट होईल व ते एक चांगले जीवन जगु शकतील अशा प्रचंड आशावाद सावित्रीबाईना होता. म्हणूनच परंपरेच्या बेड्या तोडून शिक्षण घेण्यासाठी त्या शुद्रातीशुद्रांना आव्हान करतात. यासाठीच त्या जोतिबांच्या खांद्याला खांदा लावून या ज्ञानदानाच्या लढाईत उतरल्या होत्या. गोविंदराव फुल्यांवर सनातन्यांनी बहिष्काराचे दडपण आणल्यावर जोतिबा-सावित्रीला घर सोडावे लागले. परंतु न डगमगता अतिशय धिरोदात्तपणे सावित्रीबाई जोतिबांच्या पाठिशी उभ्या राहील्यास म्हणूनच जोतिबा फुले समाजोद्धाराचे प्रचंड कार्य करू शकले.

महात्मा जोतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी इ. स. १८४८ ते १८५१ या काळात पुण्यात आणि आजुबाजुच्या परिसरात मुलींसाठी अनेक शाळा सुरू केल्यात. आर्थिक परिस्थिती चांगली नसतांनाही त्यांनी अंगिकारलेले हे व्रत धाडसाचे आणि गौरवास्पद होते. ''३ जुलै १८५१ ला बुधवार पेठेतील अण्णासाहेब चिपळुणकर यांच्या वाड्यात मुलींची दुसरी शाळा काढण्यात आली. या शाळेची जबाबदारी सावित्रीबाईकडे सोपविण्यात आली. सुरूवातीलाच या शाळेत मुलींची संख्या ४८ होती. १५ मार्च १८५२ ला वेताळपेठेत शाळा काढण्यात आली. अशाप्रकारे मुलींच्या शिक्षणाची सोय केल्यानंतर १ मे १८५२ ला जोतिबा फुल्यांनी वेताळपेठेत अस्पृश्यांच्या मुलांसाठी एक शाळा सुरू केली. संपुर्ण हिन्दुस्थानात ऐतद्देशीयांनी स्थापन केलेली अस्पृश्य मुलांची ही पहिली शाळा होय. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका होत्या.'' अस्पृश्यांच्या मुलांन कोणत्याही शाळेत घेण्यात येत नव्हते. चुकुन एखाद्या शाळेत एखादा अस्पृश्य मुलगा घेतला गेलाच तर सवर्ण आमच्या मुलाला विटाळ होतो असा कांगावा करून त्याला शाळा सोडायला भाग पाडीत आणि म्हणूनच सावित्री-जोतिबांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी स्वतंत्र शाळा काढली. अस्पृश्यतेचा कलंक धूवून काढून सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा या दांपत्याचा प्रयत्न निश्चितच भुषणावह आहे व तेवढाच क्रांतीकारकही.

ही शाळा चालवितांना सावित्रीबाईनी खुप मेहनत घेतली. लहूजीबुवा मांग व राणूजी या दोघांनी बऱ्याच मुलांना सावित्रीबाईच्या शाळेत घातले. मुलांना शाळेत यावे म्हणून सावित्रीबाई त्यांना खाऊ देत असत. पाट्या-पुस्तके मोफत देत असत. बिटी-गरीबांची मुले त्यांना कपडेही धड नसत. तेही सावित्रीबाईना पुरवावे लागत. या मुलांसाठी त्यांना पाणी ही त्यांना विकत घ्यावे लागे. कारण सार्वजनिक हौदावर पाणी पिण्यास या अंत्यजांच्या मुलांना बंदी होती. अपार कष्टांनी सावित्रीबाईनी ही शाळा चालविली. त्याचबरोबर शाळेत मुलांची संख्याही वाढली. त्यांना बसायला जागा अपुरी पडु लागली. यामुळे दुसऱ्या मोठ्या जागेची गरज भासू लागली. परंतु अस्पृश्यांच्या मुलांसाठी जागा द्यायला एकही हिन्दु तयार होईना. शेवटी उस्मान शेख या मुस्लीम सदगृहस्थाने आपली जागा देवू केली. सावित्री-जोतिबांच्या सर्व शाळाचा व्याप वाढत गेला. सावित्रीबाईचे परिश्रम आणि कौशल्य या मागे होते. आणि म्हणूनच सावित्री-जोतिबांच्या शैक्षणिक कार्याचा हा वटवृक्ष विशाल बनला. इ. स. १८४८ ते १८५२ च्या दरम्यान या दांपत्याने पुणे आणि परिसरात एकुण १८ शाळा काढल्या व चालविल्या.

एकदा सावित्रीबाई माहेरी गेली असता त्यांच्या भावाने जोतिबा-सावित्रीबाईच्या या शैक्षणिक कार्याविषयी नाराजी व्यक्त करून अनुदार काढले. तेव्हा ताबडतोब सावित्रीबाईनी त्याच्या बोलण्याचा धिक्कार करून त्याला प्रत्युत्तर दिले. त्या म्हणाल्या ''भाऊ तुझी बुद्धी कोती असुन भट लोकांच्या शिकवणूकीने क्षीण झाली आहे. शेळी, गाय यांना जवळ घेतोस, पण महार-मांग माणसं असतांना त्यांचा विटाळ आणतोस.

भट लोक सोवळ्यात असतांना तुला शिवत नाहीत, ते तुला महास्थ समजतात. विषाहिनता ही पुशत्वाची खुण आहे. तो कोण विद्या करून घेईल तो उच्चपदी जाईल. महार-मांगानी शिकावे व माणुस म्हणून जगावे या कारणास्तव आम्ही भटगुळांशी क्षणगत त्यांना शिकवितो. यात अनुचित काय आहे ? पण हे शिक्षण ब्राम्हणांना अपायकारक होणार या भितीने ते आमच्या धर्माच्या कामास अब्रम्हण्यभू करीत निंदा कुटाळक्या करतात व तुझ्यासारख्याचा मनात किल्मिश निर्माण करतात''

केवळ साक्षर करण्यासाठी त्यांनी स्त्री-शुद्रांना शिक्षण देणे सुरू केले नव्हेत, तर शिक्षणातून त्यांना समाज जागृती करावयाची होती. जुनाट रूढी, अंधश्रद्धा, जुन्या परंपरा, भोळ्या समजुती नाहीशा करायच्या होत्या. सामान्य लोक पशुतल्य जीवन जगत होते. त्यांच्यात मनुष्यत्व कसे आणता येईल या विवंचनेत सावित्रीबाई जगत होते. ''मनुष्यत्वासाठी शिक्षण हा मुलभुत विचार दिडशे वर्षापूर्वी मांडणाऱ्या सावित्रीबाई फुले या भारतातील थोर शिक्षणतज्ञ होत.'' असे म्हणणे संयुक्तीक ठरेल. शुद्रातिशुद्रांना, स्त्रियांना माणुस बनविणे, त्यांना ताठ मानेने उभे राहायला शिकविणे, आपले सत्व जपण्यास शिकविणे आणि त्याही पलिकडे माणसा-माणसात प्रेम आणि आपुलकी निर्माण करणे एवढा शिक्षणविषयक व्यापक दृष्टीकोण सावित्रीबाईच्या ठिकाणी होता. निर्भीडपणा, निर्भयता, अंगीकृत कार्यावरील अविचल निष्ठा, आणि त्यासाठी समाजाकडून अपमान, छळ सोसण्याची जिद्द हे त्यांर्चीया व्यक्तीमत्वातील गुण असाधारण होते. त्यांचा आपल्या कार्यावरील आत्मविश्वास असामान्य होता. विचाराने आणि आचारानेही सावित्रीबाई काळाच्या पुढे होत्या. त्यांचे शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील कार्य अद्भूत आणि अशक्य कोटीतील होते, तरीपण त्यांनी पुर्णत्वास नेले.

विद्यादान या आपल्या विचार प्रवर्तक निबंधात सावित्रीबाई म्हणतात. ''आळस, परावलंबन वगैरे दुर्गण न वाढविण्यास व मनुष्याच्या अंगाचे सद्गुण वाढविण्यास उपयुक्त असा कोणता धर्म असेल तर विद्यादान होय. विद्या देणारा व विद्या घेणारा या धर्माच्या योगाने खरीखुरी माणसे बनतात. या धर्माच्या शक्तीमुळे मनुष्यातील पशुत्वाचा लोप होतो. विद्या देणारा धैर्यशाली निर्भय बनून विद्या घेणारा सामर्थ्यशाली, शहाना बनतो.'' सावित्रीबाईची ज्ञानसाधना कौतुकास्पद होती म्हणूनच केवळ धुळपाटीवर नवऱ्याकडून धडे घेणारी सावित्रीबाई पहिली प्रशिक्षित भारतीय महिला शिक्षिका होण्या इतपत प्रगतीचा टप्पा गाठू शकली. आम्हा शुद्रातिशुद्रांनाही असे धाडसाम म्हणण्याचे ज्ञान शिक्षणाने प्राप्त झाले. अज्ञान, गतानुगतिकता, भ्रामक समजुती, यांर्चीया विळख्यात गुरफटलेल्या शुद्रातिशुद्रास शिक्षणानेच जाणीव होईल. म्हणून शिक्षण घेण्यास टाळाटाळी आपल्या हातून झाल्यास आपण भोगीत असलेली दुर्दशा पुढील पिढीस भोगणे क्रमप्राप्त आहे.'' अशा प्रकारच्या विचारांचा पाठपुरावा त्यांनी सतत केला.

सावित्रीबाई सार्वजनिक जीवनात वावरतांना आपल्याला वेगवेगळ्या रूपात दिसून येतात. स्त्री-पुरूष समानता प्रतिपादणाच्या प्रथम महीला, स्त्री-मुक्ती आंदोलनाच्या पहिल्या जननी

अशा वेगवेगळ्या रूपात त्या समाजकार्यात अवतरल्या. स्वत: शिकून त्यांनी समाजात स्त्री-पुरूष समानतेचा पाया घातला. स्त्री-शुद्रांना बंडखोरीचे शिक्षण देवून स्वाभिमानाचा मार्ग दाखविला. सावित्रीबाईच्या कार्याने उजळून निघालेली वाटच इथल्या तळागाळातील लोकांना आणि स्त्रियांना आत्मोध्दाराकडे नेणारी आहे.

सावित्रीबाईचा ''काव्यफुले'' नावाचा कवितासंग्रह प्रसिद्द आहे. या संग्रहातील काही कवितांमधून सावित्रीबाईनी शिक्षणाचे महत्व स्पष्ट करून हे शिक्षण प्राप्त करण्याकरीता शुद्रातिशुद्रांना आव्हाण केले आहे. ''श्रेष्ठ धन'' या आपल्या कवितेत सावित्रीबाई म्हणतात -

''अभ्यास करी विद्येचा । विद्येस देव माणून
घे नेटाने तिचा लाभ । मनी एकत्र होऊन
ति साठा जयापासी । ज्ञानी तो मानली जन ! ।।

अतिशय साध्या आणि सोप्या भाषेत सावित्रीबाई शिक्षणाचे महत्व विषद करतात. आणि एकाग्र होऊन शिक्षण घेण्याचा सल्ला देतात. एवढेच नाही तर सावित्रीबाई इंग्रजी भाषेचे शिक्षण घेण्याचा सल्लाही देतात.

''शुद्र अतिशुद्र । दु:ख निवाराया
इंग्रजी शिकाया । संधी आली
इंग्रजी शिकुनी । जातीभेद सोडा
भट घारूडा । फेकूनिया ।।

सावित्रीबाई अतिशय दुरदृष्टीच्या होत्या. भविष्यात इंग्रजी शिक्षण अतिशय महत्वाचे ठरणार आहे. त्यांनी ओळखले होते. शुद्रातिशुद्रांना आपले दु:ख, दैन्य, दास्य नष्ट करण्याकरीता आणि आपल्यातील क्षमता दाखवून देण्याकरीता इंग्रजी भाषेचे शिक्षण घेणे अतिशय आवश्यक आहे हे ही त्यांनी जाणले होते. यामुळे त्या श्रेष्ठ दर्जाच्या शिक्षणतज्ञही ठरतात.

## माझी माय

संग्राहक
**कु. रेणू बंडूजी हस्ती,**
बी. ए. भाग -३
पवनी (अड्डीपूर)

*माझी माय सावित्री होती*
*लय हो धिराची*
*लेकीबाळी शिकवाया पर्वा*
*केली ना घराची ।।१।।*
*सदा धन्याच्या*
*पाठीशी उभी पदर खेचून*
*किती केलं रे सहन*
*कधी गेली ना खचून ।।२।।*
*तिन घडविली क्रांती*
*स्वत: अ आई शिकून*
*डगमगली कधी ना*
*गोळे शेणाचे झेलून ।।३।।*
*''ज्योतिने' ज्योत पेटली*
*सावित्री झाली वात*
*रात काळोख भेदाया*
*केली तिने सुरवात ।।४।।*

# सावित्रीबाईंचं काव्य

कु. शालीनी येळेकर
बी. ए. भाग - १ फुकटा

सावित्रीबाई फुले यांना आपल्या सासू सासऱ्यांविषयी आस्था होती. ती त्यांच्या काव्यातून प्रगट होते. त्या सादर उल्लेख करतात.

'चिमा थोर माता, पिता गोविंदाजी
तयाचे कुशी जन्मला जोतिबाजी
सती धन्य माता, यती धन्य पीता
तया वंदिते आदरे जोतिकांता'

जोतिबांसारखा पती मिळाल्याचा त्यांना सार्थ अभिमान आहे. त्यांच्या संसारात पदार्पण केल्यामुळे त्या स्वत:ला भाग्यवती समजतात. प्रपंच तसा अवघडच, मुलाबाळांच्या ओझ्याने मनुष्य पिचून जातो. थकून जातो. मात्र आपल्या संसारात शांतता राखावी. तीच उत्तम संसाराची वाट आहे, असं इथं सावित्रीबाईंनी प्रभाविषत केलंय

'माझ्या जीवनात जोतिबा स्वानंद जैसा मकरंद ।
कळीतला ऐसा भाग्यवंत । असेल तुजला नसे आनंदाला ।
पारावार पोरे बाळ ऐसे । भव जंजाळाचेओझे वाहण्याचे ।
काय तुझे करून प्रपंच । आहे तो कठीण बोलून हा शीण ।
जाईल का ? शांतता आपली । ठेवावी प्रपंची हीच वाट साची। संसारात ।।

संसारात आनंद असला पाहिजे. मना मनाचे मैत्र असले पाहिजे. परस्परांप्रती आपले पण असला पाहिजे. तरच संसार सुखी होतात. एकमेकांचा आदर करावा. सन्मान राखावा पतीने पत्नीचा तर पत्नीने पती प्रती आत्मीयभाव राखावा. तरच प्रेम भावाची वृद्धी होते. सावित्रीबाई कवितेतून समाजाला संदेश देतात. सतत जोतिबांच्या सहवासात राहून त्यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर झालेला.

'काळरात्र गेली । अज्ञान पळाले सर्वा जागे केले। सूर्याने ह्या ।।
शुद्र या क्षितीजी । जोतिबा हा सूर्य तेजस्वी अपूर्व ।। उगवला ।।

जोतिबांचं व्यक्तिमत्व सूर्यासारखे तेजस्वी हे नमूद करतात त्या आणि आपल्या काव्यनिर्मितीचं सगळं श्रेय जोतिबांच्या चरणी अर्पण करतात.

धन्य ती कवियत्री सावित्रीबाई... ।

'जयाचे मुळे मी कविता रचिते जयाचे कृपे ब्रह्म आनंद चिते जयाने दिली बुद्धिही सावित्रीला प्रणामा मी करी यती जोतिबाला ।। करी शूद्रसेवा दिले धैर्य त्यानंतर क्रियाशील नेता अश जोतिबाचा नसे जात याल नसे पंथ काही तया वंदुनी सावित्री काव्य वाही ।।

जेव्हा अंत:करण एखाद्या भावनेने उचंबळून येतं, तेव्हा आविष्कृत झाल्या शिवाय रहावत नाही सावित्रीबाईंचं हे काव्य म्हणजे पती विषयीचा आत्मीय गौरवभाव प्रगट करण्याची उत्स्फूर्त उर्मी होय.

# स्त्रियांविषयी समाजाचा दृष्टीकोण

**डॉ. प्रवीण कारंजकर**
मराठी विभाग

''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता''

संस्कृत भाषेतील या ओळीचा अर्थ आहे. ''जेथे स्त्रिया संतुष्ठ असतात, जेथे त्यांना योग्य सन्मान मिळतो त्याच कुटुंबात देवतांचा निवास असतो.''

''समाजी जो पुरूषासि आदर । तैसाचि
महिलांशी असावा व्यवहार ।
किंबहूना अधिक त्यांचा विचार । झाला पाहीजे
समाजी ।।''

– (ग्रामगीता)

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्त्रिया विषयी म्हणतात. ज्या प्रमाणे समाजात पुरूषांना आदराचे स्थान असते त्याच प्रमाणे किंबहूना त्यापेक्षाही अधिक आदराचे – महत्वाचे स्थान स्त्रियांचे समाजात असायला पाहिजे.

वरील दोन्ही विचारांत स्त्रियांचे श्रेष्ठत्व सांगीतले आहे. तथापि स्त्रियांविषयी समाजाचा दृष्टीकोण समानतेचा आहे काय ? कुटुंबात स्त्रीला पुरूषांच्या बरोबरीत आहे काय ? एकूण समाजव्यवस्था स्त्रीयांना न्याय देणारी आहे काय ? या व अशाच सर्व प्रश्नांची उत्तरे नाही अशीच द्यावी लागेल.

'रांधा, वाढा, उष्टी काढा' किंवा चूल आणि मुल या पलीकडे समाजाची स्त्रीयांकडे बघण्याची दृष्टी गेलेली नाही. पन्नास वर्षापुर्वी हीच स्थिती होती आज देखील त्यात किती फरक पडला आहे ? आधीचा अशिक्षित किंवा अल्पशिक्षित वर्ग स्त्रियांकडे संकुचित दृष्टीने बघत होता. तर आजचा शिक्षित किंवा उच्चशिक्षित वर्ग उदारपणे बघू शकतो काय ? स्वत:ला शिक्षित म्हणून घेणारा वर्ग विवाहानंतर मुलगी जन्माला आली तर अनेकांची प्रतिक्रिया नाराजीचीच असते. आणि दुसरी मुलगी झाल्यावर तर परिस्थिती चमत्कारीकच असते. इतरांना आपण खुप आनंदी आहोत हे दर्शवितात मात्र 'अंतरिच्या कळा' वेगळ्याच आहेत हे लक्षात येऊ देत नाहीत या वरूनही स्त्री जन्मापासून पुरूषी मानसीकतेचा हा समाज प्रतिगामी दृष्टीकोण बाळगणारा कसा आहेत हे लक्षात येते.

सार्वजनिक जीवनात स्त्रियाविषयी सहानुभूतीचे आव आणणारे स्वनामधन्य समाजसेवक किंवा अध्यापक प्रत्यक्ष स्वता:च्या कुटुंबाबाबत मात्र आपल्या वामांगीशी सोबत पुरूषी वर्चस्वाचे वर्तन करतो स्वत:ला चार मैत्रीनी असलेल्या त्यांना चालतात यावर सौभाग्यवतीने

आक्षेप घेतला तर 'तुला पटत नसेल तर मला घटस्फोट देऊन मोकळी हो' असे म्हणायला तो मागे पुढे बघत नाही. अशा वेळी तीचा जर एखादा मित्र असला तर तिचा काळच आला म्हणून समजायचे.

समाजाचा स्त्रियांविषय असणारा हा प्रतिगामी दृष्टीकोण सहजा सहजी बदलेले असे नाही. त्यासाठी केवळ कायदे करूनही होणार नाही. पुरूषी मानसिकता बदलविण्यासाठी स्त्रियांनाही पुरूषांची बलस्थाने हेरून स्वत:मध्ये त्या-त्या क्षमता निर्माण कराव्या लागेल. यावर एकच उपाय आहे तो म्हणजे शिक्षण आणि अर्थार्जन अर्थात आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होणे. पुरूषाचे बलस्थाने असणारी शारिरीक शक्ती, शिक्षण आणि आर्थिक शक्ती पैकी पहिली सोडल्यास दुसरी आणि तिसरी बलस्थाने स्त्रियांनी प्राप्त केली तर स्त्रियांना समाजाला क्रमाक्रमाने का होईना समाजात बरोबरीचे स्थान द्यावेच लागेल. अर्थात चारित्र्य हे स्त्रीचे सर्वोच्च बलस्थान आहे हे स्त्रीने कधीही विसरू नये. दुर्गा, काली, लक्ष्मी, सरस्वती, सावित्री या नावांनी स्त्रीला दैवी दर्जा समाज पुरूषच होता. तर उपभोग्य वस्तू मानणारा व सामाजिक हक्क मानणारा बुरसटलेल्या मानसिकतेचाही पुरूषच आहे. यातील स्त्रियांचे हक्क नाकारणाऱ्यांना त्यांचे स्थान त्यांना दाखवून देणे ही काळाची गरज आहे.

स्त्रियांकडे बघण्याचा समाजाचा दृष्टीकोण बदलण्यासाठी विवेकानंदाचे पुढील विचार महत्वाचे आहेत. ते म्हणतात ''स्त्रियांनी आपली योग्यता इतकी वाढवायला हवी की, आपला प्रश्न त्या आपल्याच पद्धतीने सहज सोडवू शकतील. त्यांच्या खेरीज अन्य कुणीही हे कार्य समाधानकारक रीतीने करू शकणार नाही अन्य कुणी हे कार्य करणे योग्य होणार नाही. इतर साऱ्या देशातील स्त्रियांप्रमाणेच ही योग्यता प्राप्त करण्यास आमच्याही स्त्रिया समर्थ आहेत. स्त्रियांना शिक्षण देऊन तुम्ही बाजुला घेऊन जा नंतर पाहाल की, योग्य सुधारणा कोणत्या त्या ते स्त्रिया आपण होऊन ठरवतील त्यांच्या साऱ्या समस्यात उगीचच नाक खुपसणारे तुम्ही कोण ?'' विवेकानंदाचे वरील उद्‌गार स्त्रियांविषयी उदारवादी दृष्टीकोण व्यक्त करणारे आहेतच सोबत त्यांना नविन दिशा देणारे व त्या माध्यमातून स्त्रियांविषयीचा समाजाचा दृष्टीकोण बदलविण्यास स्त्रियांना सक्षम करणारे आहेत.

*''माणसाचे सौंदर्य त्याच्या चारित्र्यात असते. त्याच्या चांगलेपणाची कसोटी म्हणजे त्याचे अंत:करण, त्याचे रूप अथवा त्याची साठविलेली संपत्ती नव्हे. सेवेसाठी संपत्तीचा संग्रह करण्यास हरकत नाही, परंतु लोभ आणि हाव हाच धर्म मानून संपत्तीचा संग्रह करणे उचित नव्हे.''*

– संग्राहक
जुनेद पठाण, वडनेर
बी. ए. भाग-२

# आई

कु. रश्मी विनोद बुटे
बी.ए. भाग १
पोहणा

आई तुझ्याविना
माझे अस्तित्व नाही
परिक्षेचा रिझल्ट सुद्धा
तुझ्या नावा शिवाय
बघता येत नाही.

आईचे अस्तित्व
घरापुरतेच मर्यादित नाही
मुलांचा रिझल्ट बघण्यासाठी
पासवर्ड ठरली आई.

मायेचा स्त्रोत तर
दयेचा सागर आहे आई
आई इतके प्रेमळ
जगात कोणी नाही
वेदनेनंतर निघणारा
पहिला शब्द आई
तिचे नामस्मरण
ईश्वर भक्तिपेक्षा कमी नाही

आईची किर्ती
शब्दांत सांगण्या इतकी
मर्यादित नाही
आई तुझ्याविना खरचं
माझे अस्तित्व नाही
माझे अस्तित्व नाही.

# बाबासाहेब

कु. ललीता वा. सेलवटकर
बी.ए.भाग-१
धानोरा (शेकापूर)

*हृदयातून आम्ही विसरलो तुझे*
*नाव नाही तुझ्या नावाशिवाय*
*आमचा निभाव नाही*
*गर्दीत भोंदुच्या दिसतात*
*आमचेच कार्यकर्ते काही*
*मनात त्यांच्या तुला अन*
*गौतमालाही भाव नाही*
*हे दरवर्षी येतात चेहरे बदलून*
*वर्गणीवाले भाषणा पलीकडे त्यांची*
*कधी धाव नाही. काल झाली विटंबना*
*भर चौकातल्या पुतळ्याची*
*निषेध तणाव नाही*
*तुझ्या स्मृती पुढे जरी फिका*
*पडेल सुर्य येथे*
*तरी काजर्व सोडणार त्यांचा डाव नाही.*

# महात्मा ज्योतिबा फुले यांचे शैक्षणिक विचार

कु. प्राजक्ता चरडे
बी.ए. भाग - ३
पिपरी पोहणा

भारत हा थोर समाज सुधारकांचा देश म्हणून ओळखला जातो. अनेक समाज सुधारकांनी आपल्या दिव्य कामगिरीने आपल्या देशाचे नाव घेतले जाते. ज्योतिबा फुले जे आपल्या या महाराष्ट्र भुमीत जन्माला आले. काळ्या गोऱ्यांच्या स्पृश्य अस्पृश्य भेदाभेद मधे वाढले. ज्यांनी उच-निच, जातीवर्णता ही फार जवळून पाहीली. अशा थोर महान पुरूषाचा जन्म फुलांचा व्यवसाय करणाऱ्या गोरे कुटुंबात झाला. व्यवसायामुळेच फुले त्यांचे आडनांव फुले पडले. लहानपणापासूनच शिक्षणाची खुप आवड होती. वडिलांनी ही आवड लक्षात घेऊन मिशनऱ्यांच्या शाळेत इंग्रजी शिकायला टाकले. पण तिथेही गोरा-काळा भेद पाहून त्यांचे नाव काढून टाकले. पुढे घरीच शिक्षण सुरू झाले.

अशा बुद्धिवंत पुरूषाचा विवाह एक तेजस्वी स्त्रीशी म्हणजेच सावित्रीबाईंशी अगदी तेराव्या वर्षी झाला. सावित्रीबाई ह्या साताऱ्याजवळील नायगावच्या होत्या. समाजात अनेक कुप्रथेविरूद्ध ज्योतिरावांनी युद्ध पुकारले होते. त्यात सावित्रीबाई पण बरोबरीने सहभागी झाल्या.

समाजात केशवपण, सतीप्रथा, वेठबिगारी अशा कितीतरी प्रवृत्ती होत्या. त्या प्रवृत्तीचा नायनाट करायचा तर पहिले शिक्षण महत्वाचे आहे. शिक्षण आल्याशिवाय समाजाला बरा वाईट बदल कळणार नाही. केवळ पुरूषाने शिकणे हाच शिक्षणाचा उद्देश नाही तर एक स्त्री शिकणे गरजेचे आहे की 'एक स्त्री शिकली तर ती अवघ्या कुटुंबाला साक्षर करू शकते, पण एक पुरूषांचे शिक्षण हे फक्त त्यांच्यापुरते मर्यादित असे.

तेव्हा ज्योतिरावांनी सर्व प्रथम भिडेवाड्यात १९४८ ला सात मुली घेऊन शाळा सुरू केली. शाळेत आंघोळ घालणे, वेणी करून देणे, गोष्टी सांगणे, खाऊ देणे यासारखे उपक्रम त्यांनी शाळेत राबविले. मुलीची संख्या वाढली म्हणून मोठ्या प्रयत्नातून ब्राम्हण समाजाचा विरोध पत्करून भारतातील पहिली मुख्याध्यापिका तसेच स्त्री शिक्षिका म्हणून स्वत:ची पत्नी सावित्रीबाई फुले यांनी शिकवून पुढे आणले. आणि त्याच्याच या कार्यामुळे आज सर्व महिला वेगवेगळ्या पदावर कार्यरत आहे.

१८८२ साली इंग्रज सरकारने सर विल्यम हंटर यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी एक मंडळ नेमले. हंटर कमिशन म्हणून ते ओळखले जाते. १९ ऑक्टोंबर १८८२ रोजी ज्योतिरावांनी कमिशनपुढे दिलेल्या आपल्या साक्षीत विद्यापीठे ही तरूणांना केवळ पदव्या मिळवून देणारी केन्द्रे बनल्याचे सांगितले. सर्व सरकारी जागा या ब्राम्हणांची मक्तेदारी नियंत्रणात आणली पाहिजे. शिक्षणाकडे थोडे अधिक लक्ष दिले तर नीतीने आणि वागणूकीने चांगले असे लोक शिकून तयार होतील. वरिष्ठ वर्गातील लोक आपल्या शिक्षणाची

सोय स्वत:च करतील असे ज्योतिरावांनी आपल्या निवेदनात सांगितले.

हंटर कमिशन समोरील आपल्या साक्षीत ज्योतिरावांनी मांडली. शाळावरील देखरेख करणारी सरकारी यंत्रणा ही अपूर्ण आहे असे त्यांचे मत होते. शिक्षणव्यवस्थेविषयी सरकारकडून असलेल्या त्यांच्या अपेक्षा :-

१) प्राथमिक शाळांची संख्या वाढवावी. त्यासाठी देशी शाळेतील प्रमाणपत्रधारक शिक्षकांना अनुदान द्यावे.

२) शेतकऱ्यांकडून घेतल्या जाणाऱ्या शेतसाऱ्यावरील अर्धा हिस्सा केवळ प्राथमिक शिक्षणावर खर्च करावा.

३) नगर पालिकेच्या हद्दीतील प्राथमिक शाळा नगर पालिकांनी स्वखर्चाने चालवाव्यात. यासाठी सरकारने योग्य तो कायदा करावा.

४) सरकारने नगर पालिकाद्वारे आपआपल्या हद्दीतील प्राथमिक शाळांना भरपूर अनुदान द्यावे. शिक्षण खात्याच्या देखरेखीखालीच त्या शाळा असाव्यात.

अशाप्रकारे महात्मा फुले यांनी शिक्षणाचे महत्व ओळखून समाजापुढे मांडले आणि आपल्या कृतीने ते समाजापर्यंत विविध कार्याच्या माध्यमातून पोहचले म्हणून महात्मा ज्योतिबा फुले म्हणतात की, ''विद्ये विना मती गेली । मति विना निती गेली । निती विना गति गेली । गति विना वित्त गेले । इतके अनर्थ एका अविद्येने केले.

****

## घर असावे घरासारखे

**कु. कोमल वा. ताजने**
बी.ए. भाग ३
ढिवरी-पिपरी

*घर असावे घरासारखे*
*नकोत नुसत्या भिंती*

*तिथे असावा प्रेम जिव्हाळा*
*नकोत नुसती नाती*

*त्या शब्दांना अर्थ असावा*
*नकोत नुसती वाणी*

*सुर जुळावे परस्परांचे*
*नकोत नुसती गाणी*

*त्या अर्थाला अर्थ असावा*
*नकोत नुसती नाणी*

*अश्रुतुनही प्रीत झरावी*
*नकोत नुसते पाणी*

*या घरट्यातून पिल्लू उडावे*
*दिव्य घेऊन शक्ती*

*आकांक्षाचे पंख असावे*
*उंबरण्यावर शक्ती*

# स्त्रि सक्षमीकरण आणि समाज

**प्रा. विनोद मुडे**
राज्यशास्त्र विभाग

भारतात एकुण लोकसंख्येपैकी ५0% वाटा असलेली स्त्री खऱ्या अर्थाने स्वतंत्र्य व्यक्तीमत्व म्हणून जगते कां ? या प्रश्नाचे उत्तर क्षणात नाही असेच येईल. त्या सतत कोणाच्यातरी विचारांच्या अंमलाखाली, दडपणाखाली, हुकुमाखाली, वर्चस्वाखाली जगत राहील्या, हे चित्र अनेकदा बघायला मिळतेच पण पुर्वीपेक्षा परिस्थिती बदलली आणि स्त्रिया आत्मविश्वासाने वावरू लागल्या आहेत. किरण बेदी, कल्पना चावला, मीरा बोरवणकर, प्रतिभा पाटील, ममता बॅनर्जी, मायावती, जयललीता या शासकीय व राजकीय क्षेत्रातील स्त्रिया; माधुरी दिक्षित, आशा भोसले, लता मंगेशकर, कविता राऊत, पी.टी. उषा, सानिया मिर्झा या कला व क्रिडा क्षेत्रातील स्त्रिया; तसेच साधनाताई आमटे, मंदाताई आमटे, राणी बंग, डॉ. स्मिता कोल्हे, मेघा पाटकर इ. नि:स्वार्थ सामाजीक कार्य करणाऱ्या स्त्रिया उदाहरणादाखल सांगता येईल. यातील बहुसंख्य स्त्रिया त्याच्या घराचा व जोडीदाराचा भक्कम पाठिंबा मिळाला आणि म्हणूनच त्या समर्थपणे आपल्या जबाबदाऱ्यांचे आभाळ पेलू शकल्या. स्त्रियांचे अस्तीत्व, दर्जा, सन्मान, उत्पन्न, राहणीमान यासारख्या अनेक बाबतीत स्त्रिया पुढे आल्या असल्या तरी प्रश्न पडतो तो स्त्रियांना घरात आणि बाहेर समान दर्जा मिळतो कां ? त्यांना सन्मानाची वागणूक मिळते का ?

'अ' श्रेणीच्या महिला घराबाहेर कणखरपणे वावरतांना दिसतात परंतु घरात मात्र दुय्यमपणाचीच वागणूक मिळतांना दिसते. सुशिक्षित सुसंस्कृत, स्वाभीमानी असणाऱ्या स्त्रियांच्या वाट्याला देखील ही उपेक्षित व दुय्यम वागणूक येत असल्याचे आढळून येते. अजुनही अनेक समाजात व कुटुंबात स्त्रियांनी नोकरी करणे किंवा बाहेर पडणे गैर समजले जाते. गरीब वर्गातील स्त्रिया मात्र खऱ्या अर्थाने बाहेर पडून पुरूषांच्या बरोबरीने काम करतांना दिसतात. पण डोक्यावरची मोळी विकून घरी आल्यानंतर तिला चुलीजवळ जावेच लागते.

स्त्रिया घरातील कामेही तेवढ्याच जबाबदारीने करावी लागतात ती कामे करतांना तिची काहीच तक्रार नसते. कारण हे सगळे ती आपल्या कुटुंबासाठी करते व करावेच लागणार हे तिला ठाऊक असते यात तिचे समाधान श्रीमंतीपेक्षा मोठे असते. अर्थात हा देखील तिचा मोठेपणाच ! नविन पिढीतील तरूणी विभक्त कुटुंबात राहतात, त्यामुळे त्यानेही घरात मदत करायला हवी हा तीचा आग्रह अपेक्षा व गरजही असते. सुरूवातीला सगळे सुरळितपणे निभावून नेले जाते. पण हळूहळू तिच्यावर जबाबदाऱ्यांचे ओझे येऊ लागते. सगळ्या धावपळीत तिचा त्रागा व चिडचिड होते आणि ती हताश होऊन कोलमडते.

अबला तेरी यही कहानी
आँचल मे दुध और आँखों मे पानी

घराबाहेर बॉस, मॅडम असणारी, म्हणवणारी घरातून समजतेच काय स्वत:ला ? या अनोळखी वाटेपर्यंत आणली जाते. यातून विसंवाद, घुसमट, घटस्फोट, आत्महत्या इ. पर्यंत मजल जाते. थोडक्यात, स्त्रिया मोठ्या पदांवर काम करणाऱ्या असोत, घरात वावरणाऱ्या असोत किंवा शारिरीक श्रम करणाऱ्या ! किंवा श्रीमंत, गरिब, शिक्षित वा अशिक्षित असोत त्यांना घराबाहेर जो आदार सन्मान व प्रतिष्ठा मिळते ती घरात मिळत नाही. तिच्या वाट्याला उपेक्षेचे जगणे येते तारेवरची कसरत करण्याच्या त्या कसोशीने प्रयत्न करते. पण तिच्याही माणूस म्हणून विचार व्हावा, घरात मिळणारी दुय्यमपणाची वागणूक बदलावी एवढीच तीची माफत अपेक्षा असते.

आज ५०% आरक्षण मिळालेली स्त्री घरात मात्र दुर्लक्षितच असणे ही चिंतनिय व लज्जास्पद बाब आहे. स्त्रियांप्रति असणारा दृष्टीकोण बदलल्यास घरात बाहेर वावरतांना तिला वेगवेगळ्या वातावरणात वावरावे लागणार नाही व दडपण येणार नाही याचा एकुण परिणाम असा होईल की बाहेरची कामे ही ती अधिक कार्यक्षमपणे व विश्वासाने करू शकेल तसेच घरची जबाबदारीही तेवढ्याच तत्परतेने सांभाळली जाईल. यातून निकोप नाते, सुदृढ कुटुंब सक्षम पिढी व संघटीत समाजाची निर्मिती होईल पर्यायाने राष्ट्रदेखील एकसंघ होण्यास हातभार लागेल असे झाल्यास एक दिवस तिच्याच घरातील लोक तिच्याबद्दल म्हणतील

एकेक पाऊल काढत बाहेर
ती इथवर आज आली
मुलगी असून घराण्याचे
नाव काढून गेली.

# खरा कवी

**कु. दिक्षा ग. भगत**
बी.ए. भाग २, वडनेर

एका राजाला त्याच्या दरबारात खऱ्याखुऱ्या कवीची दरबारी कवी म्हणून नियुक्ती करावयाची होती. त्यासाठी त्याने दवंडी पिटवली. दवंडी पिटवताच राजाचा खास महाल हजारों कवींनी खचाखच भरून गेला. त्यातून खरा कवी कसा निवडावा हा मोठा गहण प्रश्न होता. प्रधानाला आज्ञा केली की, या सर्व कवींना चाबकाचे चार चार फटके मारा. राजाची आज्ञा ऐकताच निम्मे अधिक कवी पसार झाले. तरीही शेकडो कवी उरलेच होते. त्यांना पिटाळून लावण्यासाठी राजाने आज्ञा केली, ''या सर्व कवींना अन्नपाण्याविना आठवडाभर उपाशी ठेवा'' हे ऐकताच उरलेल्यांमधील निम्मे प्रसार झाले. तरीही १०-२० उरले. त्यातून खरा कवीची निवड करण्यासाठी राजाने आज्ञा दिली.

''या सर्व कवींना उकळत्या तेलाच्या काहिलीत टाका.'' राजाची ही जीवघेणी आज्ञा ऐकताच एका कवीखेरीज बाकीचे सर्व कवी पसार झाले. उरलेला कवी मात्र काव्यलेखनात इतका रममाण झाला होता की, त्याच्या सभोवतील घडणाऱ्या घटनांची त्याला दखलही नव्हती. राजाने त्याला राजकवी घोषित केल्यावर विनयपूर्वक तो राजाला म्हणाला, ''महाराज, राजकवी व्हायला माझी काही हरकत नाही. पण मी कुणाच्या मर्जीचा गुलाम असणार नाही. मला वाटेल त्यावेळी मी राजदरबारात येईन आणि वाटेल त्यावेळी दरबारातून निघून जाईन. माझी ही अट मंजूर असेल, तर राजकवी म्हणून माझे नाव घोषित करा !''

खरा कवी हा कुणाच्या मर्जीचा गुलाम असत नाही. या सत्याची राजाला जाणीव असल्यामुळे राजाने त्या कवीची अट मान्य करून राजकवी म्हणून आनंदाने त्याचे नांव घोषित केले.

*तात्पर्य :- खरा कलाकार हा कधीही कोणाचाही गुलाम बनू शकत नाही.*

# अन्न देणार श्रीहरी

**प्रगती गजाननराव पाळेकार**
बी. ए. भाग २
बोपापूर

अन्नाच्या शोधात दाहीदिशा भटकणारा जीव भगवंताला सहज विसरून जातो. या देवाच्या कृपेसाठी फार काही कराव लागत नाही. हे सुद्धा विसरतो. सहज मुखाने काम करता-करता होऊ शकणार बिनखर्चाच, बिनकष्टाचं, नामस्मरण हे सुद्धा विसरतो. त्यांच्यासाठी समर्थ सांगतात -

''अन्न देणार श्रीहरी ।
तोची प्रतिपाळ करी।
ज्या देवाचे आज्ञेवरी ।
मेघ वर्षती अंबरी।
तयासी चुकुली बापुडी ।
अन्न अन्न करिती वेडी ।
रामदास म्हणे ऐक ।
आदि अंती देव एका ।।''

हा मनुष्यदेह या जगातले जाणे-येणे हे एका मोठ्या व्यवस्थेचा भाग आहे. तोच परमात्मा भगवंत त्यांनेच हे सृष्टीचक्र चालविले आहे. अन्नापासून जीवाचे पोषण अन्न निर्माण करणारा पाऊस. तो वेळेवर यावा, योग्य प्रमाणात यावा यासाठी सूर्याला कार्यरत ठेवण्याची व्यवस्था त्यामुळे होणारी सर्व सृष्टीतील प्राणीमात्रांची जल (पेय) व खाद्य यांची व्यवस्था यांचे साधकाने बारकाईने निरीक्षण केले तर अन्न देणारा, प्रतिपाळ (पालणपोषण) करणारा श्रीहरी आहे हे वास्तव लक्षात येईल.

पण भ्रांत कल्पना अहंभाग, मायेच्या योगाने भगवंताला विसरून मनुष्य अन्न अन्न करत धावतांना सर्वत्र दिसतो. हे देवाचे सामर्थ्य मनुष्य कधी लक्षात घेणार ? त्याचे स्मरण कधी करणार ? त्यांचे चिंतन साधकांनी अवश्य करायला हवे.

''जो मिटेल डोळे निशाच जगती पाहे
जो बघेल त्याला दुनिया सुंदर आहे
चालतो त्याला मिळे साथ नशिबाची
आचरील त्यावर कृपा असे देवाची''

हे लक्षात घेऊन जीवनाच्या वाटचालीत भगवंताचे स्मरण सदैव ठेवून आपली यात्रा आनंद यात्रा करावी.

## रविवारची गझल

ती साद होत आहे, प्रतीसाद होत आहे
माझ्या जगावयाचा संवाद होत आहे.

जादु तिची गुलाबी, झाली असेल बहुदा
हे अंग अंग माझे, आल्हाद होत आहे.

हा साज त्या उन्हाचा अन् वस्त्र त्या धुक्याचे
त्याच्यामुळेच सारा हा वाद होत आहे.

फोडून खांब सारे, नरसिंह तूच हो रे
नुसता युगे युगे का, प्रल्हाद होत आहे.

आता न काळजी मज आगीत पोळण्याची
प्रत्येक शब्द माझा, पोलाद होत आहे.

- संग्राहक
**सुंदरा प. दाते**
बी.ए. भाग-२

# सावित्रीबाई फुले यांचे सामाजिक कार्य

**सचिन दत्तात्रय भगत**
बी.ए. भाग-१
पोहणा

परिचय :

महिला शिक्षणाच्या आद्य प्रवर्तक श्रीमती सावित्रीबाई फुले यांचा ३ जानेवारी १८१७ हा जन्म दिवस तर १० जानेवारी १८९० हा त्यांचा स्मृतिदिन. त्यांचा जन्मदिवस दरवर्षी स्त्री मुक्ती दिन म्हणून साजरा केला जातो. तर त्यांच्या १० मार्च या स्मृतिदिनी विविध उपक्रम आयोजित करून सावित्रीबाईंच्या कार्याची स्मृति जोपासली जाते.

त्यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विविध कल्याणकारी योजना शासनाने राबविल्या आहेत. सावित्रीबाई फुले यांना भारतातील पहिली शिक्षिका व शिक्षकतज्ज्ञ, स्त्रीमुक्ती चळवळीच्या प्रणेत्या, पददलितांच्या पहिल्या कैवारी, प्रौढ शिक्षणाच्या पहिल्या पुरस्कर्त्या, विधवांचा आधार म्हणून गौरविले जाते.

* सामाजिक कार्य :

१) शिक्षणाचा प्रसार :

१ मे, इ. स. १८४७ रोजी सावित्रीबाईनी सगुणाऊला मागासांच्या वस्तीत एक शाळा काढून दिली. ही त्यांची पहिली शाळा. सगुणाऊ तेथे आनंदाने व उत्साहाने शिकवू लागल्या. पुढे ही शाळा मध्येच बंद पडली.

१ जानेवारी, इ. स. १८४८ रोजी भिडे वाड्यात जोतिराव आणि सावित्रीबाईंनी मुलींची शाळा काढली. सगुणाऊंना त्या शाळेत बोलाविण्यात आले. तत्कालिन ब्रिटीश भारततली एतद्देशीय व्यक्तीने काढलेली ही पहिलीच मुलींची शाळा ठरली. या शाळेत सावित्रीबाई मुख्याध्यापिका म्हणून काम पाहू लागल्या. त्या काळात पुण्यातील अन्य भागांतही २-३ मुलींची शाळा त्यांनी सुरू केल्या व काही काळ चालविल्या.

सुरूवातीला शाळेत सहा मुली होत्या, पण १८४८ साल संपेपर्यंत ही संस्था ४०-४५ पर्यंत जाऊन पोहोचली. या यशस्वी शाळेचे स्वागत सनातनी उच्च वर्णीयांनी ''धर्म बुडाला.... जग बुडणार.... कळी आला...'' असे सांगून केले. सणातण्यांनी विरोध केला. त्यांच्या अंगावर शेण फेकले. काही उन्मत्तांनी तर अंगावर हात टाकण्याची भाषा केली. अनेक संघर्ष करीत हा शिक्षणप्रसाराचा उपक्रम चालूच राहिला. घर सोडावे लागले. सगुणाऊ सोडून गेली. अनेक आघात होवूनही सावित्रीबाई उगमगल्या नाहीत.

२) क्रुर रूढी व प्रथेवर आळा :

शिक्षणाच्या प्रसारासाठी अन्य सामाजिक क्षेत्रांतही काम करणे गरजेचे आहे. स्त्रियांच्या आत्मविकास वाढविणे गरजेचे आहे हे सावित्रीबाईंनी ओळखले. काही क्रुर रूढींनाही

त्यांनी आळा घातला. बाल-जरठ विवाहप्रथेमुळे अनेक मुली वयाच्या बारा-तेराव्या वर्षी विधवा व्हायच्या. ब्राह्मण समाजात विधवा-पुर्नविवाह अजिबात मान्य नव्हता. पतिच्या निधनानंतर अशा विधवांना सती जावे लागे किंवा मग त्यांचे केशवपन करून कुरूप बनविले जाई. विरोधाचा अधिकार नसलेल्या या विधवा मग कुणीतरी नराधमाच्या शिकार बनत. गरोदर विधवा म्हणून समान छळ करणार, जन्माला येणाऱ्या मुलाला यातनांशिवाय काहीच मिळणार नाही अशा विचारांनी या विधवा आत्महत्या करत किंवा भ्रुणहत्या करत.

जोतिरावांनी या समस्येवर उपाय म्हणून बालहत्या प्रतिबंधक गृह सुरू केले. सावित्रीबाईंनी ते समर्थपणे चालविले. फसलेल्या वा बलात्कारीने गरोदर राहिलेल्या विधवांचे त्या बाळंतपण करत. गृहातील सर्व अनाथ बालकांना सावित्रीबाई आपलीच मुले मानत. याच ठिकाणी जन्मलेल्या काशीबाई या ब्राह्मण विधवेचे मुल त्यांनी दत्तक घेतले. त्याचे नाव यशवंत ठेवले.

३) केशवपन बंद करण्यासाठी नाभिक समाजातील लोकांचे प्रबोधन करणे व त्यांचा संप घडवून आणणे, पुर्नविवाहाचा कायदा व्हावा यासाठी प्रयत्न करणे अशी अनेक कामे सावित्रीबाईंनी कल्पकतेने पार पाडली. सत्यशोधक समाजाच्या कार्यातही सावित्रीबाईंचा मोठा सहभाग असे. महात्मा फुले यांच्या निधनानंतर सावित्रीबाईंनी सत्यशोधक समाजाच्या कार्याची धुरा वाहिली. आपल्या विचारांचा प्रसार त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून केला.

४) इ. स. १८९६ सालातल्या दुष्काळात सावित्रीबाईंनी समाजाला सत्कार्याचा आदर्श घालून दिला. पोटासाठी शरीरविक्रय करणाऱ्या बाया-बापड्यांना दृष्ट्यांच्या तावडीतून सोडवून त्यांनी त्यांना सत्यशोधक कुटुंबात आश्रयास वाढविले. सावित्रीबाईंनी जोतिबांच्या सर्व कार्यात हिरीरीने भाग घेतला. स्त्रियांनी शिकावे हे त्यांचे ब्रिद वाक्य होते. अनाथांना आश्रय मिळवा हे ही त्यांचे कार्यक्षेत्र होते. सामाजिक कार्यात त्यांचा पुढाकार असे. त्यामुळेच १८७६-७७ या दुष्काळात त्यांनी खुप कष्ट केले. पुढे १८९७ मध्ये प्लेगची भयंकर साथ आली असतांना त्यांनी आपल्या स्वत:च्या प्रकृतीची ही पर्वा न करता प्लेगची लागण झालेल्यांसाठी काम केले. दुर्देवाने त्या स्वत:च प्लेगच्या भीषण रोगाच्या बळी ठरल्या.

*''सध्याचे युग स्त्री-पुरूषांच्या समतेचे आहे. अशा काळात स्त्री वर्गाला अपमानास्पद होणारा असा भेदभाव करणे हे काळाशी सुसंगत नाही. मुलगा जन्मला म्हणजे हर्षाने बेहोश व्हावे आणि मुलगी जन्मली म्हणजे शोक करीत बसावे, याचे कारण काही माझ्या ध्यानात येत नाही. दोन्हीही ईश्वराचीच देणगी. दोघांनाही जगण्याचा सारखाच हक्क आहे आणि जगाची रहाटी चालू ठेवण्यासाठी दोघांचीही सारखीच गरज आहे.''*

– महात्मा गांधी

– संग्राहक
**राहुल शेट्टे**
बी.ए. भाग-३, पिंपळापूर (वडकी)

# भारतीय महिलांचे योगदान

कु. प्रियंका सुरेशराव वैद्य
बी. ए. भाग १
मनसावळी

प्राचीन काळातील स्त्रियांना अतिशय मर्यादित व बंदिस्त जीवन जगावे लागत होते. कारण तिला त्यावेळी कोणत्याच प्रकारचे स्वातंत्र्य नव्हते. स्त्रीयांना उन्नतीच्या प्रगतीतील बाधा असल्याचे ठरविण्यात आले होते. सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक स्वातंत्र्य ह्याविषयीचे तिचे अधिकार पुर्णत: हिरावून घेतले गेले. लोकांनी तिची व्याख्याच करून ठेवली. ''पुरूषांच्या आनंदासाठी, सुखासाठी आणि उपभोगासाठी देवाने निर्माण केलेली जिवीत बाहुली'' आणि म्हणून समाजाने तिच्या इच्छा-आकांक्षाचा आवडी-निवडीचा अधिकार आणि हक्काचा विचार केला नाही.

आधुनिक काळात स्त्रियांच्या वाढत्या शिक्षणाने स्त्रियांबद्दल जागृती घडून आली. स्त्रियांच्या समस्यांचा आणि दु:खाचा विचार करण्यास सुरूवात झाली. नवनवीन विभागात स्त्रियांचे पारतंत्र व परावलंबन दुर करण्यासाठी जबाबदार नागरिक प्रयत्न करू लागले. शिक्षणामुळे स्त्रीया ज्ञानात जागृत होऊ लागल्या. आपल्या अधिकाराची तिला कल्पना आली. स्त्री म्हणजे अबला ह्या सुत्राचा पुर्णत: नाश करण्यासाठी ती सज्ज झाली. आणि नवनवीन क्षेत्रात तिने कर्तबगारी गाजवायला सुरूवात केली. ती शिक्षणामुळे आपले कार्यकर्तृत्व समाजापुढे स्वतंत्रपणे मांडू लागली. त्यामुळे स्त्रीला समाजात एक मानाचे स्थान मिळू लागले.

इंदिरा गांधींचे योगदान :-

भारताच्या पंतप्रधान पदावर दिर्घकाळ राहून नेतृत्वपदाची धुरा अनेक वर्षे सांभाळणाऱ्या भारताच्या 'पोलादी महिला' म्हणून इंदिरा गांधीचे नाव घेतले जाते. त्यांच्या कारकिर्दीचे ठसे भारताच्या विविध क्षेत्रात उमटले आहेत. एक स्त्री म्हणून त्यांनी पंतप्रधानपदाचा मुकुट यशस्वीपणे सांभाळला. इंदिराजी या विसाव्या शतकातील श्रेष्ठ मुत्सद्दी होत्या.

इंदिरा गांधींचा जन्म १९ नोव्हेंबर १९१७ मध्ये अलाहाबाद येथे झाला. त्यांच्या वडिलांचे नाव पंडित जवाहरलाल नेहरू व आईचे नाव कमलाबाई असे होते. त्यांचे आजोबा मोतीलालजी नेहरू म्हणून ओळखतात. इंदिराचा जन्म झाल्यापासून त्यांच्या आईची प्रकृती बरी राहात नसे. त्यांचे प्राथमिक शिक्षण जिनेवा येथे झाले. त्यानंतर परत आल्यावर अलाहाबाद येथे 'कॉन्व्हेंट ऑफ जिसस अँड मेरी' या संस्थेत नाव दाखल करण्यात आले. १९२९ मध्ये राजकीय घडामोडीला सुरूवात झाली. त्यावेळी पंडित नेहरूंची काँग्रेसची अध्यक्षपदी निवड झाली होती. त्यावेळी २६ जानेवारी १९३० रोजी आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे अशी देशभर स्वातंत्र्याची शपथ घेण्यात आली. गांधीजींच्या सत्याग्रहात सर्व तरूण मुले समाविष्ट झाले. त्यासोबत इंदिराजीनी सुद्धा सत्याग्रहामध्ये भाग घेतला होता. त्यावेळी इंदिरांनी लहान मुलांची 'वानरसेना' स्थापन केली. जखमी स्वयंसेवकावर उपचार करणे, स्वयंपाक करणे, गुप्त संदेश पोहचविणे अशी कामे करीत. त्यानंतर बालपणीच त्यांचा महात्मा गांधीच्या कार्यावर प्रभाव पडला. त्यानंतर काही दिवसाच त्यांचा फिरोझ गांधी यांच्याशी विवाह पार पाडला.

राजकीय क्षेत्रातील कार्य :-

८ ऑगस्ट १९४२ या दिवशी 'छोडो भारत', 'चले जाव' ही चळवळ महात्मा गांधीच्या नेतृत्वाखाली

सुरू झाली. त्यामध्ये इंदिरा गांधीनी सुद्धा भाग घेतल्यामुळे नैनीच्या तुरूंगात त्यांना ठेवण्यात आले. याच काळात आपले सर्व जीवन सार्वजनिक कार्यात घालवले. त्यांना दोन मुले होती. राजीव व संजय. याच काळात स्वातंत्र्यलढ्यातील थोर नेत्यांशी संपर्क आल्यामुळे त्यांच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. त्या काळात नेहरूंची बहुतेक परदेश दौऱ्यात त्यांच्यासोबत त्या सुद्धा जात होत्या. १९५३ साली इंदिराजी स्वत:हा रशियाला जाऊन आल्या. १९५७ साली काँग्रेस पक्षाच्या निवडणूक समितीवर त्यांची नियुक्ती झाली. वयाच्या २१ व्या वर्षी त्या काँग्रेस पक्षाच्या अध्यक्षा झाल्या आणि त्यांनी भ्रष्टाचाराविरूद्ध लढायचे ठरविले. लालबहादुर शास्त्रींच्या मृत्युनंतर इंदिरा गांधी यांनी १९६६ साली भारताच्या पंतप्रधान पदाची सुत्रे स्विकारली आणि भारताच्या पहिल्या स्त्री पंतप्रधान म्हणून महत्वाची राजकीय जबाबदारी त्यांनी स्विकारली. त्यावेळी देशासमोर अनेक समस्या होत्या. केरळमधील अत्यल्प तांदळाचा कोटा, मध्यप्रदेशात दुष्काळामुळे निर्माण झालेली परिस्थिती, महाराष्ट्रातील तांदुळ वाटपाबाबतची अकार्यक्षमता व आसामात मिळो टोळ्यांचे आंदोलन अशाही परिस्थितीत या चार राजधान्यांना पंतप्रधानपदी भेटी देऊन कौशल्यापूर्वक हाताळल्या. पंतप्रधानपदी असतांना त्यांनी अमेरीकेचा दौरा केला. भारतातील विदुषी कशा आहेत हे अमेरिकेचे उपाध्यक्ष यांनी समजावून सांगितला. परत येतांना त्या लंडन व रशिया मार्गे आल्या.

इंदिरा गांधीनी आपल्या थोर पित्यांकडून केवळ सौंदर्याचाच वारसा घेतला नाही तर चिरतरूण मन, बुद्धीवादी दृष्टीकोन, अखंड कष्ट करण्याचे सामर्थ्य, परस्परविरोधी विचारप्रणाली समजावून घेण्याची क्षमता ह्या गुणांचा वारसाही त्यांना पित्यांकडून मिळालेला आहे. तरूण पिढींची कार्यक्षमता ही प्रचंड आहे, यांवर त्यांचा विश्वास होता. करूणा आणि व्यक्तिगत गुण हे त्यांच्या अंगी होते. तसेच लोकशाहीमध्ये सामान्य माणसाची प्रतिष्ठा कशी सांभाळावी याचीही जाणीव त्यांना होती. १९७१ सालच्या बांगलादेशाच्या युद्धात त्यांनी अतुलनीय कार्य केले. त्यामुळे राजकीय ध्येयधोरणामुळे त्यांना सत्यापासून दूर रहावे लागले. पण त्यातूनही त्या बाहेर पडल्या व सर्व देशाला गरीबी हटाव, इंदिरा गांधी बचाव' हा नारा पुकारून सत्ता काबीज केली. पण शेवटी ३१ ऑक्टोंबर १९८४ साली त्यांच्याच सुरक्षा रक्षकाने गोळी घालून त्यांचा करूण अंत केला.

अशा या देशाला थोर महिलांचे योगदान म्हणून इंदिरा गांधी या लोकप्रिय पुढारी, समाजाचे आशास्थान अशा सर्व दृष्टीने त्यांचे नाव भारतीयांच्या मनात कायम बिंबवत राहील. त्याच प्रेरणेने भारत सरकारने त्यांचे देशाला दिलेले योगदान पाहून १९७२ साली मरणोत्तर सर्वोच्च असा 'भारत रत्न' हा किताब देऊन गौरव करण्यात आला.

स्त्री ही मानव आहे आणि ती पुरूषा इतकीच कामे करू शकते हे त्यांनी स्वत:च्या कृतीने सिद्ध करून दाखविले. हेच चित्र बदलण्याची प्रेरणा आपल्याला या लेखातून घ्यायची आहे.

घोषवाक्य : '''श्रममेव जयते।'' (श्रमाचा विजय होतो)

***ज्या जातीत व देशात स्त्री जातीला मान दिला जात नाही; त्या जातीला वा त्या देशाला सुसंस्कृत म्हणता येणार नाही.***

***त्याग, सहनशीलता आणि धैर्य या तीन गुणांत स्त्रिया पुरूषांपेक्षा कितीतरी पटींनी श्रेष्ठ असतात.***

– संग्राहक

कु. प्रियंका फुलमाळी

बी.ए. भाग–३, पोहणा

# विश्वविजेती महीला बॉक्सर मैरी कॉम

सुरज ग. खोडे
बी. ए. भाग ३
काचनगांव

जीवन परिचय :-

मैरी कॉमचा जन्म १ मार्च १९८३ ला काडथेई जि. चुराचांदापूर राज्य मनिपूर येथे एका गरीब कुटुंबात झाला. तीचे पुर्ण नांव मैंगते चग्नेइर्जेंग मैरी कॉम असे आहे. तिने आपले प्राथमिक शिक्षण ''लोकहक क्रिश्चियन मॉडल स्कुल व सेंट हेवियर स्कुल मध्ये पुर्ण केले व त्यानंतर शिक्षणासाठी ती आदिम जाती हायस्कुल इंम्फाल येथे गेली पण परिक्षेत नापास झाल्याने तीने शाळा सोडली व नंतर तीने शाळा राष्ट्रीय मुक्त विद्यापीठातून परिक्षा दिली. मैरी कॉमला लहानपणापासून ॲथलेटिक्स मध्ये आवड होती. परंतु मनामध्ये १९९९ पासून बॉक्सींगची आवड निर्माण झाली. ज्यावेळी त्यानी ''खुयान लम्पक स्पोटर्स कॉम्प्लेक्स मध्ये काही मुली बॉक्सींगच्या रिंग मध्ये मुलासोबत बॉक्सींग च्या दावपेचाचे सराव करतांना पाहीले आणि तेव्हा तीला वाटला कि या मुली बॉक्सींग करू शकतात तर मी का नाही करू शकत ? आणि मैरी कॉम तेथील कोचला भेटल्या आणि आपण बॉक्सींगच प्रशिक्षण द्याव अशी इच्छा बोलून दाखविली. तेव्हा कोचनी त्यांना विचारल की तु बॉक्सर का बनू इच्छिते याची पाच कारणे सांग. तेव्हा मैरी कॉम नी उत्तर दिले. आय लव्ह बॉक्सींग, आय लव्ह बॉक्सींग असे पाच वेळा म्हटल्यावर कोच खुश झाले व प्रशिक्षण सुरु झाल.

मैरी कॉमची अचाट इच्छाशक्ती, चिकाटी कौशल्याने व मेहनतीने भारतालाच नाही तर जगाला दाखवून दिल की इच्छाशक्ती व प्रतिभा चा गरीब श्रीमंत याचा काही संबंध नसतो. या सर्व गोष्टी असेल तरच आपण यशाच्या शिखरावर चढू शकतो.

पहिला विजय :-

मैरी कॉमने २००१ मध्ये पहिल्यांदा नॅशनल वूमन्स बॉक्सींग चॅम्पीयनशिप जिंकली. प्रथम आंतरराष्ट्रीय अनुभव सांगताना त्या म्हणतात मी खुप घाबरलेली होती तेव्हा मी विचार केला की माझ्याजवळ गमविण्यासारखे काही नाही पण मिळविण्यासारख खुप काही आहे. आणि याच विचाराने मैरी कॉम यानी वर्ल्ड वूमेन्स बॉक्सींग चॅम्पियनशिप मध्ये रजत पदक प्राप्त केले.

**प्रमुख विजय :-**

१) २००१ मध्ये एआईबील वर्ल्ड वूमेन्स चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

२) २००२ मध्ये ए.आय.बी.ए. वर्ल्ड वूमेन्स सिनीयर बॉक्सींग चॅम्पियनशिप स्वर्ण पदक

३) २००३ मध्ये एशियन वूमेन्स चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

४) २००४ ताईवान मध्ये आयोजित एशीयन वूमेन्स चॅम्पियनशिप स्वर्ण पदक

५) २००५ मध्ये एआयइबीए वूमेन्स वर्ल्ड

चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

६) २००६ मध्ये एआयइबीए वूमेन्स वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

७) २००८ चीन मध्ये आयोजित वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

८) २०१० मध्ये एआयइबीए वूमेन्स वर्ल्ड चॅम्पियनशिप मध्ये स्वर्ण पदक

९) २०१२ लंदन ऑलम्पिक मध्ये कास्य पदक

### सन्मान व पुरस्कार

१) २००३ भारत सरकार कडून अर्जुन पुरस्कार

२) २००६ पद्मश्री पुरस्कार

३) २९ जुलै २००९ भारताचा सर्वोत्तम खेळ सन्मान राजीव गांधी खेल रत्न पुरस्कार सन्मानीत

स्पर्धा व पुरस्कार प्राप्त करणाऱ्या या भारत मातेच्या कन्येला शतकोटी प्रणाम.

जिंदगी को तनहा मकान ना दो,
ख्यालों को अभी विराम ना दो।

मिट जाएगे सपने, खुलते ही नयन,
एहसास को झूठी, पहचान ना दो।

मोहब्बत एक अफसाना ही तो है यारों,
इसे हकीकत की जुबान ना दो।

हर सांस को जीओ, जी भर के सभी,
लिखकर पन्नों में, उसे निशान ना दो।

**कु. वैशाली रहाटे**
बी.ए. भाग-३, हिवरा

## आई

**शितल का. राऊत**
बी.ए. भाग २
टाकळी (निधा)

*आई खरच आई असते.*
*जिव्हाळयाच प्रतिक असते.........*

*आईचे असते पवित्र प्रेम*
*नसती दुजाभावाचा नेम ............*

*आई असते आई साऱ्याची ताई*
*घासातून घास दुसऱ्यास देई........*

*आई देते वृक्षास छाया*
*करते भुतलावर माया..........*

*आई सारख कुठ नात गोत*
*काही न घेता फक्त राही देत.........*

*आई नसते सरणारी उरणारी*
*असते सदैव स्मरणात येणारी......*

*आई पासून सर्व काही*
*तुजहुण मोठ कुणी नाही ...........*

# गांव झालं भुतखाना

**अमित सातपुते**
बी. ए. भाग - १
कोल्ही (खेकडी)

गांवभर फिरलो खोलात शिरलो
समस्या पाहिल्या नाना
समदं गाव झालं भुतखाना

समदा गावात फिरलो जेव्हा
दिसले कैक नसेमधी तेव्हा
कैक खेळत दिसले जुवा
दिवसा झोपलेले जीवा, शिवा, भिवा
खुटीघालु आळशी लोकांनी
मोडला गावाचा कना
समदं गाव झालं भुतखाना

जिथे होता आखाडा बनला
तिथे दारूचा अड्डा झाला
जिथे होई कुस्तीचा दंगला
तिथे दारूडे नाचती धुल्ला
भल्या भल्यांना शौक लागला
पोराबाळा यातना
समदं गाव झालं भुतखाना



झालं गरिबीत गाव हे चुर
बनली माणसं ही लाचार
फिरती बेकार शिकलेली पोर
नाचु लागलाय इथं अविचार
दिवसा ढवळ्या अत्याचार
दुःखी लेकी सुना
समदं गाव झालं भुतखाना

खोदली एकानं भली मोठी न्हाली
पडुन दुसऱ्याची बकरी मेली
बकरीसाठी मारपीट झाली
कैकाची डोकी फुटली
बकरीचं भांडण कोर्टात गेल
ज्यानं त्यांन मारल्या पिना
समदं गाव झालं भुतखाना

जिकडं तिकडं घाण आणि गटार
झाल दुषित गाव हे सार
डास जंतुंनी केला कहर
कशी दुर्दशा झाली गावांची
गावात नाही दवाखाना
समदं गाव झालं भुतखाना

# स्त्री भृणहत्या

**कु. भक्ती घरजोडे**
(बी.ए. भाग-१)
चाचोरा (पिंपळापूर) ता. राळेगांव

''जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपी गरीयसी'' जन्म देणारी स्त्री व आपली जन्मभूमी या दोन्हींचे महत्व किती आहे याचे सुंदर वर्णन वरील संस्कृत काव्यामध्ये कवीने केले आहे. परंतु या काव्याच्या विरुध्द घटना आपल्या देशात घडत आहेत. त्यातील प्रमुख आहे 'स्त्री-भ्रूणहत्या' आध्यात्मिक, सांस्कृतिक, औदयोगीक सर्व बाबतीत आघाडीवर असलेल्या आपल्या भारत देशामध्ये अशा घटना घडाव्यात यासारखे दुसरे दुदैव कोणते ?

आईच्या पोटात गर्भावस्थेतच मुली मारुन टाकण्याच्या विकृत, हिंसक, संवेदनाहीन आणि अन्यायकारक समस्येने सध्या भारताला ग्रासलेले आहे. स्त्रीचा जन्मच नाकारणे ही आधुनिक विज्ञान युगातील सर्वात क्रूर आणि नीच कृती आहे. या ज्वलंत समस्येने गंभीर रुप धारण केले आहे. ''मुलगी झाली आहे'' असे म्हणून मुलींची हत्या करणे ही एक चिंतेची बाब आहे. ग्रामीण व शहरी भागात शिक्षित, अशिक्षित कुटूंबामध्ये मुलगा जन्माला यावा असे वाटत असते तर याची कारणे पुढीलप्रमाणे

१. मुलगा वंशाचा दिवा असतो.

२. मुलगा उत्पन्नाचे साधन असतो.

३. लग्नामध्ये कायदा असुनही मुलीला हुंडा दयावा लागतो व खूप खर्च होतो.

४. मुलीच्या शिक्षणावर केलेला खर्च वाया जातो. तिच्या शिक्षणाचा आपल्याला काही फायदा नसतो.

५. मुलगा हा म्हातारपणाची काठी असतो.

६. मुलगा हा मुलीपेक्षा सशक्त असतो. तर मुली कमजोर असतात.

७. एक मुलगी पाठोपाठ अनेक मुली होण्याची भीती.

झाशीच्या राणीचा वारसा घेवुन राजकीय क्षेत्रामध्ये सुषमा स्वराज, जयललिता, सोनिया गांधी, ममता बॅनर्जी, मायावती यासारख्या स्त्रीया, तसेच बॅक इश्युरन्ससारख्या क्षेत्रात चंदा कोचर, ऑलिंपिकसारख्या क्षेत्रामध्ये आजची स्त्री ही कुठेही मागे नाही. मुलांच्या बरोबरीने ती लढत आहे. आज सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रामध्ये शिक्षक वर्गाचे खूपच मोलाचे कार्य आहे. शिक्षकांमध्ये स्त्री प्रशिक्षिकांचे प्रमाण काढले तर जास्त आहे. स्त्री-भ्रूण हत्या करुन हे रामायणातील सीता, महाभारतातील द्रौपदी, पुराणकाळातील लक्ष्मी, सरस्वती, पार्वती तसेच आधुनिक काळातील रमाबाई रानडे, सावित्रिबाई फुले, जिजाऊ यांनी शिक्षण व संरक्षण आपल्याला दिले. यांचे प्रमाण कमी करण्याचे पाप आपण न करणेच बरे. आपल्या समाजात स्त्री व पुरुषांची समानता जर बिघडली तर त्याचा परिणाम सर्वांनाच भोगावा लागणार आहे. याचा आपण उघडया डोळयांनी नीट विचार करायला हवा अवकाश यानातून अंतरिक्षात जाणाऱ्या कल्पना चावला व सुनीता विल्यम्स यांना हीच आपली मानवंदना आहे काय ?

परमेश्वर निर्मित निसर्ग हा आपले कार्य काटेकोरपणे करीत असतो. त्याच्यामध्ये ढवळा ढवळा करुन शास्त्रज्ञांनी विषमता निर्माण केली आहे. म्हणून भारतातील जन्माला येणाऱ्या मुलामुलींचे प्रमाण विषम

होत चालले आहे. काही समाजामध्ये विवाहासाठी मुलांमागे पुरेशा मुली मिळणे कठीण होत आहे. हे सर्व थांबवायचे असेल तर आपल्याला पुढचे पाऊल उचलणे आवश्यक आहे. आज मुलगा व मुलगी असा भेदभाव न करणे बरे. मोठ–मोठी हॉस्पिटल, सोनोग्राफी सेंटर बंद केली आहेत. 'स्त्री–भ्रूणहत्या' हया विषयावर अनेक संस्था पुढे आल्या आहेत. त्यांचे हे प्रयत्न स्तुत्य आहे.

आज सर्वच क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्री कार्य करीत आहे. पण आपल्यावर होणारा अन्याय ती निमूटपणे का सहन करते ? स्त्री –भ्रूणहत्येला ती का तयार होते ? ती विरोध का करत नाही ? याचाच अर्थ असा की पुरुषांच्या विचारांचा आणि जुन्या विचारांचा प्रभाव बहुतांश स्त्रियांच्या विचारसरणीवर असल्यामुळे स्त्री–भ्रूणहत्या होत आहे. जन्मास येणाअगोदरच कन्यारत्नाचा बळी घेतला जातो. स्त्री जर स्वतंत्र विचारांची असती तर तिने स्वतःच्या पोटात वाढणारा तो अंकुर नष्ट करण्याचा विचारही केला नसता. उलट त्याला विरोध केला असता. आज समाजात इतके विचित्र चित्र दिसत आहे की अगदी सुशिक्षित स्त्रियासुध्दा अशा पापकर्मात सहभागी झालेल्या दिसतात. काय तिच्या शिक्षणाचा फायदा ? मुलगा असो की मुलगी, हे दोघेही समान असा विचार जोपर्यंत प्रत्येक स्त्रीमध्ये रुजणार नाही तोपर्यंत आपण स्वतःला सुशिक्षीत, सुविचारी, सुसंस्कारी, सुसंस्कृत कसे म्हणावून घेऊ शकू ? आज एकही क्षेत्र असे नाही जिथे स्त्रिया नाहीत. मग मुलगाच कशासाठी हवा ? स्त्रीने आपली व आपल्या परिवार सदस्यांनी मानसिकता ताळ्यावर ठेवलीच पाहीजे. भ्रूणहत्या करणे म्हणजे एका स्त्रीने आपल्या स्वतःच्या हातानेच आपला अपमान करणे होय. प्रत्येक स्त्रीने ठरवले तर भ्रूणहत्या थांबवता येऊ शकेल आणि असे झाले तरच आपण म्हणू शकू की खऱ्या अर्थाने महिलामध्ये जागृती निमार्ण झाली किंवा खऱ्या अर्थाने स्त्री – पुरुष समानता आली. सर्व विवेकवादी धर्मीयांनी स्त्री – पुरुष समानता आली. सर्व विवेकवादी धर्मीयांनी स्त्री–भ्रूणहत्या रोखलीच पाहीजे. मानवतावादी चळवळ उभारली पाहिजे.

स्त्री कोणत्याही जाती धर्माची असो अडाणी किंवा सुशिक्षीत असो, गरीब असो किंवा श्रीमंत पण तीला जर एक किंवा दोन मुलीच असतील तर अशा महिलांची प्रशासनाने, सामाजिक संघटनानी दखल घेऊन त्यांना सन्मानित करुन समाजाला त्यांचा आदर्श पटवून दिला पाहिजे. यामुळे अन्य महिलांना व समाजाला प्रोत्साहन मिळेल.

मुलींना गर्भातच मारणे किंवा बालपणीच मारणे ही केवळ भारतातीलच समस्या नाही, जगातील अनेक देशात कमी जास्त प्रमाणात ही विकृती राजरोसपणे किंवा छुपेपणाने सुरु आहे. ही समस्या केवळ आजच उद्‌भवलेली आहे असे नाही. प्राचीन काळापासून विविध धर्म, वंश, गट, टोळया, देशांमध्ये ही अमानुष कृती सुरु असल्याचे संदर्भ विविध देशांतल्या इतिहासात, साहित्यात, काव्यात आढळतात. आज आधुनिक युगात, विज्ञान युगात ही स्त्री – भ्रूणहत्या व्हावी ही निंदणीय व निषेधार्थ बाब आहे. या नीच कृतीला वेळीच आवर घातला पाहिजे.

स्त्रीभ्रूणहत्येसारखे भयावह प्रकार रोखायचे असतील तर मला असे वाटते की, कायदे बदलले पाहिजे. अधिक कडक कायदे केले पाहिजे. कायदे राबविणारी, लक्ष ठेवणारी स्वतंत्र यंत्रणा उभारली पाहिजे. गर्भपाताची अशी प्रकरणे सामुदायिक गुन्हेगारी मानली पाहिजे. संबंधितांवर खुनाचे गुन्हे नोंदले पाहीजे आणि कडक शिक्षा दिल्या पाहिजेत तरच या अमानुष कृतींना पायबंद बसेल गर्भपात घडविणारे सुशिक्षीत मध्यम आणि उच्चमध्यम वर्गातले, सधन घरातले लोक आहोत ही बाब आधिक गंभीर आहे.

# नेता कसा नसावा / असावा

अमोल का. राऊत
बी.ए. भाग ३
टाकळी दरणे

नेता आळसी नसावा.
स्फुर्तिदायी असावा.
नेता लोभी नसावा.
दानशुर असावा.
नेता राजकारणी नसावा
समाजकारणी असावा.
नेता रागीट नसावा.
नेता सहनशील असावा.
नेता काम टाळणारा नसावा.
काम करणारा असावा.
नेता खोटे बोलणारा नसावा.
खरे करणारा असावा.
नेता अज्ञानी नसावा.
परमज्ञानी असावा.
नेता कामचुकार नसावा
कर्तव्यपरायण असावा.
नेता खोटे वचने देणारा नसावा.
वचने पाळणारा असावा.
नेता माया जमवणारा नसावा.
माया लावणारा असावा.
नेता कंसासारखा क्रुर नसावा.
कृष्णासारखा धोरणी असावा.
नेता अन्यायी नसावा.
शिवाजीसारखा कृपाळू असावा
नेता स्वार्थी नसावा परमार्थी असावा.

# शायरी

कु. आकांक्षा कोल्हे
बी.ए. भाग-२
भिवापूर

यह बात हवाओ को बताए रखना
रोशनी होगी चिरागो को जलाये रखना
लहू देकर जिसकी हिफाजत हमने की
ऐसे तिरंगे को सदा दिल में बसाए रखना।

तहरना है तो समुंदर में तहरो
इन गंधी नाली मे क्या पडा है
प्यार करना है तो भारत देश से करो
इन लडकीयों में क्या रखा है।

क्यो मरते हो यारो बेवफा सनम के लिए
पाच फुटठ जमीन भी नही मिलेगी दफनाने के लिए
मरता है तो यारो भारत देश के लिए मरो
हसिनाये भी उतार देगी अपना दुपट्टा कफन के लिए।

आओ झुककर सलाम कर उनको
जिनके हिस्से ये मुकाम आता है
खुशनसीब होता है वो खुन
जो देश के काम आता है।

वतन की आब्रु लुटने ना देंगे
मिटेंगे हम तुझे मिटने ना देंगे
लिखेंगे हमारे खुन से इतिहास
लेकीन तिरंगे को कभी झुकने ना देंगे।

# पंचायत राज मधील महिलांचा सहभाग

**प्रा. गणेश एन बहादे**
(समाजशास्त्र)

भारतात 'स्थानिक स्वराज्य संस्था' प्राचीन काळापासून अस्तीत्वात असल्याचे इतिहासा वरुन स्पष्ट होते. लॉर्ड रिपण यांनी १८८२ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेचा कायदा मंजूर केला. म्हणूनच त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक असे म्हणतात. ''स्थानिक पातळीवरील सार्वजनिक स्वरुपाची विषेश म्हणजे जनतेच्या प्राथमिक गरजांशी संबंधीत असलेली कामे करणाऱ्या संस्थांना स्थानिक स्वराज्य संस्था असे म्हणतात.''

पंचायतराज व्यवस्थेत गाव विकासावर भर देण्यात आला. आपल्या गावात आपलेच सरकार या पध्दतीने गावात योजना राबवीण्यासाठी सर्व गावातील लोक एकत्र येऊन योजना ठरवीत होते. परंतू महिलांना सहभागी करुन घेतल्या जात नव्हते. कारण समाजामध्ये स्त्रीकडे पाहाण्याचा दृष्टिकोण अजूनही बदललेला नाही. स्त्री ही माणव समाजाचा महत्वाचा घटक असून देखील हजारो वर्षा पासून तिला अनेक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. सरस्वती, दुर्गा, अंबा, व लक्ष्मी ची आराधना करणाऱ्या समाजाने स्त्रीयांना ज्ञान, धन, सत्ता व सामर्थ्या पासून वंचीत ठेवण्यात आले. महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या प्रयत्नाने स्त्रियांना शिक्षण घेण्याची संधी मिळाली महिला शिक्षण घेऊ लागल्या आणि महिलांचे सक्षमिकरण होण्यास सुरुवात झाली.

स्वातंत्र्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रयत्नामुळे संवीधानात महिलांना अनेक अधिकार आणि हक्क देण्यात आले. १९५० मध्ये प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदान करण्याचा अधिकार देण्यात आला. १६ जानेवारी १९५७ रोजी पंचायत राज व्यवस्थेचे स्वरुप निश्चित करण्यासाठी सरकारने बलवंतराय मेहता यांच्या अध्यक्षतेखली एक समिती नेमन्यात आली. यांच्या शिफारशी नुसार पंचायत राजसंस्थामध्ये दोन महिला प्रतिनिधी म्हणून नियुक्ती करण्याची तरतूद करण्यात आली. त्यामूळे महिलांना स्थानिक स्तरावरील ग्रामपंचायत, पंचायत समिती, आणि जिल्हापरिषदांमध्ये राजकारणात सहभाग मिळाला.

त्यानंतर राज्याचे महसुल मंत्री स्व. वसंतराव नाईक यांच्या अध्यक्षतेखाली १९६० मध्ये एक समिती नेमन्यात आली. या समितीच्या शिफारशी नुसार 'महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१' संमत करण्यात आला. आणि १ मे १९६२ पासून महाराष्ट्रात

त्रीस्तरीय व्यवस्था म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेचा स्विकार करण्यात आला.

१९९१ मध्ये शरद पवार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिलांकरीता ३० टक्के जागा राखीव ठेवण्यासाठी आपल्या कायदयात दुरुस्ती केली. राजीव गांधी यांच्या काळात महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याकरीता ६४ वी घटना दुरुस्ती विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले. परंतू हे विधेयक राज्यसभेत पास होऊ शकले नाही. त्यानंतर २२ डिसेंबर १९९२ ला माजी पंतप्रधान स्व. पी.व्ही. नरसिंहराव यांच्या पूढाकाराने लोकसभेत आणि राज्यसभेत २३ डिसेंबर १९९२ ला ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्तीला मंजूरी देण्यात आली. व २४ एप्रिल १९९३ ला राष्ट्रपतीच्या स्वाक्षरीने ७३ वी आणि ७४ वी घटना दुरुस्ती अस्तीत्वात आली.

या घटनादुरुस्तीमुळे गाव पातळीवर ग्रामपंचायत तालुका स्तराव पंचायत समिती आणि जिल्हापातळीवर जिल्हापरिषद तसेच शहर पातळीवर नगर पालीका आणि महानगर पालिका या ठिकाणी महिलांसाठी ३३ टक्के आरक्षण ठेवण्यात आले या ३३ टक्के आरक्षणामध्ये अनुसुचित जाती, अनुसुचित जमाती आणि इतर मागासवर्गिय महिलांना आरक्षण देण्यात आले. आरक्षणामुळे अनेक महिला राजकारणात आल्यात. त्यांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवीला. त्याच बरोबर पक्षीय राजकारणात देखील महिलांचा सहभाग वाढला. याचाच परिणाम म्हणून हे आरक्षण महाराष्ट्रात २४ मार्च २०११ रोजी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १७ टक्के वाढवून ५० टक्के करण्यात आले. स्थानिक स्वराज्य संस्थामधिल आरक्षणामूळेच महिला मोठया प्रमाणात राजकारणात आल्या आहेत. त्यामूळेच महिला आज अधिकार मुक्त स्थानावर असल्याचे दिसून येते.

ज्यांना हजारो वर्षे अगदी बंदिस्त जीवन जगावे लागले अशा महिलांना संधी मिळताच अत्यंत प्रतिकुल स्थितीत यशाची शिखरे गाठली. आज राजकारणातही महिला चांगली कार्ये करीत आहे. 'आम्ही पुरुषा पेक्षा मागे नाही, पूढे आहोत' हे त्यांनी जगाला दाखवून दिले. काही महिला स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमातून आपल्या आधिकार क्षेत्रात योग्य कार्य करीत आहे. अनेक प्रकारचे उपक्रम राबवीत आहेत. काही महिला कोणाच्या तरी मदतीने इंथ पर्यंत येऊन पोहचल्या. परंतू त्यात अशाही महिला आहे की, त्या स्वकर्तृत्वावर पूढे येण्याचा प्रयत्न करीत आहे.


स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये महिला सदस्यांनी अल्पावधीतच आपले कर्तृत्व सिध्द केल्यामुळे पूरुषी अहंकाराला धक्का बसला. आज कर्तृत्वसिध्द करणाऱ्या महिलांची संख्या कमी असली तरी भविष्य काळात त्यात निश्चित वाढ होईल. अनेक महिला राजकारणात आल्यामुळे त्यांना आपल्या कर्तव्याची जाणीव होऊन शिक्षण,

पाणी योजना अस्वच्छता, बालविवाह, कुपोषण, रोगराई, दारुबंदी, दळणवळण, स्त्रीयांवरील अत्याचार या सारखे अनेक प्रश्न अग्रक्रमाने मांडले जातात.

वास्तविक पाहाता, महिला योग्य पध्दतीने खऱ्या अर्थाने राजकारण करु शकतात. पुरुषांनी राजकारण हे स्वार्थी व संधीसाधू बनवीले आहे. यामूळे महिलांची राजकारणात अडवणूक केली जाते. ते महिलांचे राजकारण व वर्चस्व सहन करु शकत नाही. पुरुषांनी महिलांना सहकार्य केल्यास स्वतःच्या निर्णय क्षमतेनुसार निर्णय घेऊन राजकारण करु शकतात. अन्यथा काही ठिकाणी महिलांना आपण फक्त 'सरपंच' आहोत एवढीच माहीती असेल. आज स्त्री – पुरुषांच्या बरोबरीने वावरत असतांना मग या क्षेत्रात आरक्षणा बरोबरच खुल्या जागांवरही महिला उमेदवारांना उमेदवारी मिळावी या साठी महीलांनी प्रयत्न केले पाहीजे. या करीता गरज आहे महिलांच्या इच्छाशक्तीची.

गावातील सत्ता नको कुणा एकाची !

गावाची सत्ता साऱ्या महिला पुरुषांची !!



## ज्ञानलालसा

**कु. मधुबाला खैरे**
बी.ए. भाग २
धानोरा (शेकापूर बाई)

स्वामी रामतीर्थ जपानला चालले होते. ज्या जहाजातून ते चालत होते. त्या जहाजाच्या डेकवर त्यांनी एक जपानी वृद्ध पाहिला. जवळजवळ ९० वर्षाचे त्यांचे वय असेल हा म्हातारा चीनी भाषेचा अभ्यास करीत होता. चीनी भाषा अत्यंत अवघड आहे. तिचे साधे कामचलाऊ ज्ञान मिळविण्यासाठी पाच – दहा वर्ष लागतात. नव्वद वर्षाचा तो वृद्ध एकाग्रतेने चीनी भाषेचा अभ्यास करीत होता. रामतीर्थाना विचारले आपले वय जवळजवळ ९० च्या आसपास असेल त्या वयात चीनी भाषा शिकून काम करणार ? समजा शिकलात तरी तिचा व्यवहारात उपयोग करण्याची संधी किती मिळणार ? वृद्ध गृहस्थ म्हणाले साधी गोष्ट आहे. जो पर्यंत मी मरत नाही तो पर्यंत मला जिवंत राहावयाचे आहे. जगणे म्हणजेच शिकणे. मी जन्मलो त्याच दिवशी मी एक एक दिवस मरणार हे निश्चित झाले. मरणाचेच मी सतत ध्यास करू लागले तर मी काहीच शिकू शकणार नाही. जोपर्यंत मी जिवंत आहे तो पर्यंत खऱ्या अर्थाने मला जगायचे आहे. जगणे म्हणजे जिवनाच्या क्षणाक्षणाच्या उपयोग करणे व नवनविन ज्ञान मिळविणे मृत्युवर विजय मिळविणाऱ्या व ज्ञानावर प्रेम करणाऱ्या त्या वृद्ध माणसाकडे स्वामीनी बघतच राहीले.

# विसाव्या शतकातील स्त्री

कु. पिंगला मो. मेश्राम
बी.ए. भाग-१
आजनसरा

१८५० नंतरच्या औद्योगिक क्रांतीने घडवलेले शतक म्हणजे २१ वे शतक आता सुरू होत असून वर्तमान काळ म्हणजे त्यांचा पुर्वाध आहे.

मानवाचे राहणीमान उंचावणाऱ्या या शतकात मानवाने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या पंख्यांनी समृद्धीच्या नभात गरूडझेप घेतली. मागे राहिली ती फक्त स्त्री जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उद्धारण्यासाठी निर्माण झालेली. स्त्री मात्र अजून हवी तितकी पुढे आलेली नाही. विकसित देशामध्ये वेगळी परिस्थिती नाही. इंग्लंडमध्ये मतदानाच्या हक्कासाठी स्त्रियांना आंदोलन करावे लागते. त्यानंतरही तेथे स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने सर्वत्र प्रवेश मिळत नाही.

आशियातील देश तर काय विचारता ? स्त्रीया मागे ठेवण्यात विकसित देशांच्या कितीतरी पुढे अरब राष्ट्रांमध्ये स्त्रियांना घराबाहेर पडण्यासाठी बंदी आहे. बुरख्याची अनिष्ठ प्रथा आजही तेथे डोक्यावर घेतली जात आहे. इस्मामच्या मते तर स्त्रियांना मनच नाही. भारतातील स्थिती यापेक्षा बरी आहे. पण हुंडाबळी व सती या येथील प्रमुख समस्या आहेत.

सतीविषयी कायदा झाल्यापासून ही अमानुष प्रथा जवळजवळ बंद पडली असली तरी हुंड्याची प्रथा सर्वत्र पसरतच आहे. भारतीय कायदा पळवाटांचाच बनला आहे त्यामळे हुंडाविरोधी कायद्याच्या आधारे या प्रथेला विरोधी करण्यास कोणी पुढे येत नाही.

विसाव्या शतकांच्या पुर्वार्धात मात्र स्त्रिची स्थिती भीषण होती. स्त्रियांना शिक्षणापासून पुर्णत: वंचित केले गेले होते. केशवपनाची अघोरी पद्धत धर्माचरण मानली जात होती. तथाकथित धर्ममार्तंडामुळे स्त्री घरकाम करण्यास पाळण्यात येणारा प्राणी बनली होती. राजाराम मोहनरॉय यांच्यानंतर त्या काळात महात्मा फुले, न्यायमुर्ती रानडे यांच्या पासून महर्षी कर्वे, आगरकर यांच्यापर्यंत सर्व कर्त्या सुधारकांनी स्त्रीच्या मानेवरचे जोखड झुगारून दिले. नंतरच्या काळात स्त्रियांनी स्वत:च आपल्या पायावर उभा राहण्याचा प्रयत्न केला.

या भगीरथ प्रयत्नामुळेच आज स्त्रीची स्थिती बदललेली आहे. आज स्त्रिया हिमालयाच्या उन्मत्त शिखरांना नमवीत आहेत. व्हलेंटिना तेरे-श्कोव्हानंतर आता त्या अवकाशात जात आहेत. सप्तसमुद्रात प्रवास करत आहेत. शिक्षण वगैरे काही क्षेत्रे तर त्यांनीच व्यापली आहेत. भारत, इंग्लंड, श्रीलंका, पाकिस्तान व इस्त्राईल या देशात तर पंतप्रधानपदी त्यांनी भूषविले आहे. स्त्री मुक्ती चळवळ मात्र आज अतिरेकी बनत आहे. द्वेषभावना किंवा विध्वंसक वृत्ती चळवळ समाजरचनेला एकदम मूठमाती देण्यापेक्षा उत्क्रांतीची जास्त गरज आहे. लोक शिक्षण हे तिचे पूर्णपणे स्वावलंबी होती व स्वत:च पायावर उभ्या राहतील.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे शिक्षण विषयक विचार

**प्रा. ज्योत्स्ना काकडे**
मराठी विभाग

महाराष्ट्रातील सगळ्या संतांनी मानवी जीवन सर्वांगीण उन्नत करण्याला महत्व दिले होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनीही उन्नतीत शिक्षणाचे अनन्य साधारण महत्व मानले होते. त्यांच्या मते शिक्षण मानवाला जीवन जगण्याची दृष्टी प्रदान करते. त्याचे शिक्षणविषयक विचार एखाद्या शिक्षण तज्ञापेक्षाही मोलाचे होते.

राष्ट्रसंताची शिक्षणविषयक भुमिका सांगायची झाल्यास शिक्षण हे समाज गतिशिल करण्यासाठीच असावे असे त्यांचे मते होते. त्यांनी शालेय शिक्षणाला सतत उत्तेजन दिले

''वडीलाने मुलगा नाही शिकविला ।
तोही पापाचा भागीदार झाला ।।
जैसे जन्म देणे कर्तव्य त्याला ।
तैसेचि शिक्षण देणे अगत्याचे ।।
जरी आपुल्याने व्यवस्था नव्हे ?
तरि देशोध्दारक संस्थेसी सोपवावे ।
परि मुलास पतित न ठेवावे ।
अशिक्षितपणे कधी ही ।।''

श्रीमंत गोरगरीब सर्वांच्या मुला-मुलींनी सहशिक्षण घ्यावे, खेड्यात उच्च शिक्षणाची सोय असावी. उच्च शिक्षणासोबतच कला शिक्षण मुल्यशिक्षण यांचा समावेश असून तरूणाच्या जीवनात जीवनविद्या निर्माण करणारी शिक्षण प्रणाली असावी अन्यथा

''करावे काय शिक्षण ते ।
कधी कामासी येईना ।।
पुस्तके पाठ करूनीही ।
लाभ अंती नसे कोणा ।।''

अशी अवस्था होऊन पुस्तकी विद्या आणि व्यावहारिक जीवन यात अंतर निर्माण होईल.

बालकांच्या मनात बालवयापासून संस्काररूपी बिज पेरल्यास उत्तम संस्काराची माध्यमातून त्यांचा विकास होईल असा ग्रामगीतेत उल्लेख करतांना ते म्हणतात

''या कोवळ्या कळ्यामाजी ।
लपले ज्ञानेश्वर रविंद्र शिवाजी ।
विकसता प्रकटतील समाजी ।
शेकडो महापुरूष ।।''

शिक्षणाच्या माध्यमातून रविंद्रनाथ टागोर, शिवाजी महाराज इत्यादी महापुरूषांची निर्मिती होऊ शकते, म्हणून शिक्षकांनी अशा मार्गदर्शनाचे कार्य स्विकारावे तसेच समाजानेही आपल्या समाजाच्या कर्तव्याप्रति जागरूक राहून गरीब व मागासलेल्या बालकांना मदत करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करावा.

शिक्षणातील एक दुसरा भाग म्हणजे सर्वांनी साक्षर व्हावे म्हणून

'' या रे या प्रौढांनो ।
साक्षर होण्यासाठी सर्व जमु मातांनो ।
या मिरा, जनाई, मुक्ताबाईचा मार्ग क्रमू ।।
निरक्षराला कोणी न पुसती ।
ऐसा आला काळ आता ।

समाज-शिक्षण या साठीच ही ।
आपुल्या गावोगावी रमू ।।

असे आवाहन अक्षर शत्रू असलेल्या जनतेला करून अज्ञानाचे मढे नष्ट व्हावे या करीता त्यांनी भजनातून, किर्तनातून लोकशिक्षणाला चालना दिली.

तुकडोजींचा स्त्रिविषयक दृष्टिकोन अत्यंत आधुनिक, पुरोगामी होता. त्यांना स्त्रियांच्या सामर्थ्यांची कर्तृत्वाची व जबाबदारी पूर्ण वर्तनाची संपूर्ण जाण व भान होते. म्हणूनच ते स्त्रियांना नवराष्ट्र निर्मितीची पवित्र देवता मानायचे.

तुकडोजी महाराजांनी महिलांच्या शिक्षणावर भर दिला. पण तो भावनेच्या आहारी जाऊन नव्हे. स्त्रियांच्या शिक्षणाबाबात त्यांचा जेवढा प्रगल्भ दृष्टिकोन होता. तेवढा तर आधुनिक शिक्षण तज्ञाचाही दिसत नाही. तुकडोजी महाराज भारतीय समाजातील स्त्रियांच्या वास्तविक परिस्थितीचे व त्यातून त्यांना बाहेर काढून विकासाभिमुख करणाऱ्या आधुनिक विचारांचे भाष्यकार होते. त्यांनी महिलांच्या सर्वकष शिक्षणाचा पुरस्कार केला. तुकडोजी महाराजांनी महिलाच्या शारिरीक, मानसिक व बौद्धिक सर्वांगीण उन्नतीची अपेक्षा व्यक्त केली आहे.

राष्ट्रसंताच्या मते स्त्रियांना फक्त पुस्तकी शिक्षण देवून काही कामाचे नाही. तर ज्यामुळे चारित्र्य घडेल, मनाची शक्ती वाढेल, बुद्धीचा विकास होईल आणि स्वावलंबी बनता येईल, असे शिक्षण हवे आहे. असे शिक्षण मिळाल्यास स्त्रियांचे प्रश्न स्वत: स्त्रियांच सोडवू शकतील असा त्यांना विश्वास आहे. स्त्रियांच्या सर्वांगीण विकासासाठी समाजाची गरज असते. म्हणून राष्ट्रसंतानी स्त्री शिक्षणाचा पुरस्कार करतांना म्हटले आहे -

''महिलांचा आंतरिक गुणांचा विकास ।
करिल ऐसे शिक्षण खास ।
जरी दिले जाईल त्यास ।
तरीच भावी जग पालटे ।
महिलांचे उच्चतम शिक्षण ।
शिक्षणात असावे जीवनाचे स्थान ।
जीवनात असावे स्वारस्यपूर्ण ।
शांती दयादी भावनांचे ।।''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी राष्ट्रविकासाच्या कार्यात महिलांची भूमिका महत्वाची मानली होती. त्या करीता त्यांना महिलांचा विकास करण्याची नितांत गरज वाटत होती. या महिलांच्या विकास कार्यात शिक्षणाचे सामर्थ्य मोलाचे आहे. हे ओळखून तुकडोजींनी स्त्रि शिक्षणाचा पुरस्कार केला. शिक्षणाकडे बघण्याची तुकडोजींची दृष्टी मूलगामी व व्यापक असल्याने महिलांना सर्वकष शिक्षण देऊन कोणत्याही परिस्थितीत कर्तृत्व गाजविण्याचे बळ त्यांच्यात निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय तुकडोजी महाराजांनी मानले होते. शिक्षणातून महिला समर्थ, कर्तृत्ववान, स्वावलंबी, नीतिमान घडल्यात तर त्या भारताचे भविष्य उज्वल करू शकतात. हा महिला शिक्षणामागचा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचा आशावाद होता.



# लेकीच सावित्रीआईस पत्र

**कु. प्रिती सायंकार**
ग्रंथालय विभाग

तीर्थरूप सावित्रीआईस

सादर प्रणाम,

आई, तुझी आठवण आम्हाला नेहमीच येत असते, म्हणूनच आमच्या भावना तुमच्या स्मृती पर्यंत लेक सावित्रीची ह्या वार्षिकांकाच्या पुस्तकाच्या माध्यमातून पोहचो हीच आमची सदिच्छा.

आई, एक माझ्या मनातील खंत तुला सांगायची आहे, ती अशी की तुझी जयंती आली की तुझ्या आठवणींचा उमाळा जरा जास्तच दाटून येतो. सर्वच तुझी मनोभावे पुजा करतात, गीत गातात, एकांकीका, नाटक, भाषणे, व्याख्यानमाला असे भरगच्च कार्यक्रम चालतात. चहुकडे फक्त तुझ्यानावाने तुझ्या जीवनाचा आलेख उलगडणारे व्याख्याने घरी गेल्यावर घरच्या सावित्रीच्या कर्तृत्व विसरतात, ते बोलताना भरभरून तुमच्या म्हणजे ज्योतीबा व सावित्री आई तुझ्या आदर्श सहजीवनाविषयी मोठ्मोठ्याने आवेशात आपले विचार मांडतात; मात्र तेच विचार उतरविताना त्यांना खुप अवघड जाते.

आई, ज्योतिबा तुझ्या विचारांची किती कदर करायचे, तुझ्या तत्वांचा सदैव सन्मानच केला त्यांनी. तुझ्या मनाला, भावनांना जिवापाड जपलं. तुझ्या काळजाला घाव घेणार नाही याची सदैव काळजी घेतली. तुझे सदैव तोंड भरून कौतुक केले. तुझ्या कर्तृत्वाला पोचपावती दिली. आई, तुझ्या कुवतीचा कोटा मानून ते सदैव म्हणत की अरे बाबानों, मला हे कबुल केलचं पाहीजे की सावित्री माझ्यापेक्षा सर्वच बाबतीत काकणभर सरसच आहे. आई, एवढ्या मोठ्या मनाचा माणूस आज शोधून ही सापडत नाही गं, प्रतिसावित्री निर्माण करण्यासाठी एकही ज्योतीबा पुढे येत नाही. सर्वच माणस ऐवढ्या थिट्या मनाची असतात का ग ? आई, तुझ्यातल्या क्षमता जागविणारा, तुझी तुलाच खरी ओळख पटवून देणारा ज्योतीबा तुला मिळाला आणि तुझ्या रूपाने एक स्त्री उर्जेचा स्त्रोत प्रकटला. तुझ्यातही जी शक्ती होती ती प्रकट होण्यासाठी ज्योतीबांची तुला पावलो-पावली साथ मिळाली; मात्र आज थोड्या प्रमाणात का होईना आमची अस्मिता जागृत झाली. तरीही ती प्रकट करण्यासाठी बाहेर निघालो तर माते, आम्हाला बरेचदा रक्तबंबाळ व्हावे लागले. पावलोपावली संकटांना सामोरे जावे लागले.

आई, तुला सांगताना मला खुप दु:ख होत आहे की, तु आमच्यासाठी आयुष्यभर प्राण वेचले, दगड, चिखल आणि शेणाचा वर्षाव झेललास, प्रसंगी गुंडांना सामोरे गेली. घराबाहेर काढल्या गेली. प्रस्थापित मनुवाद्यांच्या शिव्या शापांना सामोरे गेलीस आजन्म फक्त यातना आणि दु:ख सोसले ते फक्त आमच्यांसाठी आई, मात्र तुझ्या लेकी तुझे ऋण विसरल्यात. तुझे नाव घेताना कचरतात.

तुझ्या भावनांची, कर्तृत्वाची जाण त्यांना नाही. आम्ही तुझ्या लेकी असल्याने तु मातेसारखी माया आमच्यावर केलीस; पण आम्ही तुझ्या प्रामाणिक लेकी नाही होऊ शकलो ग आई. तुला दुःख होत असेल नं ? तु आम्हाला स्वतंत्र करण्यासाठी आपल्या संसारावर तुळशीपत्र टाकलीत आणि आम्ही मात्र तुझ्या पुण्याईने नोकरीला लागलोत. गलेलठ्ठ पगाराच्या धनी झालोत; मात्र आमची बुद्धी आज तुझ्या कार्याचा वसा समोर नेण्यासाठी धजत नाही तर गाडी, साडी आणि माडी हेच आमचे विश्व बनत चालले आहेस. तु आम्हाला रहाटगाडगे चुल आणि मुल या बटबटीत जीवनातून मुक्त केले. मात्र आम्ही तेच जीवन पुन्हा स्विकारतो आणि इतर लहान अज्ञानी भगिनींसाठी झटत नाही; झिजत नाही. आई, असे का झाले असावे ? सांग ना गं तु मला ?

तु आमच्यात स्फूलिंग चेतविलेस. मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे यासारख्या तुझ्या लेकी वाकबगारी, साहित्यिक आणि कर्तृत्ववान झाल्या. तेव्हा तर साधन तोकडी होती. हातात आयुधे नव्हती. आज तुझ्या पुण्याईने तुझी लेक आकाशात भरारी घेते, आकाशाला गवसणी घालते. माऊस हातात घेऊन जगभरात आपली छाप सोडते. मग ती अधिक स्वाभिमानी आणि स्त्री-जातीकरीता झटणारी का बनत नाही ?

आई, ही माझी सखी जागृत नसल्याने आम्ही एकसंघ, संघटित नाही. आम्ही पृथक-पृथक आहोत म्हणून येथे अजुनही अनेक बहिणींवर अत्याचार होतो. एक बहीण दुसरीसाठी धावून जात नाही. याचाच फायदा येथील पुरूषजात घेऊन आजही अत्याचाराला आमची भगिनी बळी पडते. पुरूषजात, स्त्रियांची मानसिकता स्त्रीच्या विरोधात तयार करते. त्यामुळे एक स्त्री दुसऱ्या स्त्रीची प्रसंगी शत्रूही बनते. आज पुरूषप्रधान संस्कृतीला खत पाणी घालणारी मानसिकता स्त्रीमध्ये वाढते आहे. स्त्रीच स्त्रीला संपवू पाहत आहे. आई आपल्या मुलीला गर्भातच मारते आहे. कितीतरी सावित्रीला ती मूठमाती देते. अशाने स्त्रीजात धोक्यात आल्याशिवाय राहणार नाही.

आई, तु आम्हास स्वातंत्र्य मिळवून दिल, बोलक जग दिल, भरारी घेण्यासाठी आमच्यात हक्काच मोकळ आकाश दिल. मात्र त्यासाठी आज आम्ही सावित्रीच्या लेकी एकत्र व्हायला हव्या. आई, तू आम्हाला कानमंत्र दे. एकीच बळ सांगण्यास पुन्हा ये धरतीवर. तुझ्याजवळ मनातील अस्वस्थता बोलून दाखविली. मन मोकळ झाल, शांत झालय.

– तुझ्याच लेकी

*"ज्याला पराजयाचे कधीही स्वप्न पडत नाही, पराजयाची कल्पना ज्याच्या मनाला कधी शिवत नाही, तो अजिंक्य आहे. त्याला विजयाचीही पर्वा नसते; कारण विजयाच्याही पलीकडचे जग त्याला मिळावयाचे असते. विजयाला तो तृणासमान मानतो. यामुळेच विजय त्याच्या पाठीस लागून येतो. 'न मागे तयाची रमा होय दासी–' ज्याला इच्छाच नाही, त्याची लक्ष्मी दासी होते. फळ सोडले की ते नेमके जोडले जाते."*

– संग्राहक

**कु. रूपाली वरघणे**

बी.ए. भाग-३, हिवरा (आजनसरा)

# बेकारी

**पुनम अनंतराव तळवेकर**
बी. ए. भाग - २
फुकटा

आज आपण समाजात राहत असतांना अनेक प्रकारच्या बेकायदेशिर बाबी पाहत असतो. याचाच अर्थ की बेकारी वाढलेली दिसून येते. कारण की आजच्या युगात तरूण हा सुशिक्षित असूनही बेरोजगारच आहे. कारण नौकरी मिळत नाही. काम करायला आर्थिक भांडवलाची मदत करायला कोणी तयार नाही. आजचा तरूण हा बेरोजगारीतून मुक्त होईल की नाही असा फार मोठा प्रश्न आज या तरूणांना उद्भवला आहे. कारण आजचे शिक्षण दर्जेदार नाही. सगळ्या पदव्या आणि अनेक प्रकारच्या परिक्षा ते सहज बुद्धीचा जोरावर तिला दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करून आपल्या जिवाची बाजी लावतात. म्हणजेच पूर्ण परिक्षेची तयारी करण्यासाठी आपला जीव ओततात पण शेवटी काय परिक्षेत पास होवुन अपयशच पदरी येते.

आज आपल्या राज्यात नोकऱ्या संबंधीच्या बाबतीत इतकी भ्रष्टाचारी वाढलेली आहे की, यात काही शंका नाही. आजचा तरूण हा खुपच प्रयत्नशील आहे. तो सर्वपरी प्रयत्न करून सुद्धा शेवटी आर्थिक भांडवलासाठी त्याला मुकावे लागते. हे असे आणखी कुठपर्यंत चालायचे.

डॉ. आंबेडकर म्हणतात की, ''शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे, जो पिणार तो गुरगुरल्या शिवाय राहणार नाही.''

पण त्या दुधात सुद्धा भेसळीचा प्रमाण वाढले आहे. भ्रष्टाचाराची भेसळ राज्यातील, देशातील नेत्याची ही भेसळ किंवा या बेकारीमुळे तरूणांमध्ये व्यसनाधीनतेचे प्रमाण वाढतात. चोऱ्या, डकैत्या आपल्या दैनंदिन गरजा पुर्ण करण्यासाठी किंवा पैशासाठी स्वत:च्या भावालासुद्धा मारण्यास मागेपुढे पाहत नसतात. कारण त्यांच्याकडे पैसा नाही. काम नाही. मग इतके शिक्षण घेवून सुद्धा निकामीच शेवट जमिनीला आपले मित्र मानुन मैत्री करतात.

शिक्षित व्हा, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा सिद्धांत डॉ. आंबेडकरांचा अंमलात आणण्याची गरज आहे. कारण शिक्षित तर कधी चेच झालो, आता फक्त गरज आहे संघर्ष करण्याची, कारण संघर्ष केल्याविना सुशिक्षितांना रोजगार मिळणे कठीण आहे.

म्हणून तरूणांनो आज जागे व्हा, या भ्रष्टाचाराला मुळातून उपटून फेकू आणि आज प्रतिज्ञा घ्या आणि ती प्रतिज्ञा आचरणात आणा आणि आपल्या थांबलेल्या भविष्याला पुढे वाटचाल घ्या, पुढे वाटचाल घ्या.

*''आपण केवळ चांगले, सुस्वभावी आहोत. एवढ्याने भागत नाही. आपण कार्यक्षम आहोत की नाही, कार्याला लायक व समर्थ आहोत की नाही, हेही पाहिले पाहिजे.''*

- संग्राहक
**अविनाश गानफाडे**
बी.ए. भाग-१, किन्ही (जवादे)

# स्त्रियांची उपेक्षा

**कु. वैजयंती वैकुंठराव मांडेकर**
बी. ए. भाग १
चाचोरा (पिंपळापूर) ता. राळेगांव

आज आपण एकविसाव्या शतकात येऊन पोहचलो. या आधीच्या चालीरिती, परंपरा आपली संस्कृती जपत आपण अठरावे, एकोणविसावे, विसावे शतक पार करून एकविसाव्या शतकात पर्दापण केले. यात खूप काही बदलले. आपल्या देशाने विज्ञान युगात खुप प्रगती केली. आपला देश शिक्षणाने खुप पुढे गेला. या शिक्षणात आपण विदेशी संकल्पना देखील आत्मसात केल्या. आणि देश पुढे गेला. आपण आज देखील इतर देशाप्रमाणे प्रगती करू शकतो. विकसनशिल देशापासून विकसीत देश बनवू शकतो पण आपण या गोष्टी पासुन कुठेतरी मागे पडत आहोत का ? कुठेतरी सुधारणा करायची राहिली का ? तर ते स्त्रीच्या बाबतीत.

पुर्वीच्या काळात सुद्धा स्त्रीला अनेक संकटांना सामोरे जावे लागत. यात सीतेला सुद्धा अग्निपरिक्षा द्यावी लागली. त्यानंतर द्रोपदीचे वस्त्रहरण, घरातील जेष्ठ व्यक्ती समोर भरदरबारात तिचे केस ओढून तिला अपमानीत केले. तिच्यावर अन्याय झाला. आज एकविसाव्या शतकात सुद्धा अपमान सहन करावा लागत आहे. पुर्वी दहातोंडाचा रावण होता म्हणून आपण त्याला ओळखू शकलो. आणि ठिकठिकाणी आता रावण तयार झाले आहेत. त्या रावणापासून आपले रक्षण करण्यासाठी स्त्रीला कशाचा तरी आधार घ्यावा लागतो. पुर्वीच्या अनेक प्रथा आता बंद झाल्या. सती जाणे, केशवपन, बालविवाह इ. प्रथेला तोंड देत स्त्री जगत राहिली, आपण म्हणू तेव्हा समाज अशिक्षित होता. पण, आज काय वेगळ होतयं ?

समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले, सावरकर, आगरकर, महर्षी कर्वे यांनी 'स्त्रीला' आत्मविकासाचा मार्ग दाखवला आणि 'स्त्री' त्या मार्गावर चालू लागली. नवे विचार आत्मसात करू लागली. 'चुल आणि मुल' यापेक्षाही समोरचं जग तिला समजायला लागल. पण स्त्री ही आता सुद्धा पुर्णपणे सुरक्षित नाही. या समाजात वावरतांना किती कठिण प्रसंगातून ती फिरते. घरातील कामासाठी असो वा शाळा, कॉलेजसाठी ती घरून निघाली की अशा नजरेतून ती वाचण्याचा प्रयत्न की जी तीला स्वत:पासून तीला दुर नेईल. अंगावर शहारा उभा राहिल असा दिल्ली हादरून सोडणारा 'निर्भया' प्रकरण. त्यातील जे दोषी होते त्यात अल्पवयीन मुलगा सुद्धा होता. त्यांना हे अनैसर्गिक कृत्य करताना जरा त्या मुलीची दया आली नाही. त्या नराधमांना हे लक्षात आले नसेल की आपल्या बहिणी प्रमाणे ही कुणाची तरी मुलगी असेल, बहिणी असेल, हिची कुणीतरी घरी वाट बघत असेल. मानव जातीला काळीमा फासणारी ही घटना. त्यांना शिक्षा झाली पण हे वाईट कृत्य थांबले का ?

रोजचे वर्तमान पत्र वाचण्यासाठी घेतले की वर्तमानपत्रात राजकीय घडामोडी व इतर बातम्या कमीच पण हे वाईट कृत्याच्या बातम्या जास्त. बलात्कार ही बातमी तर वर्तमान पत्राच्या प्रत्येक पानावर दिसेल. स्वत:च्या वडीलांच्या हातून हे

कृत्य घडेल तर या सारखी लाजीरवाणी दुसरी कुठलीच गोष्ट नाही. स्वत:चा भाऊ सुद्धा हे काम करतांना जरा सुद्धा घाबरत नाही. जरा सुद्धा लाज नाही. पुर्वीच्या अनेक प्रथा बंद झाल्या पण बालविवाह हा अजुन सुद्धा थांबला नाही. सरकारने एक कायदा काढला की मुलीचा विवाह हा वयाच्या १८ व्या वर्षानंतर आणि मुलाचा विवाह २१ वर्षानंतर पण खेड्याच्या ठिकाणी अशिक्षित पणामुळे मुलगी याला बळी पडत आहे. ती १८ वर्षानंतर मानसिक आणि शारिरीकदृष्ट्या पुर्णपणे तयार होईलच असे म्हणता येत नाही. याला सुशिक्षित आणि अशिक्षितही स्त्रीया अपवाद नाही.

हुंडा यासारखी प्रथा आतासुद्धा आपल्या देशात चालू आहे. एखाद्या मुलीची लग्न जुळल की आता अस म्हटल तर वर पक्षातील व्यक्ती म्हणतो आता देण्याघेण्याचं बघा. या बोलण्यान मुलीचा बाप तर ठंडाहून जातो. कस करायचं इकडे तिकडे जुळवून लग्नाच्या हुंड्याची तयारी करतो. इतके करून जमल नाही तर शेती सुद्धा गहान ठेवायची ताकद तो ठेवतो. ही तर खेड्यातील गोष्ट अशिक्षित लोकांची पण शिक्षित लोक सुद्धा काही वेगळ करत नाही. संसाराचा गाडा ओढता ओढता थकलेल्या वार्धक्यातही मुलांचच ऐका... ऐकाच ऐका कुठवर ? आयुष्याच्या कुठल्याच टप्प्यावर तिला सुख नाही. तिच्यासाठी 'स्वातंत्र्य' हा शब्द केवळ शब्दच राहीला आहे. त्यात हुंडा ही मुलांची मागणी असतेच.

या शतकात स्त्रीला खुपच महत्त्व दिले. मुख्य म्हणजे या शतकात स्त्रीला आत्मविश्वास गवसला. आज घरातील, प्रत्येक कुटुंबातील स्त्री स्वत:च्या सामर्थ्याविषयी जागृत झाली आहे. आज बुरख्यातील मुस्लिम स्त्री, तालिबानची दडपलेली स्त्री ही बोलू लागली आहे. या शतकातील स्त्रीची अस्मिता फुललेली असली तरीही ती पूर्ण सुखी आनंदी आहे का ? गेली कित्येक वर्ष महिला बिल लोकसभेत रखडत आहे. आज सुविद्य स्त्रीला कामाच्या जागी अनेकदा नको तो अपमान सहन करावा लागत आहे. एकतर्फी प्रेमातून बलात्कार, खुन होत आहे, कुमारी माता या समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. कुटुंब टिकविण्यासाठी ती झटत आहे. कोठे हुंडाबळी करावे लागत आहे. घर आणि 'करियर' सांभाळत ती जगते आहे. अगदी 'किरण बेदी' सारख्या असामान्य कर्तृत्व असलेल्या स्त्रीलाही अनेकदा स्त्री म्हणून होणाऱ्या अन्यायाविरूद्ध लढावे लागले आहे.

या सर्व संकटातून स्त्रीला आता स्वत:ची सुरक्षा स्वत:च करायची आहे. तिचे अस्तित्व तिला टिकवून ठेवाचे आहे. तुमच्या भुतकाळापेक्षा वर्तमान सुधारला गेला पाहिजे आणि यात वर्तमानातून उज्ज्वल वाटचाल झाली पाहिजे, हीच अपेक्षा.

मै थी, मै हु, मै रहुँगी।
कोमल है कमजोर नही तू
शक्ती नाम ही नारी है
जग को जीवन देनेवाली
मौत भी तुझसे हारी है।

# झाड

कु. आशा श. खोंड
बी. ए. भाग - २
टेंभा

आपलं एकटेपण दुर करायचे असेल तर... झाडाशी बोलावे त्यालाच सांगावी आपल सुखदु:ख कारण झाड असत तस एकटच ... आपली सुखदु:ख संकट झेलायची.... सोसायची शक्ती त्याला जन्मजातच मिळालेली असते... म्हणूनच तर कुठलीही झळ सोसत ते एकटच उभं असत... तटस्थ पावसाचा मार सहन करीत वाटसरूंना कवेत घेवून त्यांना आधार देणार झाड..... वादळाचा अतिरेक सोसत आपली मुळं घट्ट रोवून उभं राहणार झाड.... थोड्याशा दु:खाने उन्मळून पडणाऱ्या माणसाच्या दुबळेपणाला हसत असतं....

आपण जेव्हा हरतो तेव्हा झाडाला बघावं पुन्हा उमेदीने.... उभं राहण्यास पायात बळ येईल....छाटलेल्या झाडलेल्या फांद्याचे दु:ख उराशी घेऊन ते रडत बसत नाही. पुन्हा उमेदीनं नव्या पालवीच्या आशेने आनंदाने डोलत.... देण आणि देण हाच त्याचा धर्म असतो. कदाचित.... म्हणावेसे वाटते.... म्हणूनच म्हणावेसे वाटते..

झाड म्हणजे थकलेल्या वाटसरूला
घटकाभराचा विसावा
झाड म्हणजे घामेजल्या जीवाला
मायेच्या पदराची हवा
झाड म्हणजे पाखरांच्या संसाराला
हक्काची साथ
झाड म्हणजे गायीच्या पाणीला
कुरवाळणारा हात.

वेळ काढून झाडाच्या डोळ्यात बघावं.... त्याच्या नजरेत बघावं... आपण किती स्वार्थी, मतलबी आहोत याची कल्पना येईल. स्वत:च दु:ख पचवून दुसऱ्याला आधार देणं झाडालाच जमतं... आपल्या आधाराला येणाऱ्या जनावरांना, पक्षांना, माणसांना ते सारखचं प्रेम देतं.... कुठलीही अपेक्षा न करता.... आपण मात्र दुसऱ्याचे सुख बघुन दु:खी होण्यात धन्यता मानतो... मुके पक्षी कारण त्यांच्या नाजूक पंखांना झाडाचा आधार असतो कारण....

झाड असतं तटस्थ.....
झाड नेहमीच असत तरूण
इतरांची दु:ख बघुन....
त्यालाही येत भरून
कारण झाडालाही असतं हृदय...
झाडालाही असत मन...
झाडालाही सोसावे लागतात
संकटाचे धन....
तरीही ते कळत नाही....
आयुष्यावर कुठत नाही...
झाड माणसांच्या जगात राहून
माणुस म्हणून एकदा तरी माणसाने
झाडाच्या डोळ्यात बघांव....
भ्याड होऊन जगण्यापेक्षा...
झाड होऊन जगावं....

# संस्कार


निखिल तु. खाडे
बी.ए. भाग ३
अल्लीपूर


'मना घडवी संस्कार' मनाच्या एका कप्पात दडलेले आहे. जेव्हा केव्हा 'संस्कार' हा शब्द कानावर पडतो, तेव्हा हृदयात झोपलेले शब्द जागृत होऊन जणू ताला-सुरात गायला लागतात.

तेज स्पर्शाने दूर होई अंधार
जैसा मुळांचा वृक्षास असे आधार
शिल्पास आकारे जैसा, शिल्पकार
मना घडवी संस्कार !

जन्मापासून ते मृत्युपर्यंत आपली जी काही जडणघडण होते तिला संस्कार म्हणतात. आपण जसे वागतो, बोलतो, राहतो, त्यावरून आपल्यावर कशाप्रकारचे संस्कार करण्यात आले आहेत याची जाणीव समोरच्या व्यक्तीला होते म्हणूनच तर आपल्या हातून काही वाईट गोष्ट घडल्यास किंवा आपण कोणाशी वाईट वागल्यास आपल्याला एक वाक्य नेहमीच डकवले जाते, 'हेच संस्कार दिलेत वाटतं तुझ्या घरच्यांनी तुला' परंतु संस्कार फक्त माता-पिताकडूनच मिळत नाही तर ते समाजातील प्रत्येक घटकांकडून आपल्यावर होत असतात. परंतू आपल्या आयुष्याला योग्य असे चांगले वळण देण्यासाठी, चांगले संस्कार योग्य वयात द्यायला आज कोणाजवळच वेळ नाही. आपण खुप पुढारलो. पाश्चात्य संस्कारांनी सुधारलो. पण हा सुधार अपुरा आहे असे नाही वाटत आपल्याला ? आपल्या या अपुऱ्या सुधारणेपायी 'संस्कार' देण्यात मुख्य भूमिका निभावणाऱ्या समाजाची आज काय गत झालीत माहीत आहे आपल्याला ? इथे बाळ पाऊल उचलायला शिकत नाही तो त्याला पाळणाघरात किंवा नर्सरीत टाकलं जाते. एक अनोळखी व्यक्ती मशिनप्रमाणे एकाचवेळी दहा ते वीस बाळांचा सांभाळ करते, ती एकटी एवढ्या बाळांमध्ये तुमचा बाळाला किती वेळ देऊ शकत असेल ? जसे आईचे वात्सल्य फक्त आईच देऊ शकते, तसे आईने द्यायला हवे ते संस्कार आणखी कुणाला कसे देता येतील ? 'संस्कार' तर आईच्या प्रेमातून, बाबांच्या अनुभवांमधून आणि आजी आजोबांच्या गोष्टींमधून वेचून द्यावयाचे असतात. आज गल्लोगल्ली पर्सनॅलिटी डेव्हलपमेंटचे वर्ग घेतले जातात तेथे एटीकेट्स आणि मॅनर्सची खूप घोकंपट्टी करवून घेतली जाते. विद्यार्थ्यांकडून तरिही आपली मुले उद्धट का वागतात? पडतो ना असा प्रश्न पालकांना त्याचे कारण असे आहे की, त्या क्लासेस किंवा वर्गामध्ये विद्यार्थ्यांना ते एटीकेट्स आणि मॅनर्स फक्त कामापुरते वापरायला शिकवले जातात.

३०-४० वर्षाच्या आधी कुटुंबामध्ये रिकामा वेळ टीव्ही बघण्यात जात नसून तो वेळ आजी आजोबाच्या गोष्टी ऐकण्यात जायचा. खुप मजा यायची तेव्हा, काही वेळांसाठी राजा, राणी, राजकुमार, परी, राक्षस, देव, दानव, डाकू, जादूगर आणि बोलक्या प्राण्यांच्या जगात स्वत:ला विसरून जायचो. पुर्वीच्या काळी शाळा भरायची ती बोराच्या झाडाखाली, डोंगरमाथ्यावर, चिंचेच्या झाडावर आणि तिथं सोबत असायचा हा निसर्ग म्हणूनच या निसर्गावर अतोनात प्रेम आहे आमचे. पण तो

ही लोप पावतोय या सिमेंट कॉँक्रीटच्या वास्तवात आजी आजोबाच्या गोष्टी हरवल्यात ते ही अडकलेत आता इंटरनेटच्या जाळात. ज्यामुळे आपल्या संस्कारांमधील उणीव दिवसेंदिवस वाढत आहे. जेव्हाही आजच्या पिढीला सर्व मर्यादांना पायाखाली तुडवून 'मेरे मन को भाया, मैंने कुता काट खाया' अशा तऱ्हेने जगतांना बघते, तेव्हा मनात येतं आमची मुलं सुद्धा अशी वागतील का ? चोरून किंवा उद्धटपणाने आमच्या समोरच दारू, सिगारेट्स पितील का ? आम्ही बांधू शकू का त्यांना आमच्या आईने दिलेल्या मजबूत संस्कारात ? कधी तरी आपण वाट भरकटले होते. नको त्या वळणावर जाणार होतो पण आईची प्रतिमा डोळयासमोर आली आणि आपण स्वत:ला सावरले हीच येणाऱ्या पुढील पिढीकडून अपेक्षा.

चंदुच्या बायकोची मराठी थोडी कच्ची होती. तीला फुलस्टॉप कुठे द्यायचा ते कळत नव्हते. तरी तीने चंदुला पत्र लिहीले आणि फुलस्टॉप देऊन टाकले मध्ये मध्ये ....

प्रिय प्राणनाथ

तुमची आठवण येते मैत्रिनिला.
काल मुलगा झाला आजीला.
दम्याचा त्रास होतोय कुत्रीला.
आज चार पिले झाले मामाजीला.
दाढी करताना ब्लेड लागला वहीनीला.
दवाखान्यात भरती केले बकरीला.
आणि हजार रूपयात विकले तुम्हाला.
नमस्कार !

तुमची लाडकी बायको
मुन्नी

कु. प्रिया निमसडकर
बी.ए. भाग-२, सोनेगांव (रा.)

## चांदण्या रातीत

गंगाधर खु. ढवस
बी.ए. भाग ३
मुद्यापूर (वाढोणा)

चांदण्या रातीत
आभाळ आले आकाशात
झरझर ते वाहून गेले
मी होते झोपेत
गारवा वाढला मनात.

ढग नाचे आकाशात
मन झाले आनंदी
मी होते स्वप्नात
वाऱ्याच्या पहाऱ्यात.

फुलांच्या सुगंधात
मन झाले बेधुंद
मी होते पिंजऱ्यात
आनंदाश्रु डोळ्यात
पारा आला जोरात
दिसले नाही कोणी
मी होते भिजत ......

# स्त्री पुरूष समानता

**कु. टीनाली खडके**
बी. ए. भाग - ३
दोंदुडा

स्त्री आणि पुरूष या दोघांनाही समान महत्त्व निसर्गाने दिले आहे. आजची स्त्री कुठल्याही क्षेत्रात मागे राहिलेली नाही. सर्वच क्षेत्रात स्त्रिया कर्तृत्वाचा ठसा उमटवतांना दिसते. पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रिया काम करतात. परंतु आजही समाजात स्त्री-पुरूष समानता दिसून येत नाही. याला कारणीभूत आहे पुरूषप्रधान संस्कृती, यामधील चालीरिती, रिवाज यात पुरूषांना उजवे आणि स्त्रियांना डावे स्थान दिले आहे. परंतु अर्धांगिणी, सहचरणी, संगिनी समजल्या जाणाऱ्या पत्नीला कुठल्याही विधीप्रसंगी पतीच्या डाव्या बाजूला बसविले जाते तिला उजव्या बाजूला बसण्याचा अधिकार का नाही ? कारण प्रथम स्थान पुरूषाचा तर दुय्यम मान स्त्रिचा. पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या रूढी परंपरेमुळे स्त्रियांची मानसिकता ही पुरूषांना श्रेष्ठत्त्व देण्याची आणि स्वत:कडे कनिष्ठत्त्व घेण्याची झालेली आहे.

लग्नापूर्वी आई वडिलांच्या घरी खुप मोकळीक असते. जेव्हा मुलीचं लग्न होते, तेव्हा त्यांना पतीच्या आज्ञेत राहावे लागते. समाजात स्त्रियांचे आजही चुल आणि मुल एवढेच कार्यक्षेत्र दिसते.

नोकरी करणारी स्त्री जरी असली तरी तिला आपले घर सांभाळून नोकरी करावी लागते. स्त्री घराबाहेर जास्त वेळ राहिल्यास हजारो प्रश्नांचा भडीमार तिच्यावर केला जातो. घरात तर मग महाभारतच सुरु होते. परंतु पुरूषाला मात्र एकही प्रश्न विचारण्याचा अधिकार स्त्रीला नाही. बाहेरून फिरून आलेल्या पुरूषाला त्याच्या स्वागता करीता बायको हजर पाहिजेच. या उलट बाहेरून आलेल्या बायकोला नवरा घरी असलाच पाहिजे अशी अपेक्षा करता येत नाही. स्त्रिला आपल्या वर्चस्वाखाली ठेवण्यातच पुरूषाला पुरूषार्थ वाटतो की काय ?

पुरूष मरण पावला तर स्त्री आपले घर आणि मुले दुहेरी भूमिका सांभाळून अगदी व्यवस्थितपणे सांभाळते. मात्र स्त्री मरण पावली तर पुरूष मात्र ह्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडूच शकत नाही. तो आपले घर वाऱ्यावर सोडून दुसऱ्या लग्नाच्या शोधात भटकंती करतो. अशी कित्येक उदाहरणे आपल्याला समाजात पाहावयास मिळतात. लग्नाच्या वेळी स्त्रियांच्या गळ्यात मंगळसूत्र (बंधन) घातले जाते. पुरूषाला मात्र कुठलेही बंधन घातले जात नाही. स्त्रिला पुरूषाच्या पाऊलावर पाऊल टाकून चालावे लागते. त्याच्या वर्चस्वाखाली स्त्रीला आपले जीवन जगावे लागते. बाहेरून आलेल्या पत्नीसाठी चहा करणारे किंवा स्वयंपाक करून ठेवणारे पती दुर्मिळ आहेत. समाजात स्त्री कडे बघण्याचा दृष्टीकोन संकुचित स्वरूपाचा आहेत.

स्त्री म्हणजे पुरूषाच्या हातचे खेळणे आहे. मनात येईल तेव्हा, मागतील ते, जे पाहिजे ते देणे तिला बंधनकारक आहे. असा पुरूषी अहंकार आहे.

पुरूषाने मोठा गुन्हा जरी केला तरी त्याला ते क्षम्य असते. परंतु स्त्रिची छोटीशी चूक तिला अक्षम्य असते. उच्च समाजातील स्त्री पुरूषांमध्ये समानतेच्या भावनेने वावरत असली तरी कुठेतरी ती बंधन रूपी जाळ्यात अडकलेली असते. म्हणून स्त्री-पुरुष समानता होणे अशक्य बाब आहे. त्याकरीता केवळ बोलण्यापेक्षा आचरणात आणणे अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याकरीता केवळ जनजागृती महत्वाची आहे. या गोष्टीचा विचार प्रथम प्रत्येकाने आपल्या घरापासून सुरूवात करावी. प्रथम समाजातील पुरूषांचा स्त्रियांकडे पाहण्याचा तसेच स्त्रियांचाही इतर स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणे गरजेचे आहे स्त्रियाबाबतचा पारंपारीक समज सोडून देऊन स्त्रियांना पुरूषांप्रमाणे समान दर्जा देणे आवश्यक आहे. निसर्गात प्रत्येक गोष्टीला आधार हवा असतो. एकाशिवाय दुसरा अपूर्ण असतो. एक आहे म्हणून दुसरा आहे. स्त्री आहे म्हणून पुरुष आहे. स्त्रि शिवाय पुरूषाचे अस्तित्त्व नाही.

*एक मच्छर आँधी मे फस गया उसने एक पेड को पकडे रखा था।*
*आँधी बंद होने पर पसीने पोंछते हुए मच्छर कहने लगा, आज अगर मैं ना होता तो ये पेड गीर ही गया होता.*

---

शिट्या वाजून वाजून बेजार करतो, तरी पण आईला तोच आवडतो. कारण त्याच्याशिवाय आईच कामच होत नाही.

सांगा पाहू मी कोण ?

कु. माधुरी हिवरकर
बी.ए. भाग-२, वडनेर

प्रेशरकुकर

# जाणाऱ्या वर्षाला सलाम

**योगेश सरदार**
बी.ए. भाग-१, शेकापूर (बाई)

जाणाऱ्या वर्षाला सलाम
येणाऱ्या वर्षाला सलाम
झालेल्या दंग्यांना सलाम
करणाऱ्या गुंडाना सलाम
कपडे घातलेल्या नंग्यांना सलाम
लुच्च्या लफंग्यांना सलाम
चाकु,छुरे, बरछाला सलाम
जाणाऱ्या वर्षाला सलाम ।

झाल्या भाववाढीला सलाम
वाढविल्या दाढीला सलाम
लाल दिव्याच्या गाडीला सलाम
सरकारच्या पाडापाडीला सलाम
होणाऱ्या स्फोटांना सलाम
वाढत्या ढेरपोट्यांना सलाम,
नंबर दोनच्या नोटांना सलाम
थुंकी बदलणाऱ्या बोटांना सलाम ।।

ॲसीड फेककर्त्याला सलाम
जाणाऱ्या वर्षाला सलाम
कुणाच्या ममतेला सलाम
कुणाच्या समतेला सलाम
सांसदीय गमतेला सलाम
जनतेच्या नमतेला सलाम
विकासाचा डंका वाजवणाऱ्यांना सलाम
घोटाळा करणाऱ्यांना सलाम ।।
भ्रष्टाचार करणाऱ्यांना सलाम
शेतकऱ्यांच्या जीवनाशी खेळणाऱ्यांना सलाम
खालपासून वरच्याला सलाम

जाणाऱ्या वर्षाला सलाम
येणाऱ्या वर्षाला सलाम

# महिला सक्षमीकरण

**गणेश सुरकार**
बी. ए. भाग - ३
धानोरा (घिनमिने) ता. राळेगांव

जगामध्ये महीला सक्षमीकरणाची सुरुवात १९८५ मध्ये महीला आंतरराष्ट्रीय सम्मेलनाच्या निमीत्याने नैरोबी येथे झाली. महीला सक्षमीकरण म्हणजे महीलांना पुरूषाबरोबर वैधानिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, मानसिक, शारिरीक क्षेत्रामध्ये निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणे. भारतातील स्त्रीया स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच अनेक रूढी-प्रथा परंपरा बंधनात होत्या. अनेक समाजसुधारकाच्या अविरत प्रयत्नातून रूढी-परंपरांना काही प्रमाणात मुक्त करण्यात आले. परंतु आजही भारतातीय स्त्रीया पुरूषप्रधान संस्कृती वर्चस्वाखाली जीवनयापन करीत आहे. ग्रामीण व अर्धशहरी भागामध्ये जास्तीत जास्त स्त्रीया अशिक्षित, अडाणी, दुर्बल अशक्त बेरोजगार बेकारी इत्यादी समस्यांनी ग्रषित आहे. भारतीय समाजामध्ये स्त्री-पुरूषामध्ये भेदभाव केला जातो. पुरूषाच्या तुलनेत स्त्री दुर्बल मानली जाते. भारतीय संविधानामध्ये स्त्रीला पुरूषासोबतच समान मौलीक अधिकार दिलेले आहे. तरी सुद्धा आजही समाजामध्ये स्त्री चा दर्जा कनिष्ठ समजला जातो.

सन २००१ हे वर्ष भारत सरकारने महीला सबलीकरण वर्ष म्हणून घोषीत केलेले आहे. या वर्षापासून महीलांना अधिक कार्यक्षम आणि सक्षम बनविण्यासाठी प्रयत्न करण्यात आले परंतु यांचा प्रभाव शहरामध्ये व महानगरामध्ये दिसून आला. परंतु ग्रामीण भागात त्यांचा फारसा प्रभाव दिसून आलेला नाही. स्त्रीयामध्ये आत्मविश्वास आणि स्वाभीमान स्वावलंबन जागृत करणे आवश्यक आहे. स्त्रीला शिक्षण, आरोग्य पुरेसा आहार वैचारिक, आर्थिक, सामाजिक, राजकीय स्वातंत्र्य दिले पाहिजे. कुटुंबाच्या निर्णय प्रक्रियेत स्त्रीला सहभागी करून घेतले पाहिजे. तरच महिला खऱ्या अर्थाने सक्षम होईल.

महिला सक्षमीकरणासाठी विविध पैलुचा विचार करणे आवश्यक ठरते.

⁕ शिक्षण :

महिलाच्या सबलीकरणासाठी महिलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणे अतिशय आवश्यक आहे. शिक्षणाशिवाय कोणताही समाज आपली आर्थिक सामाजिक राजकीय सांस्कृतीक प्रगती करू शकत नाही. वर्तमान काळात भारतात ६५% स्त्रीया आणि ८२% पुरूषा साक्षर आहे.

⁕ शोषणापासून संरक्षण :

भारतामध्ये मोठ्या प्रमाणात स्त्रीयांचे शोषण होतांना दिसून येते. यामध्ये घरगुती शोषण बाह्य शोषण महिलाची छेडछाड, बलात्कार, यौन शोषण, बालविवाह, सामाजिक अन्याय,हुंडा पद्धती, असुरक्षा अशा शोषणापासून स्त्रीयांचे संरक्षण केले पाहिजे. आणि या शोषणाविरूद्ध कडक कार्यवाही करून कायद्याची अंमलबजावणी त्वरीत केली पाहिजे.

⁕ स्त्रीभ्रृणहत्या :

स्त्री सबलीकरणासाठी स्त्रीभ्रूण हत्या रोखणे अतिशय आवश्यक आहे. भारतातील स्त्री-पुरूष प्रमाण १०००-९७३ ऐवढे आहे. स्त्रीभ्रृण हत्या रोखण्यासाठी

समाजामध्ये व्यापक मोहीम राबविणे आवश्यक आहे.

* कुपोषण दुर करणे :

भारतामध्ये आज २६% लोक द्रारिद्र्यरेषेखाली आहे. बालमृत्यु दर आणि माता मृत्युदर यांचे प्रमाण जास्त आहे. युनिसेफच्या अहवालानुसार भारतात प्रतिवर्ष १० कोटी मुल जन्म घेतात त्यामद्ये १/३ मुल हे कुपोषित असतात.

* रोजगार :

भारतामध्ये उत्पादन कार्यात स्त्रीचा सहभाग महत्वाचा आहे. शेती, उद्योग, सेवा अशा प्रत्येक क्षेत्रात महिलांचा सहभाग वाढविणे आवश्यक आहे. त्यांना रोजगार देवून स्वावलंबी बनविणे आवश्यक आहे. तरच स्त्रीयामध्ये आर्थिक सक्षमीकरण होईल.

सारांक्ष रूपाने असे म्हणता येईल की महिला सक्षमीकरणाचा प्राथमिक उद्देश्य महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये सुधारणा करणे हा होय. यासाठी ग्रामीण क्षेत्राचा विकास करणे आवश्यक असून या विकास प्रक्रियेत महिला सहभाग वाढविणे अपेक्षित आहे.

## बेटियाँ

भेद-भावना रहित समाज सेवा होनी चाहिए,
जितना पुरूष मुक्त उतनी स्त्रियाँ भी होनी चाहिए।
जन्म से ही क्यो इस तरह पीडित होती है, नारियाँ,
बेटा हो तो शुक्रिया जो बेटी हो, तो गालियाँ।
बेटियों को बोझ कहते हुए शर्म आनी चाहिए,
जितना पुरूष मुक्त उतनी स्त्रियाँ भी होनी चाहिए।

मांगे जो खिलौना बेटा मिलती कार गाडियाँ,
बेटी के मांगने पर मिलता चुल्हा चौका झिडकियाँ
जिंदगी की चाह में फर्क ना होना चाहिए
जितना पुरूष मुक्त उतनी स्त्रियाँ भी होनी चाहिए।

**- गणेश शेळके**
बी.ए. भाग-३, वडनेर

**कु. राखी र. कुलसंगे**
बी.ए. भाग १
पिंपळापूर (वडकी)

१) मला जर आयुष्य
घडवायचे असेल तर
माझ्यात आत्मविश्वास हवा
सोबतच जीवनाचा प्रवास
एकटीने करण्याचे बळ
देखील हवे.

२) गुलाबाचे फुल
तोडायचे असेल तर
काट्यांचा विचार सोडून द्यावा
त्याशिवाय फुल तोडता
येणार नाही.

३) कोणतीही गोष्ट अशक्य
आहे म्हणण्यापेक्षा
ती आपल्याकडून
होत नाही म्हणणे
अधिक चांगले.

४) मनुष्याला सर्वात जास्त
दु:ख तेव्हा होते
जेव्हा ते एखाद्या
व्यक्तिकडून अपेक्षा करतो
आणि ती पुर्ण होत नाही.

५) नात्यांचे घर
टिकवायचे असेल तर
विश्वासाचा पाया
मजबूत हवा, नाहीतर
संपूर्ण घर कोसळून पडेल.

# नियमित आणि संतुलित आहार जीवनाला आवश्यक

**प्रा. आरती देशमुख**
(गृहअर्थशास्त्र विभाग)

मानवी जीवनात आहार ही मूलभूत बाब आहे. अन्न, वस्त्र, निवारा या प्राथमिक गरजामध्ये आहार प्रथम स्थानी आहे. याचे कारण मानवी शरीराची जडणघडण आणि पोषण हे आहारावरच अवलंबून असते अन्न हे केवळ पोट भरण्याचे माध्यम नाही तर आरोग्यदायी जीवन लाभावे म्हणून आपण नियमीत व संतूलीत आहार घेणे फार आवश्यक आहे. मानवाच्या शारीरिक, मानसीक, बौध्दीक, सामाजीक व नैतिक विकासासाठी संतुलीत आहाराचे सेवन करणे आवश्यक आहे.

खाण्यामागे दोन शास्त्रे आहेत. अन्नशास्त्र व आहारशास्त्र अन्नशास्त्र म्हणजे अन्नपदार्थाच्या निरनिराळया कृतीचे शास्त्र, ते रुचकर, चविष्ट कसे लागतील याचे शास्त्र तर आहारशास्त्र म्हणजे जो आहार आपल्याला शारिरीक ताकद, मानसिक सामर्थ्य, बौध्दिक तत्परता, रोगप्रतिकारशक्ति, सौदर्य आणि आरोग्यपूर्ण दिर्घायुषी जीवन देतो त्यांचे शास्त्र आहार म्हणजे जे द्रव्य मुखावाटे, अन्ननसिकेद्वारे पोटात पोचते, जे रक्त, मांस, मेंदू, अस्थि, मज्जा निर्माण करुन शरीराचे पोषण करते व जे रोज विभीन्न कार्यामुळे उत्पन्न झालेली शारीरिक निर्बलता दूर करुन शक्ती वाढवते आणि प्राणाला जिवंत ठेवते.

जसा माणसाचा आहार तसेच त्याचे आचार, विचार आणि आरोग्य 'You are what you eat but you are also what you dont eat' शरीराचे पोषण किंवा शरीर रोगग्रस्त करणे या दोन्ही गोष्टी आहाराच्याच आधीन आहेत.

पथ्येसती गदार्तस्थ किंमोषधि निषेवणम्

पथ्ये असती गदार्तस्थ किंमोषधि निषेवणम्

पथ्याने राहिले म्हणजेच योग्य आहार घेतला तर औषधांची गरज कमी राहिल आणि कितीही औषधे घेतली पण पथ्य केले नाही तर त्या औषधांचा उपयोग होणार नाही.

जीवनाचा संतूलन आणि सुत्र राखण्यासाठी आहार संतूलीत असण महत्वाचे ! जगभर वेगवेगळे पदार्थ प्रकार खाल्ले जातात पण सगळीकडच्या मनुष्याची शरीररचना सारखीच आहे. पोटाला एकच भाषा कळते ती म्हणजे किती प्रोटीन्स किती कार्बोहायड्रेटस, किती स्निग्ध पदार्थ, जीवनसत्त्वे, क्षार खाल्लेत ही. आपल्याला हे आहारघटक धान्ये, डाळी, भाजीपाला, फळे, दूध, तेलतूपातून मिळतात. या आहारघटकातून एकूण ४० तरी पोषकघटक असतात व ते दररोज शरीराला आवश्यक आहेत. ते एका टीमप्रमाणे काम करतात. याच करता जास्तीत जास्त खादय पदार्थ मिश्र पध्दतीने तयार करायला हवेत. आणि त्यात भरपूर विविधता असणही आवश्यक या पोषकतत्त्वांचा आपल्या शरीरातील अणूरेणूंशी संबंध आहे. त्यांचे आहारातील प्रमाण व संतुलन कमी झाले तर रोग उद्‌भवतात. ही पोषकतत्वे गोळया व इंजेक्शनद्वारे घ्यायचे नसतात. कारण त्यायोगे केवळ १५-२५टक्के त्याचे शोषण होते. आहाराद्वारे घेतल्याने त्याचे शोषण ८०-८५ टक्के होते. प्रोटिन्स, कार्बोहायड्रेटस व फॅटस् यातून शरीरात उर्जा मिळते पण जोडीला जीवनसत्वे आणि क्षार असतील तरच

ही सर्व पोषकतत्त्वे एकमेकाला पूरक असतात, ती एकटी दुकटी कामच करु शकत नाहीत.

ढोबळमानाने कार्बोहायड्रेटसच्या पचनाकरता, त्यातून उर्जा बनण्याकरता भरपूर 'ब' जीवनसत्वे हवीत. प्रोटिन्सच्या कार्यासाठी 'अ' व 'क' जीवनसत्वे हवीत तर स्निग्धांकरीता 'ई' जीवनसत्व आवश्यक. प्रत्येक खादयपदार्थाचे त्यांच्या अणूरेणूत बदल होण्यासाठी भरपूर जीवरासायनीक क्रियांमधून त्यांना जाव लागत आणि प्रत्येक अशा क्रियेसाठी खूप जीवनसत्वे, क्षार, एन्झाईम्स, कोएन्झाईम्स व कोफॅक्टर्स लागतात. तेव्हाच क्रिया पूर्णत्वास जातात. म्हणजेच संतुलीत आहार हवाच.

प्रत्येक व्यक्तीचा आहार व त्याला लागणारे उष्मांक हे देश, जाती, वय, हवामान, त्याचे कार्य यावर अवलंबून असते व ती उर्जा आहाराद्वारे मिळत असते त्यापैकी ६० ते ६५ टक्के उर्जेचा स्त्रोत कार्बोहायड्रेटस मधून तर १५-२० टक्के प्रोटीन्स मधून आणि १५-२० टक्के स्निग्ध पदार्थातून असावा म्हणजे तो समतोल आहार होतो. आपण जगभर जे खातो ते म्हणजे धान्ये, डाळी, कडधान्ये, भाजीपाला, फळे, दही, दूध, तेल, तूप यामुळे खादय पदार्थांचे सेवन सर्वदूर केले जाते, याचेच वेगवेगळे खादयपदार्थ व्यंजन बनवून आपण खातो. मांसाहार हा चांगला नव्हे म्हणून तो धरतच नाही. याच सहा खाण्याच्या पदार्थातून ६ पोषकतत्त्वे मिळतात. ती म्हणजे कार्बोहायट्रेडस् प्रोटीन्स, फॅटस्, जीवनसत्वे, क्षार, रेषा, तंतूमय पदार्थ पण त्या पदार्थांचा समतोल आवश्यक, त्यातील धान्याचे प्रमाण सर्वात जास्त हवे असते. त्यातील कार्बोहायड्रेटस्पासून मुख्यत्वे उर्जा मिळते. डाळ २ वाटया तरी हवी त्यातील प्रोटीन्सची गरज आपल्याला जन्मापासून मृत्युपर्यंत दर ३-४ तासांनी असते. कारण आपल ५० टक्के शरीर प्रोटिन्सपासून बनलेले आहे. शरीरातील सर्व पेशींचा ऱ्हास होत असतो व नवीन पेशी विशिष्ट काळाने बनत असतात. म्हणून रोज २-३ वाटया तरी डाळ हवी वाढीच्या वयात ती जास्त लागते ही गरज इतर कडधान्य, तीळ, शेंगदाणे, दूध दही यातून पुरवली जावू शकते. केसापासून नखापर्यंत प्रत्येकाचा संबंध आहार घटकांशी आहे म्हणून सर्व पदार्थाचे व घटकांचे संतूलन आहारात आवश्यक आहे. अन्न नैसर्गिक रुपात घेतल्यावर त्याचे संतूलन आपोआपच राखल जात. आहार दिवसभरात विभागून घेणे आवश्यक कारण या संतूलनाचा संबंध निसर्गातील चक्राशी आहे. निसर्गात जे जेव्हा जेव्हा पिकत तेव्हा तेव्हा ते मनुष्यानी घ्यावे. त्याच्या विरोधात जावून समतोल बिघडतो आहारात विविधता हवी म्हणजेच सर्व आहारघटक मिळण्याची सोय होते. खाण्यापिण्याच्या वेळाही सांभाळणे तेवढेच गरजेचे सुर्योदय सुर्यास्तानुसार शरीरातील वेगवेगळे द्रव व पेशी कार्यरत असतात.

संतुलीत आहार घेणे ही जीवनपध्दती असल्यास रोगांना दूर ठेवता येईल. ते अवेळी होणार नाहीत, जीवन सुसहय होईल. हा समतोल आहार घेताना प्रक्रिया केलेले पदार्थ, खूप प्रिझर्व्हेटिव्हज घातलेले खादय पदार्थ घेवू नये त्याने समतोल बिघडतो.

*'या मतलबी दुनियेत*
*पुष्कळ जिवलग मिळतात*
*काम झाल्यावर क्षणात*
*ओळखी विसरतात.'*

# सुर्यपुत्र भय्यासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य

**श्याम राजेंद्र भांबेवार**
बी.ए. भाग ३
धानोरा (शेकापूर)

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे महान पिता लाभलेले भय्यासाहेब उर्फ यशवंतराव यांचा जन्म १२ डिसेंबर १९१२ रोजी परळ मुंबई येथे माता रमाईच्या पोटी झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना भय्यासाहेब (यशवंतराव), रमेश, गंगाधर, इंदु व सर्वात धाकटा राजरत्न अशी पाच अपत्ये झाली. त्यात सर्वात मोठे भय्यासाहेब वगळता इतर चार अपत्ये दोन वर्षाची असतांनाच मरण पावले. भय्यासाहेब लहानपनापासुन थोडे विकलांग होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी यशवंतला प्रथम एलफिस्टन व नंतर परळ येथिल आर.एम. भट हाईस्कुलमध्ये टाकले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर विदेशात शिक्षण घेत असले तरी त्यांनी पुत्र यशवंतराव व पुतण्या मुकुंदराव यांच्या शिक्षणावर विशेष लक्ष दिले. २७ मे १९३५ रोजी माता रमाईचे निधन झाले व माता रमाईच्या निधनांचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर व यशवंतरावांना फार मोठा धक्का बसला. साहजिकच यशवंतरावाचे मातृछत्र हरविल्यामुळे यशवंतरावर आघात झाला, परंतु अशा परिस्थितीत डॉ. बाबासोहब आंबेडकर यांनी आपला लाडका एकुलत्या एक मुलाकडे संपुर्ण लक्ष देऊन यशवंतरावाना ज्या व्यावसायिक क्षेत्राची आवड होती त्या क्षेत्रात काम करण्याची परवानगी दिली. यशवंतरावाची प्रकृती नेहमी बरी राहत नसल्यामुळे त्यांना निष्णात डॉक्टरकडे नेऊ न उपचार केले व प्रकृती ठिक केली.

यशवंतराव आंबेडकर यांनी आपल्या कार्याची सुरवात इ.स.१९४४ साली 'जनता' या पत्राचे मुद्रक, प्रकाशक आणि संपादक या महत्वाच्या पदावरुन केली. 'जनता' पत्रातुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सम्रग सामाजिक लढयाची इतभुत माहीती सर्वसामान्य माणसापर्यंत पोहचवून दलित चळवळीला बळकटी प्राप्त करुन देण्याचे ऐतिहासिक कार्य केले. तत्कालीन शोषित समाजाच्या अन्याय – अत्याचाराची ठळक माहिती वृत्तपत्रातुन प्रसिध्द् करुन या समाजाच्या सामाजिक, आर्थीक, शैक्षणिक व राजकिय हक्कांची मागणी वृत्तपत्रातुन केली त्यांनी त्यांच्या संपादकीय काळात अनेक चांगले वैचारीक विशेषांक काढून समाजाचे प्रबोधन केले. बुध्दभुषण प्रिंटिग प्रेसचे ते व्यवस्थापक होते. संपादक व व्यवस्थापक अशा दोन्ही महत्वाच्या जबाबदाऱ्यावर त्यांनी अत्यंत मेहनतीने व निष्ठेने कार्य केले. भय्यासाहेबांच्या विवाह १९ एप्रिल १९५३ रोजी महाउपासिका मीराबाई आंबेडकर यांच्याशी मुंबईत झाला.

इ.स.१९५४ मध्ये ब्रम्हदेशात जागतिक बौदध धर्म परिषद भरली त्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा सहभाग होता. धम्म परिषदेहुन परत आल्या नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'जनता' या पत्राचे नामकरण 'प्रबुद्ध भारत'तर भारत प्रिटींग प्रेसचे नामकरण 'बुध्द

भुषण' प्रिटींग प्रेस असे केले. 'प्रबुद्ध भारत' या पत्राचे मुद्रक, प्रकाशक, व संपादक व बुध्दभुषण प्रिटींग प्रेसचे व्यवस्थापक म्हणून त्यांनी अत्यंत मेहनतीने केलेले कार्य आजही स्मरणात आहे. १९५२ मध्ये झालेल्या स्वातंत्र भारताच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत भय्यासाहेब आंबेडकरांनी माणगाव, म्हसळा, महाड या विधानसभा मतदारसंघातुन कॉंग्रेसच्या विरोधात निवडणुक लढविली. ही निवडणुक अत्यंत चुरशीची व अतीतटीची झाली त्यात यशवंत आंबेडकरांना १६५६८ मते मिळाली होती. अत्यंत कमी मतांनी त्यांचा पराभव झाला. १४ ऑक्टोबर १९५६ साली डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नागपुर येथे बौदध धर्माची दिक्षा घेतली. त्यात भय्यासाहेबांचा महत्वाचा सहभाग होता. यशवंत आंबेडकरांनी लाखो अनुयायासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडुन दिक्षा घेतली. ६ डिसेंबर १९५६ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे महापरिनिर्वाण झाले. हा भय्यासाहेंबाच्या आयुष्यातील अत्यंत दुःखाचा दिवस, परंतु या संकटावर मात करुन आपल्या सुप्त नेतृत्व गुणाच्या जोरावार त्यांनी संपूर्ण भारत भर समाज जागृती मोहीम आखली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यानंतर भय्यासाहेब आंबेडकर हेच समाजाचे नेते होते. पण काही तत्कालीन स्वार्थी नेत्यांनी भैय्यासाहेबांना बाजुला सारुन आपलेच नेतृत्व लादण्याचा प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या ''दी बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया'' या संस्थेची जबाबदारी भय्यासाहेब आंबेडकर यांच्यवर सर्वानुमते देण्यात आली. त्यांनी ती अत्यंत प्रामाणिकपणे पार पाडली.

इ.स. १९५८ साली बॅंकाक (थायलंड) येथिल बौदध धम्म परिषदेला भारताचे प्रतिनिधी म्हणुन भय्यासाहेब उपस्थित राहीले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ''द बुध्दा ॲण्ड हिज धम्मा'' या ऐतिहासिक ग्रंथाच्या अनेक प्रती त्यांनी देश-विदेशातील प्रतिनिधींना दिल्या. इ.स.१९६० ते १९६६ अशी सहा वर्षे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य होते. त्या काळात त्यांनी अनेकांच्या समस्या सोडवुन न्याय मिळवून दिला. १४ एप्रिल १९६६ हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अमृतमहोत्सवी जयंती वर्ष असल्यामुळे भय्यासाहेबांनी ''भीमज्योत'' आयोजित केली या भीमज्योतीचा प्रारंभ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जन्मस्थळ महु येथुन सुरवात करुन मध्यप्रदेशासह संपूर्ण महाराष्ट्रात या भीमज्योतीच्या माध्यमातुन समाज जागृती करुन समाजामध्ये नवचैतन्य आणले. या ज्योतीमुळे गटागटात विभागलेला समाज पुन्हा एकसंघ व जागृत झाला. रिपब्लीकन पक्षाचा निष्ठावंत कार्यकर्ता म्हणून त्यांनी नेहमीच कार्य केले. गटातटाच्या राजकारणाला आळा घालण्यासाठी इ.स.१९७४ साली रिपब्लिकन नेत्यांना एकत्र आणुन समाज एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. पण स्वार्थी नेत्यांच्या हेकेखोरपणामुळे हे ऐक्य टिकले नाही. रिपब्लिकन पक्षाच्या ऐक्याच्या माध्यमातुन भय्यासाहेबांनी २० फेब्रवारी १९७४ साली ५ लाख लोकांचा मोर्चा महाराष्ट्र विधानसभेवर नेला होता. भय्यासाहेबांनी धम्माचा प्रचार व प्रसार करण्यासाठी विशिष्ट अशी यत्रंणा राबविली होती. त्यांनी धम्म कार्यात स्वतः ''श्रामणेर''दिक्षा घेऊन धम्म प्रचार, प्रसारासाठी प्रशिक्षित यत्रंणा उभी करुन धार्मिक विधीसाठी ''बौदधाचार्य'' हे पद निर्माण करुन भिक्सु संघाची कमतरता भासु दिली नाही. दादर येथील चैत्यभुमी

येथील ''चैत्यस्तुप'' भय्यासाहेबांच्या कार्यकाळात बांधण्यात आला. भय्यासाहेब हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सुर्यपुत्र होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महासुर्य होते. त्यांच्या ऐवढे महान कार्य कुणालाच करता येणार नाही, पण बाबासाहेबांचे पुत्र भय्यासाहेब यांनी अत्यंत प्रामाणिक व निष्ठने बाबासाहेबांच्या कार्याचा वारसा पुढे चालु ठेवला. भय्यासाहेब व मिराबाई आंबेडकर यांना एकुण चार अपत्ये आहेत. त्यात प्रकाश (बाळासाहेब), रमाताई, भीमराव, व आनंदराज आंबेडकर आज सर्वत्र हे बाबासाहेबांच्या कार्याचा व विचारांचा वारसा अत्यंत प्रामाणिपणे चालवत आहे. महाउपासिका मीराताई आंबेडकर या दी बुध्दिस्ट सोसायटी ऑफ इंडिया या संस्थेच्या अध्यक्षा आहेत.

भय्यासाहेब आंबेडकर हे चैत्यभुमीचे शिल्पकार आहेतच. पण त्यांनी आपल्या कार्यकाळात अनेक सामाजिक आणि धार्मीक कार्ये केली आहेत. भय्यासाहेब डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे सुर्यपुत्र असुनही त्यांनी ते आपल्या वागण्यात, बोलण्यात कधीच दाखविले नाही. अत्यंत 'साधी आणि उच्च विचार' हेच त्यांनी आयुष्यभर जपले. 'माणुस' म्हणून जीवन जगले १७ सप्टेबर १९७४ साली त्यांचे मुंबईतील केईएम हॉस्पिटलमध्ये निधन झाले. भय्यासाहेब यांनी अत्यंत प्रामाणिक, निष्ठेने समाजाची सेवा केली असली तरी भय्यासाहेब हे दुर्लक्षित राहिलेले नेते ठरले

## ओबीसींचा नेता
## मा. छगनराव भुजबळ साहेब !

सामान्य जनतेच्या उत्कर्षासाठी अविरतपणे धडपडणारे कणखर नेतृत्व, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व शाहू महाराज यांच्या विचारांना आदर्श मानून छगन भुजबळ यांनी आपली राजकीय वाटचाल सुरू ठेवली आहे. उपेक्षित, पददलित व मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्यात त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला आहे. ही त्यांच्या कुशल व कल्पक नेतृत्वाचीच किमया आहे की, सध्या ते विधानसभेचे आमदार व महात्मा फुले समता परिषदचे संस्थापक अध्यक्ष असून त्यांनी तिनदा उपमुख्यमंत्री पद भूषविले आहे. तसेच मुंबईचे महापौर, महसूल, गृहनिर्माण, गृह, सार्वजनिक बांधकाम आदी खात्यांचे मंत्री म्हणूनही त्यांची कारकिर्द लक्षणीय राहीली आहे.

लढा ओबीसींचा

**श्रीकांत सेलकर**
सिरसगांव (बा.)
बी.ए. भाग-३

# महिला बचत गट आणि स्त्रियांची भुमिका

कु. सविता वासुदेवराव मेश्राम
(बी. ए. भाग ३)
दोंदुडा

महिला बचत गटांची चळवळ महाराष्ट्रात जोमाने सुरु आहे. गावोगावी नवनवीन बचत गट सुरु होत आहेत. त्याद्वारे आर्थिक स्वयंपूर्णतेच्या दिशेने होणारी महिलांची वाटचाल ही अत्यंत स्फुर्तिदायक बाब आहे.'स्वयंसाहाय्यता समूह', 'बचत गट', 'शेजार गट', 'सेल्फ हेल्प ग्रुप' ही नावे अलीकडच्या काळात लोकप्रिय झालेली आहेत. अन्य राज्यांतील नागरिकही उत्सुकतेने याबाबत माहिती घेऊ लागले आहेत. याचे सारे श्रेय महिलांच्या एकजुटीतून साकारलेल्या महिला बचत गटांच्या यशस्वी प्रयोगाला दिले पाहिजे.

संसारगाडयाला बांधल्या गेलेल्या व निरक्षरता, गरिबीच्या ओझ्याखाली दबून गेलेल्या महिलांना बचत करता येईल का, केलेली बचत सांभाळून ठेवता येईल का, बचतीतून त्या स्वयंरोजगाराची साधने निर्माण करु शकतील का, अशी साशंकता या चळवळीच्या प्रारंभी तज्ञांनी देखील व्यक्त केली होती. तथापि, काळाच्या कसोटीला महिला बचत गटांची चळवळ घासूनपूसून लख्ख स्वरुपात सामोरी गेली व अपार कार्यनिष्ठेद्वारे महिलांनी आपल्या विषयीच्या सर्व शंकाकुशंकांना सडेतोड उत्तर देऊन आपल्या कार्याचे महत्व अधोरेखित केले. महिला बचत गटांच्या रुपाने महाराष्ट्रात एका नव्या इतिहासाची मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. हा इतिहास आहे महिलांच्या स्वयंपूर्णतेचा, महिलांच्या एक जुटीचा आणि एकजुटीतुन निर्माण होत असलेल्या महिलांच्या समर्थ शक्तीचा. थोडक्यात म्हणजे, बचतीतून एकजूट, एकजुटीतून शक्ती, शक्तीतून युक्तीचा म्हणजे स्वतःमधील अंगभूत गुणांचा झालेला साक्षात्कार व या साक्षात्कारातून स्वयंपूर्णतेचा शोध घेऊन स्वबळावर हिमतीने उभे राहण्याची मिळालेली ताकद, असे हे समर्थ स्त्री-शक्तीचे प्रत्यंतर महिला बचत गटांच्या चळवळीने घडविलेले आहे. हे सारे बचतीच्या महान मंत्राने घडविलेले आहे.

'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें ।
उदास विचारें वेंच करीं ।। १

असे समर्थ रामदास स्वामींनी म्हटले आहे. व्यवहार उत्तमरित्या करुन पैसा मिळवावा व मिळविलेला पैसा खर्च करताना मात्र नीट विचार करावा, म्हणजे पैसा टिकतो. बचतीच्या विचारामागील गंगोत्रीच समर्थांनी या श्लोकाद्वारे स्पष्ट केली आहे. असे म्हणता येईल. जागतिकीकरणाच्या संदर्भात पैसा खर्च करण्याच्या अगणित वाटा आज उपलब्ध झालेल्या आहेत. अशा वेळी आपण कोणती वाट निवडायची याचे स्वातंत्र्य प्रत्येकाला आहे. या स्वातंत्र्याचा अर्थ नेमका जाणून उपलब्ध साधनसामग्रीचा विवेकाने वापर करणे व शक्य होईल तितकी ती जपणे, म्हणजेच बचत करणे.

वास्तविक बचत करणे हा महिलांचा स्थायीभावच आहे. रुपयातले दोन पैसे कसे वाचवावेत हे महिलांकडूनच शिकावे, असे म्हटले जाते व ते शंभर टक्के खरे आहे. कोणत्याही वस्तूच्या खरेदीबाबत महिला जास्तीत जास्त चिकित्सकपणे विचार करुन मगच निर्णय घेतात, हे अत्यंत योग्य आहे. घरात पैसा असणे हे वेगळे व उपलब्ध पैशांतून बचत करणे हे वेगळे. जीवन जगण्याचा अधिकार

सर्वच माणसांना जन्मताच प्राप्त झालेला असतो. पण जगायचे कशासाठी हे ज्याला कळले, त्यालाच 'बचत' करण्याचे महत्व कळले, असे निर्विवादपणे म्हणता येईल. मानवी आयुष्य एकदाच लाभते. ते कसेही उधळून चालणार नाही. त्याचप्रमाणे पैसा ही सुध्दा उधळण्याची बाब नाही. तो साठवावा लागतो, थेंबे थेंबे वाचवावा लागतो. तेव्हा कुठे तो थोडाफार शिल्लक राहतो आणि कुटूंबाच्या किंवा स्वतःच्या अडीनडीच्या वेळी हाच पैसा जणू परमेश्वराचे रुप घेऊन मदतीला धावून येतो. पैसा ही अशी गोष्ट आहे की, ज्याचे महत्व तो असताना फारसे लक्षात येत नाही. पण पैसा नसला की, सारेच घोंगडे भिजत पडते ! 'बचतीचा मंत्र महान' असे म्हणतात ते काही उगाच नाही. बचतीमध्ये फार मोठे सामर्थ्य आहे. खरे तर आजची बचत ही उदयाची कमाई असते. जागतिकीकरणाच्या रेटयामध्ये मानवाला पशुसारखे जीवन जगण्याची वेळ आलेली असतानाच्या सध्याच्या बिकट दिवसांमध्ये तर बचतीखेरीज कोणीही आपला वाली नाही, हे केवल महिलांनीच नव्हे, तर सर्वांनीच लक्षात ठेवायला हवे.

'बचतीद्वारे महिलांचे सबलीकरण' हा शब्दप्रयोग नेहमी ऐकण्यात येतो. सबल होणे म्हणजे शक्तिमान होणे. महिला सबलीकरण ही अशी प्रक्रिया आहे की, ज्याद्वारे महिला सामूहिकपणे व सर्वांगीण उन्नतीच्या समान विचाराने क्रियाशील राहतात. पुर्वापार चालत आलेल्या रुढी परंपरांच्या जोखडाखाली दबलेली महिला नेहमीच साधनसंपत्तीपासून वंचित राहिलेली आहे. स्त्री शिक्षणाच्या व्यापक चळवळीमुळे अलीकडे यात काही अंशी फरक झालेला आहे. आर्थिक बाबीचे नियंत्रण जोपर्यंत महिलांच्या हातात येत नाही. हे बळ मिळण्यासाठी महिलांनी बचत गटाच्या माध्यमातून उद्योग-व्यवसायाचा मार्ग स्वीकारने अत्यंत आवश्यक आहे. काळ बदलला असला तरी सर्वसाधारण पुरुषी मानसिकतेतून महिलांना सोयीनुसार 'गृहलक्ष्मी' म्हटले जात असले तरी आर्थिकदृष्टया महिला समर्थ होत नाहीत. स्वतःच्या पायावर उभ्या होत नाही, तोवर तिच्या पायातील पारतंञ्याची बेडी गळणार नाही. या दृष्टीकोनाातून जागतिकीकरणाच्या संदर्भात उपलब्ध झालेल्या नवनवीन उदयोग-व्यवसायांच्या अगणित संधीचा पुरेपुर उपयोग महिलांनी तातडीने करुन घेतला पाहिजे

यापुढील काळात दरवर्षी सुमारे ४० हजार नवीन बचत गट एकटया महाराष्ट्र राज्यात स्थापन होतील. देशभरातील बचत गटांची संख्यादेखील दरवर्षी काही लाखांच्या प्रमाणत वाढणार आहे. म्हणजेच महिलांची आर्थिक शक्ती प्रत्येक दिवसागणीक आणखी वाढत जाणार आहे. समस्त महिलांनी याचा नेमकेपणाने विचार व अभ्यास करावा आणि आपल्या अभेद्य एकजुटीतून अधिकाअधीक समर्थ, सक्षम होण्याचा ध्यास मनी धरावा. 'थेंबे थेंबे तळे साचे' या म्हणीचा अर्थ छोटया छोटया बचतीतून महान बचत या कल्पनेला लागू पडतो. याबरोबरच 'तळे राखेल तो पाणी चाखेल' या आणखी एका म्हणीचा जोडदेखील या कल्पनेतून दयायला हवी केलेल्या बचतीची मधुर फळे चाखायची तर सर्वप्रथम ती बचत सुरक्षित राखायला हवी. तरच एकाचे दोन, दोनाचे चार, चाराचे आठ यापध्दतीने पैसा वाढत राहिल. महिला बचत गटांच्या उपक्रमांमुळे महिलांना बचत करण्याची, तसेच आर्थिक नियोजन व हिशेब करण्याची, तसेच आर्थिक नियोजन व हिशेब करण्याची क्षमता प्राप्त होऊ शकते. महिला आर्थिक दृष्टया स्वावलंबी होतील, तेव्हाच त्या सर्व क्षेत्रात आत्मविश्वासाने वावरुन कुटूंब, समाज व राष्ट्राला पुढे नेऊ शकतील, हा यामगील व्यापक विचार आहे.

# कविता कशी असावी

**विवेक वि. जाधव**
बी.ए. भाग २
पिंपळापूर (वडकी)

कविता लिहीणे इतकं पण सोप नाय,
शब्द काय टमाट्याचं रोप नाय.

जे घेतलं वाफ्यातून अन सरींमध्ये पेरलं
शब्द असावेत मनातल्या भावना.

आनंदी दिसुनही मनातल्या वेदना
कविता असावी आधार देणारी.

झालेच दु:ख तर दु:खी मनाला सुख देणारी
रस्ता चुकलेल्या वाटसरूला मार्ग दावणारी

कविता असावी मन कोणाचं तरी जिंकणारी
कविता नसावी हृदय चोरणारी

झाली कधी प्रीत प्रेम व्यक्त करणारी
सोडुन गेलं कोणी तर विरह दुर करणारी

कविता असावी अन्यायाच्या घराला वाचा फोडणारी
मानसाला माणुसकी मिळवून देणारी

कविता असावी शब्दाच्या रूपाने हृदयात बसणारी
आनंदाच्या नादात हास्य फुलवणारी

कविता असावी डोक्यावरचा ताण दुर करणारी
रोजचं जगणं सोडुन भरकटत जाणारी

कवितो असावी आनंदी जिवनातली
कविता असावी मनातली....

## गणित

दु:खास दु:खाने भागून घ्या
दु:खाचा भासही उरणार नाही
सुखास सुखाने गुणून घ्या
आनंद पृथ्वीवर मावणार नाही
कर्तव्यास कष्टाची जोड द्या
संतोषास पारावार उरणार नाही
मनातून निराशेस वजा करा
जगण्याचा मोह संपणार नाही.

**रविंद्र झांझाड**
बी.ए. भाग-३, वेणी (जांगोना)

''मुलगा हा कुळांचा दिवा आहे
तर मुलगी कोणत्या ज्योतिपेक्षा कमी नाही,
मुलगा हीरा आहे,
तर मुलगी ही मोत्यापेक्षा कमी नाही.'

स्त्री अत्याचाराचे फुटले पेव,
पुरूष नराधमांना कशाचे भेव।

तसेच

चार भिंतीत करूनी बंद,
फास लाविला बंधनाचा,
कसा पोहचेल मग तेथे,
प्रकाश हा प्रगतीचा ।।

**सुरज काळे**
बी.ए. भाग-२
वेणी (जांगोना)

# अर्थसंकल्पाची ओळख

प्रा. विठ्ठल घिनमिने
अर्थशास्त्र विभाग

आपल्या देशामध्ये केंद्र सरकार आणि राज्य सरकारे दरवर्षी सर्वसाधारणपणे फेब्रुवारी महीण्याच्या शेवटच्या आठवड्यात अर्थ संकल्प सादर करीत असते. केंद्र सरकार जो अर्थसंकल्प सादर करीत असते त्या अर्थसंकल्पात आपणास भारतीय अर्थव्यवस्थेचा चेहरा दिसतो. याचा अर्थ भारतीय अर्थव्यवस्थेचे स्वरूपच कसे राहील हे सादर होणाऱ्या अर्थसंकल्पावरूनच कळते. केंद्र सरकारचा अर्थसंकल्प केंद्रिय अर्थमंत्री संसदेमध्ये सादर करतो. तर राज्याचा अर्थसंकल्प राज्याचा अर्थमंत्री विधीमंडळात सादर करतो.

* अर्थसंकल्प म्हणजे काय :-

''एखाद्या देशाने पुढील वर्षासाठी कोण-कोणत्या मार्गाने उत्पन्न जमा करावयाचे आणि जमा केलेले उत्पन्न वेगवेगळ्या उत्पादन क्षेत्रामध्ये कशा रितीने खर्च करावयाचे यांचा तपशिलवार आराखडा मांडणे म्हणजेच अर्थसंकल्प होय''.

थोडक्यात, ठराविक काळात विशिष्ट उद्दीष्टचे साध्य करण्यासाठी तयार केलेला राजकोषीय धोरणाचा मसुदा म्हणजे अर्थसंकल्प होय.

* अर्थसंकल्पाची उद्दीष्ट्ये :-

अर्थसंकल्पाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. परंतु पुढील चार प्रमुख उद्दीष्ट्ये मानली जातात.

१) साधन सामग्रीचे विविध क्षेत्रात योग्य वाटप करणे :-

देशात उपलब्ध असलेली भौतिक आणि वित्तीय साधनांचे उत्पादनाच्या निरनिराळ्या क्षेत्रात उदा. शेती उद्योग, जलसिंचन, दळणवळण व वाहतुक, शिक्षण, संरक्षण, आरोग्य इत्यादी विविध क्षेत्रामध्ये योग्य वाटप करून राष्ट्रीय उत्पादनात वाढ करणे.

२) आर्थिक विकास साध्य करणे :-

देशातील विविध बाबींवर खर्च करून आर्थिक विकास साध्य करणे हे महत्वाचे उद्दीष्ट अर्थ संकल्पाचे आहेत.

३) आर्थिक विषमता कमी करणे :-

देशातील वाढलेल्या राष्ट्रीय उत्पन्न व संपत्तीचे विवेकशिल वाटप करून आर्थिक विषमता कमी करणे. म्हणजेच श्रीमंत वर्गावर कराचा अधिक भार टाकून गरीब वर्गाच्या कल्याणार्थ अनेक योजना राबवून गरीब श्रीमंत या दोन्ही वर्गातील दरी कमी करणे.

४) आर्थिक स्थैय निर्माण करणे :-

अर्थव्यवस्थेला आर्थिक स्थैय प्राप्त करून देणे हे अर्थसंकल्पाचे महत्वाचे उद्दीष्ट आहेत. अर्थव्यवस्थेत किंमत, उत्पादन, मागणी, उपभोग, रोजगार, आंतरराष्ट्रीय शोधन शेष, विनिमय दर इत्यादी अनेक घटकात चढ उतार निर्माण होत असतात. परिणामी अर्थव्यवस्थेत अस्थिरता निर्माण होते. ही अस्थिरता निर्माण दुर करून अर्थव्यवस्था समतोल ठेवण्यासाठी अर्थसंकल्पाची भूमिका महत्त्वपूर्ण असते.

* अर्थसंकल्पात समाविष्ठ असणाऱ्या बाबी

अर्थसंकल्पात प्रामुख्याने दोन बाबीचा समावेश होतो. यामध्ये अ) केंद्र सरकारचा एकुण महसुल (उत्पन्न) ब) केंद्र सरकारचा एकुण खर्च

अ) केंद्र सरकारचा एकुण महसुल (उत्पन्न) :-

केंद्र सरकारला एकुण करापासून आणि करेतर बाबीपासून मिळणाऱ्या उत्पन्नाचा समावेश एकुण महसुलात होतो. उदा. उत्पन्न कर, निगम कर, संपत्ती कर, देणगी कर, व्याजकर, व्ययकर इत्यादी याचबरोबर राज्यसरकारला केंद्रशासीत प्रदेशाना दिलेल्या कर्जावरील व्याज लाभांश, नफा, राजकोषीय सामाजीक आर्थिक सेवा, इत्यादींपासून करेत्तर उत्पन्न प्राप्त होते.

ब) केंद्रसरकारचा एकुण खर्च :-

सरकारला जमा झालेला एकुण महसुल निरनिराळ्या बाबीवर खर्च केले जातात या खर्चाचे दोन प्रकार आहेत.

अ) उत्पादक खर्च ब) अनुत्पादक खर्च

अ) उत्पादक खर्च :-

पंचवार्षिक योजनाच्या माध्यमातून विविध प्रकल्प किंवा विकासाच्या योजनावरील खर्च उदा. शेती, उद्योग, विज, दळणवळण, वाहतुक, ग्रामीण विकास, शिक्षण, आरोग्य इत्यादी बाबीवर केलेला खर्च होय. हा खर्च उत्पादन क्षेत्राची उत्पादकता वाढविण्यासाठी आवश्यक असतो.म्हणून या खर्चाला उत्पादक खर्च म्हटल्या जाते.

ब) अनुत्पादक खर्च :-

सरकारचे दैनंदिन आर्थिक व्यवहार अखंडपणे चालू राहण्यासाठी करण्यात येणाऱ्या खर्चाला अनुत्पादक खर्च म्हटल्या जाते. उदा. कर्जावरील व्याज, निवृत्ती वेतन, अनुदाने, संरक्षण, प्रशासनावरील खर्च इत्यादी.

* सारांश :-

सारांशपणे असे म्हणता येईल की, अर्थसंकल्पात एका वर्षात मिळणारे उत्पन्न आणि खर्च यांचा लेखाजोखा असतो. या अर्थसंकल्पाचा देशातील प्रत्येक वर्गावर परिणाम प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष पणे पडत असतो.

# सेवक मयुरसेन

**निखिल दे. मेंढे**
बी. ए. भाग - ३, वेणी (जांगोना)

राज अमरेंद्रसेन जंगलात शिकारीला जाऊन परत येत असतांना जमिनीवर काही सोन्याची नाणी, धान्य सांडलेले त्याला दिसले. कुणातरी प्रवाशाचे ते असणार हे सर्वांच्या लक्षात आले. पण सोण्याची नाणी अशी पायदळी तुडवली जाणे योग्य नाही म्हणून अमरेंद्रसेनने आपल्या अधिकाऱ्यांना नाणी उचलून घेण्यास सांगितले सर्व सेवकही धावले. भराभर सर्वांनी नाणी उचलली.

राजाबरोबर मयुरसेन नावाचा सेवक होता. त्यांने मात्र सोन्याची नाणी न वेचता पडलेले धान्याचे दाणे उचलले. सोन्याची नाणी सर्वांनी पटापट उचलली होती. धान्याचे दाणे गोळा करायला मात्र वेळ लागला. तेव्हा राजाच्या प्रधान खेकसला, हे काय उचलत बसला आहेस. महाराजांना वेळ होतोय. पण त्याचे न ऐकता मयुरसेनने सर्व धान्याचे दाणे उचलले व प्रधानाला देऊ करताच प्रधान म्हणाला ''राहू दे तुझ्याचकडे इतरांनी सोन्याची नाणी उचलून दिली आणि तु भिकारड्या दाणे गोळा करीत बसलास. ''मयुरसेन काहीही बोलला नाही. घरी आल्यावर रात्री अन्नपुर्णादेवी प्रसन्न होऊन मयुरसेनला म्हणाली, ''धान्याचे दाणे हेच पृथ्वीवरील सोने आहे. तु सदैव ऐश्वर्य संपन्न राहशील. आणि मयुरसेन पुढे सर्वात श्रीमंत व ऐश्वर्यवान झाला.

*तात्पर्य : जीवनातील वस्तुचे खरे मोल ओळखता आले पाहिजे.*

# स्त्री विषयक चालु घडामोडी

कु. स्वाती शा. बुधे
बी.ए. भाग -१
पिपरी (पोहणा)

भारतासारख्या विकसनशील लोकशाही देशात महिलांची संख्या अर्धी असून महिलांच्या विकासाच्या दृष्टिकोनातून भारतीय कायदेमंडळाने वेळोवेळी महिला विकासाच्या अनेक योजना व संरक्षणाच्या दृष्टिकोनातून वेळोवेळी अनेक कायदे निर्माण करुन उपाययोजना केली परंतु आजही महिलांची वास्तविकता काही वेगळीच आहे. जून २०११ मध्ये महाराष्ट्राचे प्रख्यात तीर्थस्थान परळी - वैजनाथ येथे एका नाल्यात प्लास्टीकच्या पिशवीतून टाकून दिलेली ९ स्त्री अर्भके सापडली. स्थानिक महिला आमदार हया शासनानेच स्थापन केलेल्या लिंगनिदान प्रतिबंधक कायदयातर्गंत राज्यस्तरीय पर्यवेक्षीय समितीच्या सदस्या असताना, म्हणावी तितकी दखल घेतली गेली नाही. स्त्रीयांच्या या नकोशा अवहेलनेचे शासनाच्या पातळीवर त्याची म्हणावी तितकी दखल घेतली जात नाही.

खरे तर २०११ च्या जनगणनेची आकडेवारी मार्च-एप्रिल महिन्यात प्रसिध्द झाली. तेव्हाच ० ते ६ वर्षे वयोगटातील १००० मुलांच्या मागे फक्त ८०१ मूली असलेला बीड जिल्हा हा महाराष्ट्रातला सर्वात कमी लिंग-गुणोत्तर असलेला जिल्हा आहे हे लक्षात आले होते तरीही शासनाकडून फारशी हालचाल झाली नाही. परळीचे वादळ क्षमणार तेवढयातच पुण्यामध्ये सदाशिव पेठेतल्या एका प्रतिष्ठीत उच्चवर्णीय डॉक्टरला लिंगनिदान प्रतिबंधक कायदयाखाली महीला संघटनांनी पकडून दिले. प्रगतिशील पुण्यातल्या हया विशीष्ट जात-वर्ग-समीकरणातल्या व्यक्तीचे हे प्रताप सर्वत्र झळकल्यानंतर निद्रिस्त प्रशासनाला आता जाग आली आहे. महाराष्ट्र शासनाला सोनोग्राफी केंद्राची तपासणी करण्याची धडक मोहिम हाती घ्यावी लागली आहे.

लिंगनिदान प्रथेविरोधी जाणीव जागृती करण्यासाठी आय.एम.ए. ने सुकन्या प्रकल्प जाहीर केला. अनेक ठिकाणी रोटरी क्लबपासून स्थानिक मंडळांनी परिसंवाद व चर्चासत्रे आयोजित केली. आता चित्र - प्रदर्शने, सडक नाटये, गाणी, नृत्यविस्कारातून मुलीच्या सवंर्धनाचे मुद्दे मांडले जावू लागले. एवढेच नाही तर पुण्याच्या खासदार सुप्रीया सुळे हयांनी हया विषयाला धरुन नायगाव ते पूणे लेकींचा जागर करणारी पदयात्रा काढली. सातारा जिल्हा परिषदे ने शेकडो ‘नकुशी’ नामक मुलींचे ‘नामांतर’ केले तर अनेक स्थानिक स्वराज्य संस्थानी मुलींसाठी काही खास योजना जाहीर केल्या.

स्त्रियांना आपल्या शरीरावर आणि त्यासंबंधीचे निर्णय घेण्याचा पुर्ण अधिकार असावा अशी स्त्री चळवळीची भुमिका आज राहिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून मूल असावे की नसावे आणि हवे असल्यास त्यांची संख्या किती असावी, हे पण ठरवण्याचा त्यांना अधिकार असावा हया दृष्टिकोनातून गर्भपाताचा अधिकार स्त्रियांनी मिळवून घेतला आहे. अर्थात, शासनाने हा अधिकार स्त्रियांना बहाल करण्यामागचे खरे कारण म्हणजे लोकसंख्या नियंत्रण हे सर्वश्रुत आहे.

२०१२ या वर्षाची सांगता प्रक्षोभ, आक्रोश, संताप या काळया शब्दांनी लिहावी लागेल. दिल्लीत २३ वर्षी तरुणीवर झालेल्या सामुहिक बलत्काराच्या

घटनेत सारा देश ढवळून निघाला, प्रक्षुब्ध झाला, अन तिच्या मृत्युनंतर शोकाकुल झाला. प्राण्यांना देखील लाजवेल, अशा घटनेची पुनरावृत्ती होऊ नये, म्हणून लक्षावधी लोकांनी सत्तारुढ पक्ष, पोलीस शासन व राजकीय नेत्यांना धारेवर धरल. प्रसारमाध्यमांनी 'निर्भया' 'दामिनी', 'ब्रेव्हहार्ट' अस त्या तरुणीच वर्णन केल. राष्ट्रपती भवन, राजपथ, विजय चौकाकडे जाणाऱ्या व देशाच्या कानाकोपऱ्यात हजारो युवकांनी, महिला व सामान्यांनी केलेल्या निदर्शनांनी इजिप्तच्या तेहरीत चौकात झालेल्या क्रांतीची आठवण असंख्यांना झाली या घटनेमुळे पोलीसांचा लाठीमार, अश्रुधूर यांना न जुमानता, गांधीजींच्या अहिंसा तत्वाच भान ठेवून लाखो मेणबत्या पेटवून, शांतिमार्च करीत तीन आपल्या भावनांना वाट करुन दिली. जगण्याची प्रबल इच्छा असूनही तब्बल तेरा दिवस लढा देत, दामिनीन प्राण सोडले, तेव्हा सारा देश हळहळला.

देशात दर वीस मिनीटाला बलात्कार होतो. गुंडांच्या विषारी नजरा व छेडखानीमुळे बस, मेट्रो, रिक्षामधील प्रवास आज भयावह झाला. आज दिवसेंदिवस भर पडत आहे. काही वेळी याच पर्यावसान खून, ॲसीड हल्ला यातही होतय, रोज हे होत असूनही, आजवर महिलांच्या सुरक्षेसाठी ना केंद्र ना राज्य सरकारांनी कठोर कायदे केले असलेल्या कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी केली छेडखानी करणाऱ्यांना किमान किमान १ ते ३ वर्षे तुरुंगवास व दंड याची तरतूद सरकारनी करायला हवी समानतेसाठी चाललेला महिलांचा लढा, नोकरी, व्यवसायाच्या नवनवीन संधी यातून येणार मोकळेपण, काहीसा स्वच्छंदीपणा, काही चित्रपटांची अश्लील कथानक, गाणी, प्रसंग व त्यांच अनुकरण करणारे युवक, आदी अत्याचाराची कारणे आहेत. महिलांना स्वावलंबनासाठी ही किंमत मोजावी लागत आहे काय ? .

पुरुष प्रधान समाजात आजही महिला आपल्यापेक्षा वरचढ झालेली आवडत नाही. घराघरातून पत्नी, महिला व मोलकरणीवर होणारे, परंतु प्रकाशात न येणारे अत्याचार पाहीले की सारा समाजात मानाच स्थान मिळवून देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार सुप्रीया सुळे यांनी स्थापन केलेल्या 'युवती' संघटनेच्या कार्यासारख कार्य हाती घेतल्यास विधीमंडळ व संसदेतील महिला सदस्यांनी पुढाकार घेतल्यास बरच काही साध्य होईल.

आता राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थात माहिलासाठी ५० टक्के आरक्षण आल्यामुळे भविष्यात तितक्याच संख्येत स्त्री नेतृत्व उदयाला येणार आहे. त्यामुळे भावी राजकीय मैदानावर सुदृढ नेतृत्व निर्माण करायच झाल तर महिला गटाला वाऱ्यावर सोडून जमणार नाही. परंतू भारत स्त्री-पुरुष समानतेच्या पातळीवर नुकत्याच प्रसिध्द झालेल्या युनोच्या मानव विकास अहवालात स्त्री-पुरुष समानतेच्या पातळीवर भारताचा १८७ देशाच्या यादीत क्रमांक लागतो तो १२९ वा हे खरेच लाजीरवाने आहे. हे टाळण्यासाठी प्रयत्न करायला हवेत.

२०१५ हे वर्ष राजकीय पक्षांनी महिलांना सुरक्षित करण्याच्या मोहिमेसाठी हाती घेतले तर महत्त्वाच्या सामाजिक परिवर्तनाचा पाया उभारला जाईल, हे निश्चीत.

''कोणत्याही अन्यायापुढे मान वाकविणे हा शुद्ध नामर्दपणा आहे. अन्यायाचा प्रतिकार केलाच पाहिजे-पण तो अन्याय करणाऱ्याचे रक्त सांडून नव्हे. आपला धर्म आपणाला तसे शिकवित नाही. आपल्या मित्रावरच नव्हे, तर आपल्या शत्रूवरही आपण प्रेमच केले पाहिजे.''

संग्राहक - **कु. प्रणाली झिले**
बी.ए. भाग-३, येरला

# हाक लोकशाहीची

**सागर बकाने**
बी.ए. भाग १
फुकटा

स्वाभीमानाने जगाला सांगता भारताची लोकशाही महान आहे
पुढारी, अधिकारी, व्यापारी व भ्रष्टाचाऱ्यांच्या दावणीला गहाण आहे

देशावर नजर फिरवा, वाटते लोकशाही कागदावरच आहे
जनतेचे राज्य नसून वाटते हुकूमशाहीचे राज्य आहे

वाटत होते सर्व जनता, सुखासमाधानाने नांदत आहे
लोकशाही स्वातंत्र्य असतानाही जनतेची पिळवणूक होत आहे

स्वातंत्र्य मिळाले वाटले आता आपलेच राज्य आहे
लोकशाहीत आजही गुंड भ्रष्टाचारी यांचेच राज्य आहे

सत्ता मिळवण्यासाठी देशाच्या गुप्ततेची शपथ घेत आहेत
सत्तेवर बसून देशाची तिजोरी लूटून खात आहे

कित्येक वर्षापासून जनता लोकशाहीचे स्वप्न पाहत आहे
इथे मात्र दररोज लोकशाहीचे खुन होत आहे

जातीयवाद अन्याय अत्याचार व भ्रष्टाचार चोहीकडे माजला आहे
या सर्व भस्मासुरांचा नायनाट करण्यासाठी लोकशाही हाक देत आहे

अविचार प्रवृत्तीचा श्रृंखलेने लोकशाहीला बंदीस्त केले आहे
धाऊन या लोकशाहीच्या हाकेला मुक्त करायचे आहे

मोठ्या त्यागाने आपणास लोकशाही स्वातंत्र्य मिळाले आहे
देश बंधुनों जागे व्हा स्वातंत्र्य लोकशाहीला वाचवायचे आहे

देशातील जनतेला लोकशाही कळकळून हाक देत आहे
देश बंधुनों क्रांती करा नाहीतर हुकूमशाही येत आहे.

# नागपूर जिल्ह्यातील पुरातत्वीय ऐतिहासिक स्थळे : एक अवलोकन

**प्रा. पंकज वामन मून**
इतिहास विभाग

प्रस्तावना :

नागपुर हे भारतातील मध्यवर्ती ठिकाण म्हणून प्रसिद्ध आहे. इ. स. १८३१ पासुन १९६० पर्यंत नागपूर मध्यप्रदेशची राजधानी होती. आज महाराष्ट्राची उपराजधानी याशिवाय संत्रानगरी आणि ग्रीन सिटी म्हणून नागपुरचा नावलौकिक आहे. नागपूर शहराची स्थापना १८ व्या शतकाच्या प्रारंभी गोंड राजा बुलंद यांने 'राजापुर वारसा' नावाच्या बारा वाड्या होत्या त्या एकत्र करून इ. स. १७०२ मध्ये केली. कालांतराने भोसल्यांनी आपल्या विस्तृत राज्याची राजधानी म्हणून नागपुरची निवड केली.

नागपूर जिल्ह्यात कित्येक अशी ऐतिहासिक स्थळे आहेत जी आपल्या उदरात गतवैभवाचे भांडार अद्यापही जतन करून आहेत. त्यातील प्रमुख पुरातत्वीय ऐतिहासिक स्थळांचा आढावा होणे हाच या शोधनिबंधाचा उद्देश आहे. नागपूर जिल्ह्यातील आंभोरा, अडम, मनसर, नगरधन, रामटेक अदासा, धापेवाडा, जलालखेडा, माहुरझरी, जुनापाणी, वडधामना, टाकळघाट इत्यादी स्थळांचा पुरातत्वीय तसेच ऐतिहासिक संदर्भ लाभलेले आहे.

**श्रीक्षेत्र अंभोरा :**

यादवकालीन मराठीचे आद्यकवी व ग्रंथकार मुकुंदराज यांचे गुरूआदीनाथ यांची समाधी अंभोरा येथे आहे. अंभोरा येथे हरीनाथांनी वयाच्या केवळ २६ व्या वर्षी समाधी घेतली. स्वामी हरीनाथ महाराजांनी याच ठिकाणी १८ वर्ष 'पशुपत' व्रत करून मोठे यज्ञ केले होत. त्यातुनच ''श्री चैतन्यश्वर'' प्रभु प्रकटले. उंच टेकडीवर त्यांचे मंदीर आहे. चैतन्यश्वराची 'लिंगपिंड' ही रूद्राक्षरूपी आहे. वैनगंगा, आंब आणि कन्हान या तीन नद्यांच्या संगमावर वसलेले नैसर्गिक सौंदर्याने नटलेले हे गाव पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. येथे हरीनाथ व रघुनाथाच्या समोर बसुन मुकुंदराजाने इ. सं. ११८८ च्या दसऱ्याला मराठीचा पहिला उपलब्ध काव्यसंग्रह ''विवेक सिंधु'' नावाचा ग्रंथ लिहून पुर्ण केला. येथे चैतनेश्वर मंदीराखेरीज शिवमंदीर, उंचवट्यावर बांधलेले बौद्धविहार आणि टेकडीवरील जीर्ण किल्ल्याचे अवशेष आजही दृष्टीपथात पडतात. स्वतः मुकुंदराजांनी याचे वर्णन 'मनोहर अंबानगरी' असे केलेले आहे.

**अडम :**

नागपूर जिल्ह्यातील अडम हे सातवाहनपुर्व व सातवाहनकाळी फार मोठे नगर होते. मध्यभारतातील एक व्यापारी केंद्र असून

रोमन साम्राज्यांशी होणाऱ्या व्यापारात त्याचे महत्वपूर्ण योगदान होते. हे उत्खनात प्राप्त झालेल्या रोमण नाणी, पदके व मृदभांडी यावरून सिद्ध होते. नागपूरपासून ५८ कि.मी. वर वाघोरा नदीकाठी असलेल्या अडम येथे ११ रोमन सुवर्णमुद्रा मिळाल्या. गौतम बुद्धांच्या काळी भारत जी १६ जनपदे नोंदविली गेली आहेत. त्यातील असक जनपदाची राजधानी म्हणजे आजचे अडम होय. त्याकाळी अडम हे एक अति प्रगत नगर होते. येथील किल्ल्यांच्या उत्तर–पुर्वेस मौर्यकालीन बौद्ध स्तुप आहे. येथील शिल्प, स्तुप इत्यादी वरून या परिसरातील बौद्ध धर्माचा प्रभाव लक्षात येतो.

वाघोर नदीच्या काठावर येथे ताम्रपाषाण संस्कृतीचे अवशेष मोठ्या प्रमाणावर. इ. स. पुर्व १५०० इ. स. १००० वर्षे असा त्यांचा काळ मानला जातो. या सांस्कृतिक कालखंडामध्ये तांबे व दगड यामध्ये बनविलेली हत्यारे व अवजारे उपलब्ध झाली. कृषी व पशुपालनासाठी उपयुक्त सुक्ष्म हत्यारे, कुऱ्हाडी अवजारे आणि मृद भांडी उपलब्ध झाली. भारतात मिळणाऱ्या मृद भांड्यापेक्षा येथील मृदभांडी सर्वस्वी वेगळी असल्यामुळे या संस्कृतीला ''विदर्भ ताम्रपाषाण संस्कृती'' असे नाव देण्यात आले आहे.

**अदासा :**

नागपूर पासून ३६ कि.मी. असलेल्या अदासा येथे पाच प्राचीन मंदीरे असून गणपती मंदिरातील मुर्ती ही एकाच अखंड पाषाणात कोरलेली आहे. एका उंच टेकडीवर असेलेले हे मंदिर गर्भग्रह त्यापुढील आयताकार मंडप आणि त्यानंतर स्वतंत्रपणे असलेला मुखमंड्प अशी याची रचना असून प्रशस्त प्राकाटयुक्त मंदीर आहे. प्रवेशद्वारावर असलेला मुखमंडप हा सरूदार आकाराच्या दगडी स्तंभावर उभा असलेला तीन मंहीरपींनी युक्त आहे. या महिरापींवर सुंदर अशी लतावेलींची शिल्पांकन आहे. गर्भगृहाचे प्रवेशद्वाराजवळ असलेली महिरप ही अनेकविध नक्षींनी चित्रीत केली आहे. गाभाऱ्यात उंच अधिष्ठानावर उभी असलेली नृत्य गणेशाची भव्य मुर्ती शमीविघ्नेश्वर (सिद्धीविनायक) ३.३५ मीटर उंच आणि २.१२ मीटर रूंदीची आहे. ही द्वादश भुजा मुर्ती शेंदूरचर्चित आहे. हा नृत्य गणेश प्रसन्नतेची अनुभूती देतो. जवळील टेकडीवर महादेवाचे मंदीर असून मंदिरातील शिवलिंग हे स्वयंभू असल्याचे मानले जाते. गणेश मंदिराच्या बाजूला १६ व्या १७ व्या शतकातील दशनाम ग्रंथी, गोसाव्यांच्या अनेक समाध्या आहे. या शिवाय हनुमान मंदिर, काळभैरव मंदीर, महादेव मंदिर, गणेशकुंड, पुष्करणी इ. महत्वपूर्ण आहे.

**मनसर :-**

नागपूर शहरापासून ४० कि.मी. अंतरावर मनसर येथील हिंडोबा टेकडीवरील उत्खाननातून प्राचीन शिल्प व मुर्तीकलेचा एक नवे स्वतंत्र दालन उघडले गेले. मनसर येथे वाळाटक राजवटीतील महालांचे उत्खनन मागील सात वर्षापासून सुरू आहे. भदन्त आर्य

नागार्जुन सुरई ससाई यांच्या कार्यकुशलतेने वस्तु मिळाल्या. प्रवरसेन द्वितीय कालीन लाल महिन बलुआ मुद्रा आणि बौद्ध धर्माचे मुख्य शिक्षा केंद्र मिळालेले आहे. बोधीसत्व नागार्जून संस्था व अनुसंधान केंद्राचे यांच्या प्रयत्नाने अंकित मुद्रा, मौर्यकालीन विटा, मृद्रभांडाचे अवशेष तसेच सातवाहन आणि वाखाटकांच्या कार्यकाळातील अनेक सुंदर दैनंदिन जीवनात उपयोगात येणाऱ्या वस्तु सुद्धा हस्तगत झालेल्या आहेत. लोखंडी शस्त्रे, कारागिरीचे अवजारे खिळे, चाकू वस्तरे तसेच तांबे आणि लोखंडाच्या अनेक वस्तु शंखाच्या बांगड्या, तांब्याच्या बांगड्या, माळेतील मणी, अंगठी, सातवाहन व वाकाटककालीन महाल आणि सभागृह यांचा प्रामुख्याने समावेश आहे.

उत्खननामध्ये प्राप्त झालेल्या दैनंदिन जीवनातील उपयोगात येणाऱ्या वस्तु आणि सौंदर्य प्रसाधनांवरून स्पष्ट होते की, राजमहालात आणि सभोवताल मोठ्या संख्येमध्ये लोकांचे वास्तव्य होते. उत्खननात मिळालेल्या मोठ–मोठ्या खोल्या आणि सभागृह ही बाब स्पष्ट करतात की, येथे नियमित सभा आणि चर्चासत्राचे आयोजन केल्या जात होते. भारतीय संस्कृतीमध्ये चुन्याचे मोठ मोठे गळे आपल्या निवासस्थांनी प्रत्येकाने ठेवण्याची प्रथा आहे. असे मोठ मोठे चुन्याचे गडे मनसर येथील उत्खननात एकाच जागी विपुल प्रमाणामध्ये हस्तगत झाले आहे. हिडींबा टेकडीवर पुर्वी ''बटुक भैरव'' ही शिवप्रतीमा मिळाली. राजप्रसादाच्या भग्न अवशेषांचे सहाव्या शतकात बौद्ध महाविहार आणि स्तुपा मध्ये परिवर्तन झाले. किंबहुना तेथे स्तुप उभारतांना या वस्तुचा अधिष्ठानासारख्या उपयोग करण्यात आला असावा. येथील उत्खननात तांबड्या रंगाची खापरे तसेच बोधीवृक्ष व धम्मचक्राचे अंकण असलेल्या प्रतिमा मिळाल्या. केंद्र सरकारने उत्खनन करण्यास परवानगी प्रदान आणि आर्थिक सहाय्य केल्यास मनसरला भारतामध्ये विशेषत्व प्राप्त होई यात शंका नाही.

## रामटेक :-

नागपूर शहरापासून ४९ कि.मी. अंतरावर असलेले रामटेक हे हिन्दू, जैन व बौद्धांचे अतिप्राचीन तीर्थक्षेत्र आहे. रामटेकच्या गडावर वाकाटकाकालीन केवळ न्रसिंह, रूद्र, त्रिविक्रम, वराह, भेगरात, कपटरामची स्वतंत्र मंदीरे आहेत. वारवानंतरची राम व लक्ष्मण मंदीरे, अंबाळा तलाव, गोकुल दरवाजा, कालीदास स्मारक आदि दर्शनिय प्राचीन आहेत. रामटेकची जैन मंदीरे, नागार्जूनची गुहा, व कालिका मंदीरे स्थापत्यदृष्टया महत्वाची आहेत. रामटेकला प्राचीन मंदिराशिवाय अनेक बावड्या म्हणजे पायऱ्यांच्या विहीरी आहेत. भुगर्भात पाणी साठवून ठेवण्याची क्षमता असलेल्या या बावडी स्थापत्यदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण आहे. भोसल्यांच्या राजवटीत या पुरातन क्षेत्राचा विकास केला गेला. आद्य रघुजीपासून श्रीरामचंद्राची उपासना या घराण्यात सुरू झाली. कालीदासाला काव्य करण्याची कल्पना

रामटेकच्या या टेकडीवरच सुचली. येथूनच मेघरूपी दुताच्या प्रवासाला आरंभ होतो. कालीदास स्मृतीप्रित्यर्थ येथे कालीदास स्मारकाची रचना करण्यात आली आहे. याशिवाय येथील जैन मंदिरात तीर्थंकर पार्श्वनाथाची १८ फुट उंचीची भव्य मुर्ती येथील पर्यटनाचा एक अविभाज्य अंग आहे. आपल्या वनवासातील काहीकाळ रामाने विदर्भ पसिरात काढला होता त्या काही मोजक्या ठिकाणापैकी रामटेक एक आहे असे मानले जाते.

वाखाटक काळापासून येथे धार्मिक वास्तुशिल्पाच्या निर्मितीची सुरूवात झाली असे दिसते. वाखाटक काळात रामटेक येथे रामकथेशी संबंधित अनेक वास्तुंची निर्मिती झाली. द्वितीय रूद्रसेन राणी प्रभावती गुप्ता ही प्रामुख्याने यांस कारणीभूत होती. टेकडीवरील नरसिंह मंदिर, त्रिविक्रमाची मुर्ती, वराह व भोरामाचे मंदिर, सितेची न्हाणी, लक्ष्मणमंदिर, नागार्जून गुहा, अंबाळा तलाव आदि दर्शनिय स्थळे पर्यटकांचे लक्ष वेधून घेतात. या टेकडीवर चैत्र व कार्तिक महिण्यात मोठी यात्रा भरते. नागपूर जिल्ह्यातील एक महत्वाचे धार्मिक श्रद्धास्थान ऐतिहासिक वारसा लाभलेले व व्यापारी पेठ म्हणून रामटेकला महत्व आहे.

**नगरधन :**

रामटेक शहराच्या दक्षिणेस केवळ ५ कि.मी. अंतरावर नगरधन हे गांव आहे. प्राचीन विदर्भाची राजधानी नंदीवर्धन म्हणजेच आजचे नगरधन होय. नंदीवर्धनच्या स्थलनिर्मिती संबंधी भिन्न मतप्रवाह अस्तित्वात आहे. परंतु वा. वि. मिराशी यांनी केलेल्या संशोधनानंतर रामटेक जवळील नगरधन हे नंदिवर्धन असल्याचे स्पष्ट झाले आहे. नगरधन येथील किल्ल्याचे नूतनीकरण भोसले काळात करण्यात आले. किल्ल्याच्या भिंती विटांनी बांधलेल्या आहेत. तसेच दोन बावड्या आहेत. किल्ल्यांच्या प्रवेशद्वारावर गणेश शिल्प, दोन्ही बाजूस शुभ चिन्हे, कलश कमळ आदींचे अलंकरण आहे. या किल्ल्याची विटा तसेच राष्ट्रकुट स्वामीराज यांचा ताम्रपट उपलब्ध झाला आहे. येथे ताम्रपाषाणयुगीन अवशेष सापडल्याची नोंद पुरात्ववेत्यांनी केली आहे.

दुसरे रघुजी भोसले यांच्या कारकिर्दीत त्यांचे मंत्री देवाजीपंत चोरघडे यांच्या आश्रमास असलेल्या कृष्णदत्त नामथ मैथिली पंडीताने पुरजनचरित हे संस्कृत नाटक लिहिले होते. इ. स. च्या ४ थ्या शतकापासून १८ व्या शतकापर्यंतचा नंदिवर्धनचा इतिहास इतिहास स्थुल रूपाने ज्ञात होते. नगरधनचे पुरातत्वीय महत्व आजही कमी झालेले नाही. परंतु अलीकडेच वीज कोसळून किल्ल्याचे बरेच नुकसान झालेले आहे.

**धापेवाडा :-**

नागपूर जिल्ह्यातील कळमेश्वराच्या उत्तरेस ८ कि.मी. वर धापेवाडा हे धर्मनगरी म्हणून प्रसिद्ध आहे. येथे इ. स. १६५७ ते १६६१

मध्ये कोलबा स्वामी महाराज सिध्दपुरूष होऊन गेले. त्यांचा मठ येथे आहे. कोलबा स्वामी महाराजानी परमेश्वराच्या प्रेरणेने अनेक भक्तीरचना केल्या या रचना आजही प्रसिद्ध आहेत. येथे पहिल्या रघुजी भोसलेच्या काळात एक किल्ला निर्मार केला गेला. आज केवळ त्यांचे भग्नावशेष उपलब्ध आहे. येथे चंद्रभागा नदीकाठावर विठ्ठल मंदिर आहे. धापेवाडा विदर्भातील प्रति पंढरपूर म्हणून ओळखले जाते.

**जलालखेडा :-**

नागपूर – वरूड राजमार्गावर जलालखेडा हे गाव ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्वपूर्ण असून येथील प्राचीन ऐतिहासिक किल्ला व सोमेश्वर मंदिर आजही इतिहासाची साक्ष देत उभा आहे. सोमेश्वर मंदिरातील शिवलिंग स्वयंभू असून येथील ज्योर्तिलिंग शक्तीपीठाच्या रूपात प्रसिद्ध आहे. हे गांव वर्धा व जाम नदीच्या मनोरम संगमावर वसलेले असून या ठिकाणी दोन्ही नदीच्या काठावर प्राचीन किल्ला अस्तित्वात आहे. हा किल्ला भोसले कालीन असून किल्ल्यांचे बुरूज, तटबंदी, मुख्य दरवाजा, किल्ल्यातील मंदिर आजही इतिहासाची साक्ष देते. नागपूरकर राजे रघुजी भोसले यांनी येथील जहांगीरदारांच्या स्वाधीन हा किल्ला देवून किल्ल्यांची व्यवस्था त्यांच्याकडे सोपविलेली होती. किल्ल्याचा दरवाजा, बुरूज उंच असून हजारो वर्ष होऊन सुद्धा आजही अस्तित्वात आहे. किल्ला नदिच्या काठावर असल्यामुळे वारंवार येणाऱ्या पुरांपासून संरक्षण करण्याकरीता भक्कम तटबंदी आहे. किल्ल्यातच उंच टेकडीवर महाकाली मंदिर आहे. कालीमाता मंदिरापासून शिव मंदिरापर्यंत भुयार असून आजही भुयारी मार्ग अस्तित्वात आहे. कालीमाता मंदिरांचे पुनर्निमाणाचे काम सुरू असतांना एक इमारतीच्या स्लॅबसारखा स्लॅब आढळून आला. तेथे उत्खनन केल्यास अज्ञान इतिहासाची माहिती आपल्याला प्राप्त होऊ शकेल. ऋषी पंचमी, महाशिवरात्री, नागपंचमी इ. प्रसंगी येथे मोठा उत्सव होतो. अलीकडेच हे स्थळ पर्यटनस्थळ म्हणून घोषीत करण्यात आले आहे.

## मेरी दोस्त

साथ कोई न देता
अपना मतलब कोई न भुलता
मतलब पूरा हो जाने पर
छोड देते सब साथ हमारा ।।
अपना साथ ऐसा बनाओ
जो कभी न छोडे साथ हमारा
रास्ता वही बतायेगी।
मंजिल वही दिखाईगी
पथ पर चलना सिखायेगी
पर साथ कभी न छोडेगी ।।
कभी उसे रूठने न देना
कभी उसे दुर न रखना
देगी साथ वही हमेशा
दोस्त जिसका नाम है, पुस्तक ।

महेश झोटींग
बी.ए. भाग–३, पोहणा

# ENGLISH LANGUAGE AND SCOPE FOR PROFESSIONAL ABILITY

**Prof. Sanjay A. Diwekar**
**Department of English**

The process of globalization that accelerated during the last decade of the twentieth century is generally associated with easier and increased cross-border, capital flows, trade and integration of world markets. There had been another globalizing influence quietly taking hold and spreading through the twentieth century which has been continuing to do so in the twenty-first too that is the English language. English emerged as the lingua franca of the world in the twentieth century, and promises to grow in that stature in the twenty-first. Its presence is overwhelming; in education, business, research, science and technology, entertainment, the Internet and almost every other sphere of human engagement. According to estimates, it is spoken by some two billion people at various levels of fluency around the world, including 380 million native speakers (people in the US, UK, Canada, Ireland and Australia), and those who learn it as a second or foreign language. Even though, in numbers, this is just about a third of the world's population, the geographical and domain spread of English is greater than that of any other language. In a sense, English is being globalized as well as acting as a globalizer. Today's economy is increasingly globalized, and this means that many of us are interacting across cultures in a way we never did before. In such an economy, the importance of learning a second language becomes self-evident. Learning a second language helps you to communicate across cultures and to conduct business in lands you may never have previously considered viable markets. It also helps you to address customers in the language that they understand best and in which they are most comfortable communicating. Additionally, the importance of learning a second language is emphasized every day when we see the diversity of earth's cultures and the amazing array of people that make up our global community. There is another reason supporting the importance of learning a second language. Scientific studies have shown that learning a second

language improves brain function and stimulates creativity. When you know a new language, you start to see connections you didn't see before because every language approaches the world from the perspective of another culture and gain a greater appreciation of human society in all its diversity. As a consequence, the importance of learning a second language is again reinforced. You become not just equipped to communicate across cultures but empowered to understand other's points of view.

English for Specific Purposes (ESP) is a learner-centered approach to teaching English as an additional language which focuses on developing English communication skills in a specific discipline, such as accounting, agrology, engineering, IT technology, and academic learning. ESP students usually should have some acquaintance with English and are learning the language in order to communicate as set of professional skills and to perform particular job-related functions. An ESP program is therefore built on an assessment of purposes and needs and the functions for which English is required. ESP it is a need analysis that determines which language skills are most needed by the students, and the syllabus is designed accordingly. An ESP program, might, for example, emphasize the development of reading skills in students who are preparing for graduate work in business administration; or it might promote the development of spoken skills in students who are studying English in order to become tourist guides. As a matter of fact, ESP combines subject matter and English language teaching. Such a combination is highly motivating because students are able to apply what they learn in their English classes to their main field of study, whether it be accounting, business management, economics, computer science or tourism. Being able to use the vocabulary and structures that they learn in a meaningful context reinforces what is taught and increases their motivation. The term "specific" in ESP refers to the specific purpose for learning English. Students approach the study of English through a field that is already known and relevant to them. This means that they are able to use what they learn in the ESP classroom right away in their work and studies. English taught at school level is English for general purpose and English for academic purpose.

English for academic purposes (EAP) and English for General purpose (EGP) entails training students, usually in a higher education setting, to use language appropriately for study.

Students who come from rural places are unable to orient with the English taught at classrooms. They are without basic knowledge of English Language. Bilingual teaching method being used by the teachers in the classrooms reduces the real learning process of the students. The feeling of acquiring English Language is difficult, is not enabling the students to put in to practice to get fluency. Some students are not getting guidance from the parents regarding language learning. They study the English Language from examination point of view. They memorize, reproduce in the exam and forget the same. They are not applying what they have learnt in the real practical life. Even in the classroom also application oriented language is not taught.

Professional skills are key useful things to have especially for the people who are not employed and want to be gaining employability skills generally means training of some kind one can study for. We can define Employability skills as the capability of getting and keeping satisfactory work. Employability skills can also be defined as a set of achievements understanding and personal attributes that make individuals more. Because these skills are useful for career, they are called career management skills.

Main professional skills in case of English language are :
1) Listening skills 2) Speaking skills 3) Reading Skills 4) Writing skills 5) Making effective presentations 6) Adaptation
7) Team work 8) Leadership
9) Planning & Organizing
10) Developing programs
11) Decision making 12) Problem solving 13) Time Management
14) Commercial awareness
15) Persuading & negotiating
16) Determination 17) Lateral Thinking

Professional skills are general skills that are needed to get jobs, and they also help to stay in a job and work the way to the top. One can get job with his talent but stay in a job needs survival skills as the present scenario is the competitive arena. Employability skills can be learnt in the classrooms but putting the skills learnt into practice is important.

# मराठी विभाग

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय वडनेर ता. हिंगणघाट जि. वर्धा येथे गेल्या सात वर्षापासून नियमित मराठी अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषा आणि मराठी साहित्य विषयाची जाणीव वृध्दींगत व्हावी या हेतूने दरवर्षी मराठी अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते.

यावर्षीही विद्यासागर कला महाविद्यालय रामटेक जि. नागपूर येथील डॉ. गिरिष सपाटे यांचे हस्ते मराठी अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी 'हरवत चालेल्या मानवी संवेदना आणि मराठी कविता' या विषयावर व्याख्यान आयोजीत करण्यात आले.

मराठी अभ्यास मंडळाचे उपक्रम :-

साहित्योदय :-

साहित्योदय हा हस्तलिखित अंक सत्र २००५ - २००६ पासून मराठी अभ्यास मंडळा कडून काढला जातो. या अंकात कथा, कविता, लेख, विनोद, वात्रटिका, नाटीका यांचा समावेश असतो. महाविद्यालयाातील विद्यार्थ्यांकडून दरवर्षी या हस्तलिखित अंकाला सहर्ष प्रतिसाद प्राप्त होतो.

निबंध स्पर्धा :-

मराठी अभ्यास मंडळा कडून या वर्षी 'शिक्षण' या विषयावर निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. बी. ए. भाग दोन आणि बी. ए. भाग तीन च्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला. यात प्रथम, द्वितीय, तृतीय असे बक्षीसे ग्रंथरुपाने देण्यात आली.

स्वामी विवेकानंद जीवन परिचय परीक्षा :-

बी. ए. भाग एक च्या विद्यार्थ्यांना स्वामी विवेकानंदांचे जीवन आणि कार्य यांचा परिचय व्हावा म्हणून मराठी अभ्यास मंडळातर्फे ही परिक्षा आयोजीत करण्यात आली. यासाठी प्रश्नपत्रीका आणि विवेकानंदांच्या जीवनावरील पुस्तीका मुलांना देण्यात आल्या.

**- डॉ. प्रवीण कारंजकर**
मराठी विभाग प्रमुख

# राज्यशास्त्र विभाग

राज्यशास्त्र विभागाद्वारे दरवर्षी राज्यशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. अध्यक्ष–गणेश शेळके बी.ए. भाग ३, उपाध्यक्ष–सुरज खोडे बी.ए. भाग २, सचिव–कु. शितल राऊत बी.ए. भाग १, सदस्य – कु. भावना वैद्य, शितल किन्नाके, रविंद्र रूयारकर, पवन कोसुरकर, प्रदिप मेघे, कु. प्रिती चौधरी या सर्व पदाधिकाऱ्यांची एक मताने निवड करण्यात आली.

राज्यशास्त्र अभ्यास मंडळाद्वारे 'भारतीय संसदीय लोकशाही व्यवस्था' ह्या विषयावर प्रा. एम. एम. देवकर, कृष्णराव झोटींग महाविद्यालय, समुद्रपूर यांनी मार्गदर्शन केले. तसेच 'स्वच्छता मित्र' वत्कृत्व स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये पाणी पुरवठा, पाणी गुणवत्ता व स्वच्छता या बाबींची जागृती करणे, पाणी व स्वच्छतेबाबत महाविद्यालयातून संदेशवाहक व अभ्यासू वक्ते तयार करून जागृती करणे हा आहे. या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. आकांक्षा कोल्हे, द्वितीय वाल्मीक मेश्राम तर तृतीय कु. पुजा जवादे यांना अनुक्रमे ३०१/, २०१/–, १०१/– रूपयाचे पारितोषिक प्रा. विनोद मुडे यांच्या कडून देण्यात आली.

तसेच राज्यशास्त्र ह्या विषयाच्या अनुषंगाने 'भारतीय राजकारणासमोरील मुख्य वाद प्रश्न' या विषयावर विद्यार्थ्यांकडून पेपरचे वाचन करून घेतल्या गेले. ग्रामपंचायती ला भेटी देऊन ग्रामपंचायतीच्या कामकाजाचे अध्ययन करण्यात आले. तसेच संसदेच्या कामकाजाचे सादरीकरण करण्यात आले.

### संविधान दिन :-

तसेच २६ नोव्हेंबरला संविधान दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात मार्गदर्शक प्रा. अशोक कांबळे रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट यांनी भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पुजन करून 'भारतीय संविधान' या विषयावर मार्गदर्शन केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिलीअंशी अवार्ड :-

राजशास्त्र विभागातर्फे स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन व स्पर्धा परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन प्रा. डॉ. कमलकिशोर इंगोले यांनी केले तर आयोजीत स्पर्धा परिक्षेत एकुण ४३ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यात प्रथम कु. मनिषा मुळे, द्वितीय कु. श्रृती जयस्वाल, तृतीय कु. सुषमा दुरतकर, दिनेश चांभारे, चतुर्थ संदीप देऊळकर, पाचवा कु. मयुरी इंगाले यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर ब्रिलीअंशी अवार्ड' प्राप्त केला. त्यांचे महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकरजी गमे साहेब, प्राचार्य नरेश भोयर व सर्व प्राध्यापकांनी अभिनंदन केले.

**वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जीवन विकास परिक्षा** - ''प्रविण'' ग्रामगीता बोधामृत या वर्षी पासून घेण्यात येत आहे. यात ५५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

– प्रा. विनोद मुडे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख

# इतिहास विभाग

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे गेल्या ४ वर्षापासून नियमित इतिहास अभ्यास मंडळाची स्थापना केली जाते. विद्यार्थ्यांमध्ये इतिहास विषय व भारताच्या इतिहासाबद्दल जाणीव व आवड निर्माण व्हावी या हेतुने दरवर्षी अनेक उपक्रम इतिहास अभ्यास मंडळाच्या माध्यमातून राबविले जातात.

शैक्षणिक सत्र २०१३–१४ या वर्षी प्रा.राकेश स. शिम्पी, शिलादेवी महाविद्यालय वाडी, जि. नागपूर यांचे हस्ते २३ ऑक्टोंबर २०१३ ला इतिहास अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. ''स्पर्धा परिक्षेत इतिहासाचे महत्व'' या विषयावर प्रा. राकेश स. शिम्पी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इतिहास अभ्यास मंडळ (२०१३–२०१४) समन्वयक प्रा. पंकज वा. मून

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १) कु. वैशाली राहाटे | – | अध्यक्ष | ५) गणेश खेकारे | – | सदस्य |
| २) कु. प्रियंका फुलमाळी | – | उपाध्यक्ष | ६) कु. ज्वाला वंजारी | – | सदस्य |
| ३) आशिष सकाटे | – | सचिव | ७) अमोल सेलकर | – | सदस्य |
| ४) कु. बौधश्री गावंडे | – | सदस्य | | | |

**– प्रा. पंकज मुन**

इतिहास विभाग प्रमुख

# समाजशास्त्र विभाग

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी समाजशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. अभ्यास मंडळाची कार्यकारणी याप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष कु. कल्याणी भगत | उपाध्यक्ष राहुल शेटे | सदस्य – प्रदिप ठमके |
| सदस्य – कु. रोहीणी खेकारे | सदस्य – कु. मधुबाला खैरे | सदस्य – कु. रेखा बावणे |
| सदस्य – रजत मुन | | |

याप्रमाणे कार्यकारणी गठीत करून अभ्यास मंडळाचे उद्घाटन प्रा. डॉ. कमलकिशोर इंगोले रा. सु. बिडकर महाविद्यालय हिंगणघाट यांच्या हस्ते करण्यात आले व त्यांनी सामाजिक समस्या या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य नरेश भोयर होते.

'समाजशास्त्र अभ्यास मंडळ' आणि 'ग्रामिण रूग्णालय वडनेर' यांच्या संयुक्त विद्यमाने 'एड्स सप्ताह' निमित्य वडनेर येथे जनजागृती रॅलीचे आयोजन करण्यात आले. एड्स जनजागृती समारोह प्रसंगी मार्गदर्शन डॉ. दुर्गे सर, अधिक्षक प्रा. आ. केंद्र वडनेर, माळोदे मॅडम, दांडेकर मॅडम, समुपदेशक एड्स प्राथमिक आरोग्य केंद्र वडनेर यांनी केले.

**– प्रा. गणेश बहादे**

समाजशास्त्र विभाग प्रमुख

# अर्थशास्त्र विभाग

श्री साईबाबा लोकप्रबोधन कला महाविद्यालय, वडनेर अर्थशास्त्र अभ्यास मंडळाची कार्यकारिणी अर्थशास्त्र विभाग प्रमुख व अर्थशास्त्र अभ्यास मंडळ समन्वयक प्रा. विठ्ठल घिनमिने यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र मंडळाची कार्यकारिणी दि. १६.०८.२०१४ रोजी गठीत करण्यात आली. कार्यकारिणी खालीलप्रमाणे आहेत.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अध्यक्ष | : | कु. भारती वानखेडे | उपाध्यक्ष | : | सुरज खोडे |
| सचिव | : | कु. प्रिया राडे | सहसचिव | : | कु. रजनी वानखेडे |
| कोषाध्यक्ष | : | अतुल आमदरे | प्रसिद्धीप्रमुख | : | कु. आकांक्षा कोल्हे |
| सदस्य | : | सुरज येलेकर, पवन झोटींग,<br>लिना खोंड, स्वाती रेंघे. | | | |

**कार्यक्रम तपशिल :**

दि. २३.१२.२०१३ ला प्राचार्य डॉ. नरेशजी भोयर यांच्या अध्यक्षतेखाली तसेच प्रा. सतिश रघुवंशी सेलु यांच्या प्रमुख उपस्थितीत अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमा प्रसंगी ''अर्थशास्त्रातील विविध संकल्पना'' या विषयावर प्रा. सतिश रघुवंशी यांनी मार्गदर्शन केले.

दि. १५.१.२०१३ बी. ए. भाग १, २ आणि ३ च्या विद्यार्थ्यांचे सेमीनार वेळापत्रक तयार करून अभ्यासक्रमातील विविध भागावर सेमीनारचे आयोजन करण्यात आले. यामध्ये नफ्याचे सिद्धांत, तेजी व मंदी आणि भारतीय शेती इत्यादी.

दि. २५.०२.२०१३ बी. ए. भाग १, २ आणि ३ च्या अभ्यासक्रमावर आधारित पाचही विभागावर विभागनिहाय प्रश्न तयार करून योग्य पर्याय निवडा (Objective Test) परिक्षेचे आयोजन करण्यात आले.

दि. २७.०२.२०१४ अर्थशास्त्र अभ्यास मंडळाचा समोरोपीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या समारोपीय कार्यक्रमात सत्र २०१३-१४ मध्ये राबविलेल्या विविध उपक्रमाची माहीती देवून कार्यकारीणीचा समारोप करण्यात आला.

– प्रा. विठ्ठल घिनमिने
अर्थशास्त्र विभाग प्रमुख

## गृहअर्थशास्त्र विभाग

गृहअर्थशास्त्र विभागाद्वारे गृहअर्थशास्त्र अभ्यास मंडळाची स्थापना प्रा. आरती देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आली. मंडळाच्या वतीने महाविद्यालयातील विद्यार्थीनीकरीता रांगोळी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा, सलाद डेकोरेशन, कृत्रीम फुलांची रचना, आरोग्य विषयक मार्गदर्शन इत्यादी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. विद्यार्थीनींना विषयाची पुर्ण ओळख व्हावी व विषयात रस निर्माण होऊन त्यांच्या ज्ञानात भर पडावी या करीता अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात येते. मंडळाची कार्यकारणी पुढीलप्रमाणे –

कु. भावना घरझोडे – अध्यक्ष
कु. कोमल ताजने – उपाध्यक्ष
कु. गायत्री मांडेकर – सचिव
कु. अंकिता सरोदे – सदस्य
कु. भाग्यश्री धात्रक – सदस्य
कु. हर्षा पढाल – सदस्य
कु. प्रणाली कडु – सदस्य

अभ्यास मंडळाद्वारे प्रा. विणा मेंढुले, गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख विद्या विकास महाविद्यालय समुद्रपूर यांच्या हस्ते मंडळाचे उद्घाटन करण्यात आले व त्यांनी बालकांचे संगोपन व त्यांची सुश्रृषा या विषयावर आयोजीत सेमीनार मध्ये मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन कु. शितल किलनाके हिने केले तर कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. आरती देशमुख गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख यांनी केले. आभार प्रदर्शन प्रणाली कडू हिने केले. कार्यक्रमाची सांगता पसायदानाने केली.

**– प्रा. आरती देशमुख**
गृहअर्थशास्त्र विभाग प्रमुख

---

## शारिरीक शिक्षण विभाग

श्री साईबाबा लोक प्रबोधन कला महाविद्यालय वडनेर येथे महाविद्यालयात सर्व खेळाचे मैदान उपलब्द करून देण्यात आलेले आहे. त्याचप्रमाणे सर्व खेळाचे साहीत्य खेळाडू विद्यार्थीना पुरविण्यात येते. महाविद्यालय हे ग्रामीण भागात असून विद्यार्थ्यांचा 'खेळामुळे सर्वांगीण विकास' ह्या कल्पनेवर आधारित खेळाकडे विशेष लक्ष देण्यात येते. प्रत्येक खेळाकरीता प्रशिक्षण वर्ग घेतल्या जातात. त्यामध्ये खेळाडूंना व्यायाम, खेळाचे कौशल्य आहार या विषयी मार्गदर्शन दिल्या जाते.

महाविद्यालयातील विद्यार्थीनी आतापर्यंत विविध खेळामध्ये विद्यापीठ, राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. महाविद्यालय खेळामध्ये दिवसेंदिवस अग्रेसर आहे.

महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम :–

* क्रिडा स्पर्धा * शारिरिक क्षमता चाचणी * वैद्यकीय चाचणी * सहल * क्रिडा दिन
* १५ ऑगस्ट, २६ जाने. व १ मे ला ध्वजारोहण कार्यक्रम * उन्हाळी शिबीर
* क्रिडा प्रशिक्षण व मार्गदर्शन

**– प्रा. नरेश भोयर**
शारिरीक शिक्षण विभाग प्रमुख

# सांस्कृतिक विभाग

सांस्कृतिक विभागातर्फे महाविद्यालयामध्ये विविध उपक्रम राबविण्यात आले. १ ऑगस्ट ला दुपारी १२.३० वाजता ग्रंथालय वाचन कक्षामध्ये प्राचार्य नरेश भोयर, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्या वतीने लोकमान्य टिळकांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करण्यात आली.

दि. २८ नोव्हेंबरला महात्मा ज्योतिबा फुले व दि. ६ डिसेंबर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महाविद्यालयाच्या ग्रंथालयामध्ये प्रा. विनोद मुडे, प्रा. पंकज मुन, प्रा. विठ्ठल घिनमिने यांनी आयोजित कार्यक्रमात महात्मा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवन कार्यावर विचार मांडले.

0३ जानेवारी २0१४ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती निमित्त निबंध स्पर्धा, वकृत्त्व स्पर्धा विषय–स्त्री मुक्ती आणि सावित्रीबाई फुले वेषभूषा व प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. दिवाकरजी गमे, प्रमुख अतिथी प्रा. चाफले सर तसेच प्राचार्य नरेश भोयर व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १३ जाने. ते १८ जाने. २0१४ या कालवधीमध्ये युवा स्फुर्ति महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्‌घाटक मा. डॉ. विलास हाडगे प्राचार्य कला व विज्ञान महा. पुलगांव तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. दिवाकरजी गमे संस्थापक सचिव, श्री साईबाबा कला महा. वडनेर, कार्यक्रमाचे मार्गदर्शक मा. ए. एस. चौधरी साहेब ठाणेदार, पोलीस स्टेशन वडनेर, प्रमुख अतिथी मा. अविनाश गमे संचालक वेणा लोक प्रबोधन शिक्षण संस्था हिंगणघाट, प्राचार्य नरेश भोयर ह्यांच्या उपस्थितीत पार पडला.

युवा स्फुर्ति महोत्सवामध्ये आयोजित स्वयंस्फुर्त भाषण स्पर्धेमध्ये प्रथम–वैशाली रहाटे बी.ए. भाग–३, द्वितीय–वाल्मीक मेश्राम बी.ए. भाग–३, वादविवाद स्पर्धा, विषय–वाढत्या भ्रष्टाचारास जनताच जबाबदार आहे का ? प्रथम पुरस्कार–कु. वैशाली रहाटे बी.ए. भाग–३, द्वितीय पुरस्कार–कु. भावना घरजोडे बी.ए. भाग–२. भाषण स्पर्धा वैराग्यमूर्ति संत गाडगेबाबा यांचे सामाजिक विचार – प्रथम – रजनी वानखेडे, द्वितीय– शितल राऊत बी.ए. भाग–१. गीतगुंजन स्पर्धा – प्रथम– शितल किलनाके बी.ए. भाग–२, द्वितीय– प्रतिक ठमके बी.ए. भाग–३ याशिवाय रांगोळी स्पर्धा, पुष्पगुच्छ स्पर्धा, पथनाट्य, कविता वाचन, नकला, एकपात्री प्रयोग इत्यादी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बक्षिस वितरणाचा कार्यक्रम डॉ. गौरीशंकरजी पाराशर (माजी प्र कुलगुरू, रा.तु.म. नागपूर विद्यापीठ) यांच्या शुभ हस्ते व डॉ. विरेंद्र जुमडे (प्राचार्य, हरिभाऊ आदमने कला, वाणिज्य व

विज्ञान महा. सावनेर) यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. तसेच पालक, विद्यार्थी, शिक्षक, व्यवस्थापन समिती व माजी विद्यार्थांचा मेळावा आयोजीत महाविद्यालयाचे संस्थापक सचिव प्रा. दिवाकरजी गमे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

तसेच सावित्रीबाई फुले वेशभुषा स्पर्धे मध्ये प्रथम आलेल्या कु. पल्लवी वटाने बी.ए. भाग-१ हीचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात साधना बालपांडे, प्रिया राडे, शितल किलनाके यांनी विद्यापीठ गीत सादर केले तर कु. रूपाली धोटे, कु. स्वाती रेंगे, कु. लिना खोंड यांनी स्वागत गीत सादर केले. कार्यक्रमाचे संचालन कु. वैशाली रहाटे हिने प्रास्ताविक प्रा. विनोद मुडे सहाय्यक सांस्कृतिक विभाग प्रमुख यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. आरती देशमुख सांस्कृतिक विभाग प्रमुख यांनी केले. कार्यक्रमाचा शेवट पसायदान व स्वरूचि भोजनाने झाला.

- प्रा. आरती देशमुख
सांस्कृतिक विभाग प्रमुख

---

## महाविद्यालयीन विद्यार्थी कल्याण समिती

| | | |
|---|---|---|
| १) कु. पुजा गौतमराव जवादे | - | विद्यापीठ प्रतिनिधी |
| २) कु. भावना रमेशराव वैद्य | - | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| ३) कु. भावना राजेंद्रराव घरजोडे | - | विद्यार्थीनी प्रतिनिधी |
| ४) कु. रजनी मधुकरराव वानखेडे | - | बी.ए. भाग-२ प्रतिनिधी |
| ५) कु. शितल काशीनाथराव राऊत | - | बी.ए. भाग-१ प्रतिनिधी |
| ६) अविनाश बिटे | - | रा. से. यो. प्रतिनिधी |
| ७) कु. कोमल वाल्मीक ताजने | - | सांस्कृतिक प्रतिनिधी |
| ८) सुरज गजाननराव खोडे | - | क्रीडा प्रतिनिधी |

# राष्ट्रीय सेवा योजना

सत्र २०१३-१४ करीता राष्ट्रीय सेवा योजना पथकाची स्थापना सत्रारंभी करण्यात आली. त्यात ३७ मुले व ६९ मुली एकुण १०६ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.

११ आगॅस्ट २०१३ ला ग्रामीण रूग्णालयाच्या सहकार्याने आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश भोयर, प्रमुख मार्गदर्शक सौ. वैशाली माळोदे, सौ. वनिता अढाव (ग्रा.रू.वडनेर) ह्या होत्या. प्रमुख अतिथी रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कारंजकर, प्रा. विठ्ठल घिनमिने, प्रा. पंकज मुन, प्रा. सौ. आरती देशमुख तसेच महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

दि. १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिना निमित्ताने १४ ऑगस्टला महाविद्यालयीन परिसरामध्ये साफ सफाई करून स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

दि. ०३ सप्टेंबरला 'सल्लागार समितीचे' गठन करण्यात आले. समितीचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य नरेश भोयर, तसेच सचिव म्हणून रा.से.यो. चे कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कारंजकर, तर सदस्य म्हणून मा. मनोहरराव बारापात्रे गट विकास अधिकारी पं. स. हिंगणघाट, डॉ. विवेक दुर्गे अधिक्षक ग्रा.रू. वडनेर, मा. ए. एस. चौधरी ठाणेदार पो. स्टे. वडनेर, प्रा. विठ्ठल घिनमिने, प्रा. विनोद मुडे, प्रा. आरती देशमुख यांची समितीमध्ये निवड करण्यात आली.

०५ सप्टेंबरला डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून साजरी करण्यात आली. तसेच राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाचे ही उद्‌घाटन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश भोयर, उद्‌घाटक म्हणून प्रा. श्रीकृष्ण बोढे समन्वयन-रा.से.यो. हिंगणघाट तालुका, डॉ. प्रवीण कारंजकर रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी तसेच सर्व प्राध्यापक व रा.से.यो. चे सर्व स्वयंसेवक यांच्या उपस्थितीत पार पाडला.

८ सप्टेंबर 'साक्षरता दिन' साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे मार्गदर्शक-चिंतामनजी नखाते यांनी साक्षरता दिनावर विचार मांडले. यावेळी डॉ. प्रवीण कारंजकर, प्रा. गणेश बहादे, प्रा. पंकज मुन व रा.से.यो. चे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

दि. १० सप्टेंबरला वृक्षारोपनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व रा.से.यो. सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

दि. २४ सप्टेंबर २०१३ ला राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिना निमित्ताने सामाजीक बांधीलकेची जाणीव ठेवून ग्रामीण रूग्णालय वडनेर च्या परिसरामध्ये स्वच्छता व गाजर गवत निर्मूलनाचा स्वच्छता कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी प्राचार्य नरेश भोयर, डॉ. विवेक दुर्गे, वैद्यकीय

अधिकारी ग्रा.रू. वडनेर, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी, प्रा. डॉ. प्रवीण कारंजकर, सर्व प्राध्यापक व रा.से.यो. चे स्वयंसेवक यांनी श्रमदान करून ग्रामीण रूग्णालय वडनेरचा परिसर स्वच्छ केला.

दि. २९.०९.२०१३ ला रा.से.यो. च्या सर्व स्वयंसेवकाकरीता उद्‌बोधन वर्ग घेण्यात आला.

दि. ०२ ऑक्टोंबर २०१३ ला महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांची जयंती साजरी करण्यात आली.

२६ नोव्हें. २०१३ ला संविधान दिनाचे आयोजन करण्यात आले.

दि. २६.११.२०१३ ला मौजा काचनगांव येथे होणाऱ्या विशेष श्रमसंस्कार शिबीराची पूर्व कार्यशाळा आयोजीत करण्यात आली. डॉ. प्रविण कारंजकर, प्रा. विठ्ठल घिनमिने यांनी श्रमसंस्कार शिबीर पूर्व कार्यशाळेमध्ये मार्गदर्शन केले.

दि. १२ जाने. २०१४ ला स्वामी विवेकानंद यांचा १५१ वा जन्मदिन युवादिन म्हणून साजरा करण्यात आला. यावेळी प्राचार्य नरेश भोयर, प्रमुख मार्गदर्शक डॉ. प्रवीण कारंजकर, प्रा. ज्योत्सना काकडे तसेच सर्व प्राध्यापक व रा.से.यो. स्वयंसेवक उपस्थित होते. युवा सप्ताहाच्या निमित्ताने वेगवेगळ्या स्पर्धा मधील विजेत्यांना स्वामी विवेकानंद यांचा जीवनावर आधारित पुस्तक पारितोषीकांच्या रूपाने भेटवस्तू मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला.

**– डॉ. प्रवीण कारंजकर**
कार्यक्रम अधिकारी
राष्ट्रीय सेवा योजना

---

College is my Temple
Teacher is my God
Study is my Aim
Pooja is my Name
Life is a Dram
Earth is my Stage
We all are actors
God is Director

**गणेश डुकरे**
शेकापूर
बी.ए. भाग–२

***''विद्यार्थ्यांचे चारित्र्य संवर्धन हे शाळेचे मुख्य ध्येय; तर त्यांच्यामध्ये नैतिक बुद्धी दृढ करणे हे शाळेचे प्रमुख उद्दिष्ट असले पाहिजे.''***

**कु. अश्विनी लिहीतकर**
बी.ए. भाग–२

# निरंतर प्रौढ शिक्षण विभाग व महिला अध्ययन केंद्र

महाविद्यालयामध्ये निरंतर प्रौढ शिक्षण व विस्तार विभागात सत्र २०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये ३३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांना माहिती संकलन प्रकल्प, राष्ट्रसंत संस्कार प्रकल्प व लोकसंख्या शिक्षण मंडळ या द्वारे विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. तसेच इतर कार्यक्रमाचे आयोजन या विभागाच्या वतीने महाविद्यालयात आयोजित करण्यात आले होते.

दि. ११.०७.२०१४ ला जागतिक लोकसंख्या दिनानिमित्य ''वाढती लोकसंख्या आणि उपाययोजना' या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नरेश भोयर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. गणेश बहादे हे होते. तर प्रमुख उपस्थिती उपक्रमाचे समन्वयक प्रा. विठ्ठल घिनमिने हे होते.

दि. ०५.०९.२०१४ ला शिक्षणदिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य नरेश भोयर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. तुषार वाटकर आणि प्रा. सुर्यवंशी हे होते. प्रमुख उपस्थिती समन्वयक प्रा. विठ्ठल घिनमिने, रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. प्रवीण कारंजकर आदी मान्यवर उपस्थित होते.

दि. ०१.१२.२०१४ ला जागतिक एड्स दिनानिमित्य रैलीचे आयोजन करण्यात आले. या रैलीमध्ये डॉ. विवेक दुर्गे (अधिक्षक ग्रा.रू. वडनेर) प्रा. विठ्ठल घिनमिने, प्रा. गणेश बहादे, प्रा. पंकज मुन आणि महाविद्यालयातील विद्यार्थीनींनी सहभाग घेतला.

दि. १७.१२.२०१४ ला पर्यावरण जनजागृती सप्ताहाच्या निमित्याने पर्यावरण आणि प्रदुषण या विषयावर मार्गदर्शनाचा कार्यक्रम आयोजीत करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य नरेशजी भोयर हे होते. तर प्रमुख मार्गदर्शक प्रा. विनोद मुडे, प्रा. आरती देशमुख आणि प्रमुख उपस्थिती उपक्रमाचे समन्वयक प्रा. विठ्ठल घिनमिने आदी मान्यवर उपस्थित होते.

**- प्रा. विठ्ठल घिनमिने**
कार्यक्रम अधिकारी
निरंतर प्रौढ शिक्षण विभाग